# माणूस

शनिवार । २५ डिसेंबर १९७६ । साठ पैसे

## तडजोड : तूर्त खुलासा इतकाच....

गेल्या आठवड्यात श्री. जवाहरलाल दर्डा यांनी ' माणूस ' वर घातलेले खटले काढून घेतल्याच्या वार्ता वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. आकाशवाणीवरूनही या वृत्ताला विशेष प्रसिद्धी दिली गेली.

' माणूस ' चे संपादक श्री. ग. माजगावकर व ' माणूस ' ज्या संस्थेमार्फत प्रकाशित होतो त्या ' राजहंस प्रकाशन ' चे भागीदार श्री. ब. मो. पुरंदरे यांनी माफी मागितल्यामुळे हे खटले काढून घेतले गेले, असेही वरील वृत्तात म्हटले गेले आहे. आकाशवाणीवर तर हे पुन:पुन्हा घोळवून-रंगवून सांगितले गेल्याचे अनेकांनी ' माणूस ' ला कळवले आहे.

चंद्रपूर व नागपूर येथून तीन फौजदारी व पन्नास। पन्नास हजारांचे दोन दिवाणी, मिळून एकूण पाच खटले दर्डांनी ' माणूस ' वर घातले होते.

पैकी नागपूरचा एक फौजदारी खटला सहा महिन्यांपूर्वीच कोर्टाने फिर्यादी हजर नाही म्हणून निकालात काढून टाकला होता.

आरोपींचे दोन्ही वकील गजाआड, म्हणून चंद्रपूरच्या खटल्याचे कामकाज सुरूच होत नव्हते.

बदललेल्या परिस्थितीमुळे खटल्यांचे एकूण महत्त्वही संपुष्टात आलेले होते..

त्यामुळे काही मध्यस्थांनी पुढाकार घेतला व तडजोड घडवून आणली. यात मुंबई व नागपूर येथील राजकारण व सहकार क्षेत्रातल्या, वृत्तपत्रातल्या, वरिष्ठ न्याया-लयातल्या जबाबदार व्यक्ती होत्या. हे अशासाठी सांगितले, की उभयपक्षी अवमान-कारक असे तडजोडीत काही असणार नाही हे स्पष्ट व्हावे.

तडजोडीत ठरल्याप्रमाणे श्री. दर्डा एकेक खटला कोर्टातून काढून घेत आहेत. परंतु त्यासंबंधीचे शिक्कामोर्तबीचे कागदपत्र हाती यायला अजून वेळ लागणार आहे. तोवर तडजोडीबद्दल सविस्तर लिहिता येत नाही. तूर्त खुलासा इतकाच, की प्रसिद्ध झालेल्या बातम्या अपूर्ण व एकांगी आहेत. श्री. ग. माजगावकर किंवा ब. मो. पुरंदरे यांनी ' माफी ' ( apology ) मागितलेली नाही किंवा कुठल्याही अवमानकारक अटींना मान्यताही दिलेली नाही.

अर्थात एक गोष्ट दर्डांच्या बाजूनेही आताच सांगितली पाहिजे. तडजोडीत प्रथम-पासून त्यांनी ' माणूस ' ला अवमानकारक ठरेल अशी कुठलीही अट लादण्याचा वेडावाकडा आग्रह धरलेला नव्हता.

तडजोड म्हटली, की उभयपक्षी ताठरपणा थोडाफार सोडावा लागतो. तेवढेच या-प्रकरणी घडलेले आहे.

इत्यलम्--

संपादक

## साप्ताहिक माणूस

**वर्ष सोळावे – अंक तिसावा**

**२५ डिसेंबर १९७६**

**मूल्य : साठ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर यांनी** साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


# काँग्रेस

## गटबाजीचे आव्हान

वा. दा. रानडे

सत्तारूढ पक्षाचे बहुमत असता ओरिसात राष्ट्रपतींची राजवट जारी करावी लागावी, ही त्या पक्षाच्या दृष्टीने नामुष्कीची घटना आहे. अशी घटना एखाद्या राज्यातच घडली असती तर अपवादात्मक परिस्थिती म्हणून ती क्षम्य म्हणता आली असती. पण एखाद्या राज्यापुरतीच ही घटना मर्यादित न राहता इतर राज्यांत तिची पुनरावृत्ती होऊ लागते तेव्हा पक्षसंघटनेतील तो एक मोठा दोष समजून त्याच्या निर्मूलनासाठी निर्धाराने उपाययोजना झाली पाहिजे. तशी ती केली गेलेली नाही. शिस्तबद्ध पक्षउभारणीसाठी निर्धारपूर्वक पावले टाकली जात नाहीत, तोपर्यंत अशा घटनांची पुनरावृत्ती आणखी काही राज्यांत होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. ओरिसामागोमाग पश्चिम बंगाल त्याच मार्गाने जाणार असे दिसते.

सत्तारूढ पक्षाचे बहुमत कायम असताना राष्ट्रपती राजवट प्रथम केरळमध्ये नंबुद्रिपाद यांचे पहिले कम्युनिस्ट मंत्रिमंडळ अधिकारावर असताना लादली गेली होती. काँग्रेस, प्रजासमाजवादी आणि मुस्लीमलीग यांनी एकत्र येऊन कम्युनिस्ट राजवटीविरुद्ध आंदोलन सुरू केले होते. श्रीमती इंदिरा गांधी त्यावेळी काँग्रेसच्या अध्यक्ष होत्या व या आंदोलनाला त्यांचा पाठिंबा होता. सत्तेचा वापर पक्षहितासाठी केला, हा नंबुद्रिपाद राजवटीविरुद्ध मुख्य आरोप होता. आंदोलनाचा जोर वाढला आणि घटनेतील तरतुदीनुसार कारभार करण्यास सरकार असमर्थ असल्याचे कारण दाखवून तेथे राष्ट्रपतींची राजवट लादण्यात आली. निवडणुकात बहुमत मिळवून घटनात्मक मार्गाने अधिकारावर असलेले सरकार आंदोलनाच्या दडपणाने अधिकारावरून दूर करणे योग्य नाही, बहुमत कायम असेपर्यंत किंवा मुदत संपेपर्यंत त्याला अधिकारावर राहू दिले पाहिजे, असे मत त्यावेळी काही घटनातज्ज्ञांनी व्यक्त केले होते. श्री. सी. डी. देशमुख, न. वि. गाडगीळ आदी काँग्रेसमधल्या त्यावेळच्या काही नेत्यांनी व्यक्त केले होते. या भूमिकेतील न्याय्यपणा सत्तारूढ काँगेसपक्षाचा मेळावा गुजरात व बिहार आंदोलनाच्या वेळी पटला. वास्तविक त्यावेळीच योग्य भूमिका घेतली असती तर या अनिष्ट प्रवृत्तीला वेळीच पायबंद बसला असता.

सत्तारूढ काँग्रेस पक्षाचे बहुमत असता राष्ट्रपतींची राजवट आणावी लागण्याचा पहिला प्रसंग उत्तर प्रदेशात पोलीस बंडाळीनंतर आला. कमलापती त्रिपाठी त्यावेळी मुख्यमंत्री होते. राष्ट्रपतींची राजवट न आणता त्रिपाठींच्या जागी दुसरा मुख्यमंत्री निवडून त्यावेळी पेचप्रसंग सोडविता आला असता, पण पक्षातील निरनिराळ्या गटांच्या संघर्षामुळे नेता निवडणे सोपे नव्हते. त्यासाठी पुरेसा अवधी मिळावा म्हणून राष्ट्रपतींची राजवट तेथे आणली. गुजरात आणि बिहारमध्येही नवा नेता निवडताना राष्ट्रपतींची राजवट आणावी लागली. जून१९७५ मधील निवडणुकीनंतर गुजरातेत अल्पकाळ जनता आघाडीचे सरकार आघाडीवर होते. फोडाफोडीच्या डावाने ते गडगडल्यावर वास्तविक काँग्रेस मंत्रिमंडळ तेथे अधिकारावर यायला हवे. विधानसभेत तेथे आता काँग्रेस पक्षाला हुकमी बहुमत आहे, तरीही राष्ट्रपतींची राजवट अजून जात नाही. याचे कारण नेतानिवडीवर काँग्रेस पक्षातील अंतर्गत संघर्ष अजून मिटलेला नाही.

सत्तारूढ काँग्रेस पक्ष गटबाजीने पोखरला

असल्याने या घटना घडत आहेत. विधानसभांमध्ये हुकमी बहुमत असता काँग्रेस पक्षाने वास्तविक आपला कार्यक्रम निर्धाराने अंमलात आणण्यावर लक्ष केंद्रित करावयास हवे. पण काही राज्यांत गटांच्या अंतर्गत संघर्षातच कार्यकर्त्यांची शक्ती खर्च होताना दिसत आहे. हे संघर्ष धोरण व कार्यक्रमाच्या बाबतीतील मतभेदांतून निर्माण झालेले नसून, वैयक्तिक हेवेदावे आणि अधिकारपदासाठी स्पर्धा यामागे आहे. राष्ट्रीय जीवनात शिस्त आणण्यासाठी पंतप्रधानांनी आणीबाणी पुकारली. पण स्वतःच्या पक्षात शिस्त कशी आणावयाची, हा आज त्यांच्यापुढे सर्वांत कठीण प्रश्न झालेला आहे.

राष्ट्रपतींची राजवट आल्याच्या दुसऱ्याच दिवशी भुवनेश्वरमध्ये काँग्रेस आमदार आणि प्रदेश काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची एकत्रित बैठक होऊन पंतप्रधानांनीच नेता निवडावा त्याला आम्ही पाठिंबा देऊ असे मत व्यक्त करण्यात आले. नेता-निवडीच्या प्रश्नावर पूर्वी बिहार विधिमंडळ काँग्रेस पक्षानेही असाच ठराव पास केला होता. नेत्याची निवड करणेही वास्तविक विधिमंडळ काँग्रेस पक्षाचीच जबाबदारी आहे. पंतप्रधानाकडे हा प्रश्न सोपविणे म्हणजे ही जबाबदारी टाळणे होय. पंतप्रधानांशी निष्ठेचे प्रदर्शनही मंडळी करतात खरी, पण त्यांनी निवडलेला नेता तरी ते मनापासून मान्य करून त्याच्यामागे एकजुटीने उभे राहतात का? आतापर्यंतचा अनुभव तरी तसा नाही. ओरिसाचेच उदाहरण घ्या. श्रीमती नंदिनी सत्पथी पंतप्रधानांच्या पसंतीनेच नेतेपदी निवडल्या गेल्या होत्या. गुजरातचे ओझा, बिहारचे पांडे, मध्यप्रदेशचे सेठी, पश्चिम बंगालचे सिद्धार्थ शंकर रे यांना पंतप्रधानांनीच नेते निवडले होते. त्यांपैकी ओझा, पांडे, सेठी तर गेलेच आणि आता रेही जाण्याच्या मार्गावर आहेत. हा अनुभव लक्षात घेता पंतप्रधानांनी ही जबाबदारी पत्करूच नये. विधिमंडळ पक्षावरच ती सोपवावी. हाच योग्य लोकशाही संकेत होय. निवडलेला नेता पक्षाची धोरणे व कार्यक्रम अंमलात आणतो की नाही? महत्त्वाच्या प्रश्नांवर केंद्राचे आदेश मानतो की नाही, एवढेच त्यांनी पाहावे.

गटबाजीच्या खेळातून वारंवार नेता बदलला जाऊ नये, यासाठी आणखी काही संकेत रूढ करणे आवश्यक आहे. त्यांपैकी एक संकेत म्हणजे पक्ष-सभासदांच्या दोन तृतीयांश बहुमताचे पाठिंब्याशिवाय नेता बदलला जाऊ नये. नेता बदलणे सोपे नाही हे दिसून आल्यावर स्वाभाविकच त्यासाठी चालणाऱ्या गटबाजीला काही प्रमाणात आळा बसेल.

ओरिसा प्रकरणात दिसून आलेली आणखी एक महत्त्वाची प्रवृत्ती म्हणजे काँग्रेसच्या राजकारणात संजय गांधी व युवक काँग्रेस यांचा प्रभाव वाटत आहे. कम्युनिस्टांविरुद्ध आणि कम्युनिस्टांना जवळचे असलेल्या मुख्यमंत्र्यांविरुद्ध त्यांच्या मोहिमेचा रोख आहे. सत्तेवर येण्यासाठी कम्युनिस्टांची मदत हवी होती तेव्हा काँग्रेसने ती घेतली. कम्युनिस्टांशी निवडणुकीत युतीही केली. त्यांच्यासाठी काही जागा मोकळ्या सोडल्या. पण आता कम्युनिस्टांच्या पाठिंब्याची काँग्रेसला जरूर राहिलेली नाही. कम्युनिस्टांना काँग्रेसही जवळ करीत नाही आणि विरोधी पक्षही जवळ करीत नाहीत, त्यामुळे त्यांची मात्र दयनीय अवस्था झाली आहे.

चंडीगड येथे गेल्या वर्षी भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात 'हे संघटनेचे वर्ष म्हणून पाळले पाहिजे.' अध्यक्ष देवकांत बारुआ यांनी भाषणात सांगितले होते. समाजवादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शिस्तबद्ध पक्ष-संघटना उभारण्यावर त्यांचा भर होता. पण अध्यक्षांनी नुसते आवाहन करण्यापलीकडे या प्रश्नाचा गंभीरपणे विचार व कृती काँग्रेस कार्यकर्त्यांनी काहीच केलेली दिसत नाही. विस्कळीत संघटना, गटबाजी, अंतर्गत हेवेदावे हा काँग्रेसचा सर्वांत कच्चा दुवा आहे. गेल्या वर्षभरात हा दोष दूर करून शिस्तबद्ध पक्ष उभारण्याच्या दिशेने काहीही कार्य झालेले नाही. ओरिसा, पश्चिम बंगाल आणि इतर ठिकाणी काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी व संघर्षाचे चित्र हेच दर्शवीत आहे. □

---

# सोलकढी

## □ एका टकमकटोकाकडून दुसऱ्या टकमकटोकाकडे

गोपाल नीलकण्ठ दांडेकर या अर्वाच्या-सव्वा मानवाबद्दल आम्ही पुन्हा पुन्हा लिहायचे तरी किती? त्यांनी अर्धा डझन ऐतिहासिक कादंबऱ्यांची मालिका रचली, तेव्हा लिहावे लागले. त्यांना एकसष्टावे वर्ष लागले तेव्हा लिहावे लागले. त्यानंतर त्यांना साठावे वर्ष लागले, तेव्हा लिहावे लागले. त्यावेळी 'स्मरणगाथा' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले, तेव्हा लिहावे लागले. मग 'स्मरणगाथे'ला 'मॅजेस्टिक' पारितोषिक मिळाले, तेव्हा लिहावे लागले. त्यानंतर संत ज्ञानेश्वरांच्या सुगंधी जीवनावर रचलेली 'मोगरा फुलला' ही कादंबरी आली, तिच्या अभिवाचनाचे प्रयोग झाले, तेव्हा लिहावे लागले. दोन वर्षांखाली शिवराज्याभिषेकाचा त्रिशताब्दीसमारंभ साजरा झाला, तेव्हासुद्धा लिहावे लागले. या गोपाल नीलकण्ठ दांडेकरांबद्दलच अगदी अलीकडे त्यांनी लिहिलेल्या गाडगेबाबांच्या चरित्राचा प्रकाशन समारंभ झाला, तेव्हा लिहावे लागले. आणि आता तर 'स्मरणगाथे'ला चक्क साहित्य अकादमीचे श्रेष्ठ मराठी ग्रंथाचे पारितोषिक लाभले आहे.

आता गोनीदांबद्दल लिहावेच लागेल.

खरे बोलायचे तर दांडेकरांच्या ग्रंथावर श्रेष्ठतेचे शिक्कामोर्तब झाल्यामुळे मी अगदी हवालदिल झालो आहे. कारण विद्वान, निष्पक्षपाती मराठी टीकाकारांनी आणि जाणकार वाचकांनी मला एकसारखे असे बजावले होते की, हा दांडेकर हवे ते आणि हवे तेवढे लिहू दे, त्याचे लिहिणे वाटेलतितके लोकप्रिय होऊ दे; पण श्रेष्ठता श्रेष्ठता जिला म्हणतात ती त्याच्या लिहिण्याला कदापीही प्राप्त होणार नाही. इत्यलम्. मी ते खरे मानून चाललो होतो. दांडेकरांचे काही लिहिणे आवडले तरी तसे बोलत नव्हतो. भोवतालच्या जाणकारांची जाम भीती वाटायची. अनंतरावांची रसिकता तलम पोताची नसून जाडीभरडी आहे, असे त्यांनी म्हणणे मला परवडण्यासारखे नव्हते. तलम पोताच्या रसिकतेचे दांडेकरांच्या संदर्भातले सूत्र मिळाल्यावर अनंतरावांनी ते

घट्ट धरून ठवले : मग, दांडेकरांच्या लिहिण्यात, सच्च्या उत्कटतेपेक्षा लुच्चा उत्साहच कसा अधिक आहे, कलात्मक आत्मविलोभनापेक्षा गोनीदांत्मक दाखवेखोरीच कशी सांभाळली आहे, सर्वरससंपन्न खळबळते जीवन अनुभवूनसुद्धा या गोपालाचे कलात्मक व्यक्तिमत्त्व कोरडेच (आणि रडेच) कसे राहिले आहे, जाणकार वाचकांचे समाराधन करणारे अवघड साधण्यापेक्षा भोळ्याभळभळ्या सामान्य वाचकांना संतोषवणाऱ्या हिकमतीच या लेखनोपजीवी मॅजेस्टिक लेखकाने कशा सरसहा योजल्या आहेत, जो त्यांची शैली सकृद्दर्शनी नितळ भासते ती सम्यग्दर्शनी निखालस मटवी आहे हे कसे अचूक कळते, आणि एकूणच या सोंगटीएवढ्या साहित्यिकाचे सह्याद्रीएवढे असे जे काही आपल्या महाराष्ट्रात चालले आहे ते येथल्या सांस्कृतिक दिवाळखोरीचे द्योतक कसे आहे, हे मी अगदी टीकाणू तटस्थतेने परवापरवापर्यंत सांगत होतो. पण 'स्मरणगाथे' ला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाल्याची वार्ता वाचली आणि नाही म्हटले तरी मी थोडासा उचकलोच. पण थोडासाच. मराठी टीकाकारांच्या तत्परतेने मी स्वतःला सावरले. म्हटले, अरे, ही श्रेष्ठतासुद्धा सापेक्षच. त्या विशिष्ट तीन वर्षांतल्या मराठी पुस्तकातले हे त्यातल्यात्यात अधिक बरे पुस्तक. त्याने काहीच सिद्ध होत नाही.

एक विचार मनात आला : प्रा. स. शि. भावे, पुणे यांच्या नावाने 'सत्यकथा' मासिकात एक टिपण पाठवावे. त्यात, 'स्मरणगाथे'ची साहित्य अकादमीच्या पारितोषिकासाठी एकमुखी शिफारस करताना संबंधितांनी कोणते निकष लावले ते जाहीर करण्याचे आवाहन करावे. त्यामुळे बाकी काहीच झाले नाही तरी 'सत्यकथे'च्या तीनचार अंकांना काही भारदस्त मजकूर तर मिळेल. असो.

एवढे टपोरे पारितोषिक मिळाले म्हणून गोपाल नीलकण्ठ दांडेकर फुशारून जातील की काय, अशी भीती बाळगायचे मुळीच कारण नाही. आपल्या साहित्यिक परिभ्रमन्तीतल्या एका टकमकटोकाशी आलो, येणारच होतो, असे म्हणतील ते; आणि तरातरा पुढल्या टकमकटोकाकडे जायला झेपावतील.

या पारितोषिकामुळे 'मॅजेस्टिक'च्या केशवराव कोठावळ्यांचा जीव खरा सुखावेल. मी तर असे ऐकले आहे की,'स्मरणगाथे'च्या मागच्यापुढच्या नंबरांच्या पुस्तकांना 'मॅजेस्टिक' बक्षिसे द्यायचा केशवरावांचा विचार आहे!

*

## कुळकर्ण्यांची बटाटाभजी

अस्तित्ववादी, म्हणजे मराठीत ज्यांना एक्झिस्टेन्शिअलिस्टस म्हणतात ते, मानतात तेवढा माणूस खचाण्यापुचाण्या आहे, असे मला कधीही वाटलेले नाही. परमेश्वराच्या या लाडक्याने काही बाबतीत खुद्द परमेश्वरालाही लाजवले आहे; ही पृथ्वी आपल्याला राहायला सुसह्य करण्यासाठी त्याने हजारो वर्षे जो आटाच्यापिटा चालवला आहे तो निखालस कौतुकास्पद आहे, त्यातून जशी लोकशाही राज्यपद्धती त्याने निर्माण केली, तशी भजीसुद्धा निर्माण केली.

भजी ही एक अद्भुत गोष्ट आहे. तिचे नेमके वर्णन करायच्या ऊटपटांग भानगडीत माझ्यासारखा शहाणा माणूस पडणार नाही. खाणाऱ्याने ती वेळीअवेळी हवी तेवढी खावी आणि माणसाला शाबासकी द्यावी; न खाणाऱ्याने खाजकुयल्या घशाने माणसाची कीव करावी. भजी खाणारी माणसे आणि भजी न खाणारी माणसे असे माणसांचे दोन प्रकारसुद्धा मानायला हरकत नाही. (ललितलेखात असेच असते. असो.)

मी भजी खाणारा माणूस आहे. भजी हा माझा सततच्या अभ्यासाचा विषय आहे. आजवर भज्यांनी मला जो खमंग, तेलकट, चुरचुरीत, गरमागरम आनंद दिला आहे, त्याची तुलना दुसऱ्या कशानेही होणे शक्य नाही. त्यामुळे काही दिवसांपूर्वी, गिरगाव–मुंबईमधल्या कुळकर्णी उपाहारगृहातली बटाटाभजी बंद झाल्याची हाय हाय वार्ता आली तेव्हा मी पार कष्टी होऊन गेलो. 'कुळकर्णी' म्हटल्यावर मराठीतल्या टीकाकारांची फटावळच ज्यांना आठवते, त्यांच्या दुर्भाग्याला कोण काय करू शकते हो? 'कुळकर्णी' म्हटल्यावर आम्हाला मात्र ती जगप्रसिद्ध बटाटाभजीच आठवतात.

वास्तविक माझ्या जिभेला–जिवाला चटका लागतो तो कांद्याच्या भज्यांचा. पण भजी म्हणजे कांद्याचीच हा हेकटपणा मला मंजूर नाही; वांग्याची, घोसाळ्याची, भोपळ्याची, मिरचीची, ओव्याच्या पानांची, मायाळूची, कोबीची, मेथीची, मुगाची, पावाची, शेवग्याच्या फुलांची, आंब्याची, गऱ्यांची, कणकेची, फरसाणाची, करंदीची, कोलंबीची, बोंबलांची अशी भजीच भजी. खुद्द भज्यांची भजी होतात; झकास लागतात. बटाट्यासारख्या निपटनिर्गुणाची भजी कशी व्हावी अशी शंका मनी सांभाळणाऱ्याने कुळकर्ण्यांची बटाटाभजी खावी. बटाटा हा भज्यांकरताच जन्मलेला आहे असा साक्षात्कार त्याला होईल. कुळकर्ण्यांच्या बटाटाभज्यांबद्दलच्या बातमीतले दोन तपशील अत्यंत महत्त्वाचे होते. एक म्हणजे या भज्यांसाठी कुळकर्णी इटालियन बटाटा वापरतात, आणि दुसरे म्हणजे ती भजी कपाशीच्या तेलात तळलेली असतात. या असल्या बारकाव्याने माझ्या अंतःकरणाचा अनारसा होतो. 'सेक्रेटरिएट'साठी 'सचिवालय' हा प्रतिशब्द अधिक समर्पक की 'मंत्रालय,' यापेक्षा अमुक माशाच्या कालवणाला हिरव्या मिरचीची वाटणगोळी योजावी की लाल मिरचीची, यात मला कितीतरी अधिक स्वारस्य असते. असल्या बारीक नेमकेपणाने पदार्थात खाणाऱ्याला घायाळ करणारी चव उत्पन्न होत असते, हे मला आणि कुळकर्ण्यांना जसे कळले तसे सकळांना कळो.

तसे होईल अशी मला दांडगी आशा वाटते. कारण बंद झालेली कुळकर्ण्यांची भजी पुन्हा चालू झाली, अशी चविष्ट बातमी त्या पहिल्या बातमीनंतर थोड्याच दिवसांत वाचायला मिळाली. मला तर या गोष्टीत व्यापक प्रतीकात्मक अर्थ दिसतो, आणि तो मोठा शुभसूचक आहे : अहो, ज्या ठिकाणी बंद पडलेली भजी पुन्हा चालू होतात त्या ठिकाणी बंद पडलेले कोणतेही सत्कार्य पुन्हा चालू होईल, असा विश्वास वाटायला लागतो.

–अनंतराव

# राजवाडे विचारदर्शन

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांची पन्नासावी पुण्यतिथी सध्या साजरी होत आहे. त्यांनिमित्त हे राजवाडेविचारदर्शन.

'राधामाधवविलासचंपू' हे कवी जयराम पिंडेकृत शहाजी महाराजांचे चरित्राख्यान राजवाडे यांनी संशोधून, संपादून प्रसिद्ध केले व त्याला एक विस्तृत, विवेचक प्रस्तावनाही जोडली.

'राजवाडे विचार करीत तेव्हा एखादा लहान मानवगण त्यांच्या डोळ्यापुढे नसे. सबंध समाज ते कालाच्या विशिष्ट पार्श्वभूमीवर पाहू शकत असत.'

श्रीमती दुर्गा भागवत यांनी कऱ्हाडच्या साहित्य संमेलनाच्या आपल्या अध्यक्षीय भाषणात राजवाड्यांविषयी काढलेल्या या उद्गारांचा यथार्थपणा वरील प्रस्तावनेंत जागोजाग जाणवतो. मूळ प्रस्तावना दोनशे पृष्ठांची आहे. त्यातील हा अगदी थोडा भाग, वानगीदाखल येथे दिला आहे.

---

या थोर पुरुषाचे (शहाजी महाराजांचे) एकंदर साद्यंत राजकीय चरित्र थोडक्यात हे असे (प्रस्तावनेतील पूर्व भागात सांगितले) आहे. त्यावरून शहाजीचे मुख्य धोरण कांय होते व इतिकर्तव्यता कोणती होती, ते स्पष्ट होते. जयराम (पिंडे) म्हणतो त्याप्रमाणे स्वराज्य स्थापून स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा व स्वजन यांचे पालन, लालन व संरक्षण करावे, ह्यात तो आपल्या जीविताचे साफल्य मानी. आजपर्यंत अशी समजूत होती की, स्वराज्य, स्वधर्म, स्वभाषादी संरक्षण करण्याच्या कल्पनेचा प्रथमोदय शिवकाली झाला. आजपर्यंत अशी समजूत होती की, पाच्छाही नोकरी व चाकरी करून भाकरी मिळविण्यापलीकडे शहाजीची उडी गेली नव्हती. आजपर्यंत अशी समजूत होती की, संस्कृतप्राकृत भाषांना प्रथमाश्रय शिवाजीने दिला. आजपर्यंत अशीही समजूत होती की, मराठे लोकांच्या अंगी माणूसकी प्रथम शिवाजीने आणली: परंतु या कल्पना जयरामाच्या प्रत्यक्ष साक्षीपुढे व वरील कालानुक्रमिक राजकीय चरित्रापुढे ह्यापुढे टिकणे शक्य नाही. स्वराज्यस्थापनेच्या कल्पना शहाजीच्या वेळीच अत्यंत अंधुकपणे व अल्पांशाने का होईना पण उदय पावत होत्या. शहाजीच्या प्रकटपणे स्वतंत्र स्वराज्य स्थापण्याचा पहिला उद्योग शक १५५१ त लोदीच्या बंडाच्या वेळी झाला. परंतु, शहाजहानाच्या व आदिलशहाच्या जोड प्रतिरोधापुढे तो उद्योग फार काळ टिकला नाही. नंतर स्वराज्यस्थापनेचा दुसरा उद्योग शक १५५५ त निजामशाहीत पुनरुज्जीवित करून तिची पेशवाई करता करता व विशेष वैपुरीत्य भासू न देता राजकीय प्रसंगांच्या सहज ओघात राज्यासन स्वतः आक्रमिण्याचा होता. तोही शहाजहानाच्या प्रबल विरोधामुळे व महमदशहाच्या नरमपणामुळे साधला नाही. नाही तर, त्याच वेळी प्रच्छन्न स्वराज्यस्थापनेचा योग बहुतेक जुळून आला होता. राज्यस्थापनेचा हा दुसरा बार हुकल्यावर, शहाजीने पुन्हा दहा वर्षे खटपट व जुळवाजुळव करून स्वराज्याची कर्नाटकात पुन्हा तिसऱ्यांदा रचना केली व ती त्या वेळी साधली. कारण त्या कामी शहाजहानासारख्या प्रबल शत्रूचा प्रतिबंधही नव्हता आणि शिवाजी व संभाजी यांच्या शस्त्रप्रहाराने आदिलशहा हतप्रभही झाला होता. परंतु ह्या कर्नाटकातल्या स्वराज्यात व भीमगडच्या स्वराज्यात महदन्तर होते. कर्नाटकातले शहाजीचे स्वराज्य म्हणजे परक्या कानडी लोकांवरचे परक्या मराठ्यांचे राज्य आणि भीमगडचे स्वराज्य म्हणजे मराठ्या लोकांवरचे म्हणजे स्वजनांवरचे मराठ्यांचे राज्य. असे हे कर्नाटकातल्या स्वराज्यात व्यंग होते. परंतु परिस्थितीपुढे त्याला काही उपाय नव्हता. शहाजीच्या ह्या कानडी स्वराज्यात दुसरी एक अशी गोम होती की, आदिलशाहीपासून शहाजीचे स्वराज्य धक्काबुक्की होऊन तुटून विभक्त झालेले नव्हते; म्हटले तर स्वतंत्र, म्हटलें तर परतंत्र अशा लिवलिवीत स्थितीत होते. परंतु, शहाजीला ज्या परिस्थितीतून रस्ता काढावयाचा होता त्या परिस्थितीतून ह्याहून श्रेष्ठ फल तत्काल मिळण्यासारखे नव्हते. आस्ते आस्ते कालांतराने अलगद हातात आपण होऊन पडण्यापैकी होते. आणि तो प्रकार पुढे झालाही. परंतु राज्याक्रमणाचे हे दोन्ही प्रकार यद्यपि स्वल्पिष्ट घर्षणाचे असले तत्रापि परिणामी कर्त्याला गौणत्व आणून कधीकधी अडचण उत्पन्न करणारे असतात. दुर्बल राजाची पेशवाई किंवा सरलष्करकी करता करता, त्याला हळूच ढकलून देणाऱ्या स्वराज्यस्थापकावर कृतघ्नतेचा व स्वामिद्रोहाचा आरोप प्रतिपक्षी आणू शकतात व ते आरोप निमूटपणे ऐकून घ्यावे लागतात. मूळ धन्याचे मांडलिकत्व पत्करिता पत्करिता ते प्रसंगी झुगारून स्वराज्य स्थापण्याचा प्रकारही असाच स्वामि-

द्रोहाच्या आरोपास पात्र होतो. कर्नाटकातील स्वराज्यस्थापनेतील हे गौणत्व शहाजी जाणून होता. करता, मिंधेपणाचा गंधही ज्या स्थापनेत आढळून येणार नाही, असे स्वराज्य दादाजी कोंडदेव, जिजाबाई व शिवाजी यांच्या द्वारा शहाजीने चौथ्यांदा स्थापिण्याचा उद्योग बंगळूराहून पुणे प्रांती करविला. आदिलशाहीशी व मोगलाईशी फटकून वागून, हा उद्योग मुद्दाम जाणूनसवरून करण्यात आला. अशाकरता की, ह्या उद्योगावर स्वामिद्रोहाचा किंवा कपटकूटाचा आरोप प्रतिपक्षांना आणण्याची बिलकुल सोय राहू नये. पुणे प्रांतातील हे स्वराज्य स्वजनांचे स्वजनांवर असल्यामुळे ते टिकाऊ, भरीव व चिरंजीवी होऊन, मनमोहक व आदरणीय झाले. महाराष्ट्रातील ह्या चौथ्या स्वराज्यस्थापनेचे सर्व श्रेय शिवाजीच्या पदरात पडले हे खरे. परंतु, मूळ कल्पना व योजना शहाजीची असल्यामुळे, शहाजीलाही ह्या श्रेयाचा वाटेकरी करणे इतिहासास प्राप्त आहे. पिंगळे, अत्रे, दादाजी, पानसंबळ, रोझेकर, जेधे, बांदल, हे सर्व मुत्सद्दी व सरदार शहाजीचे, जहागीर शहाजीची, तोफा, हत्ती, घोडे वगैरे किल्लोकिल्ली व ठाणोठाणी साठविलेला जंगी सरंजाम शहाजीचा. त्यांच्या जोरावर शिवाजीने आपली इमारत मूळ रचिली. आकाशातून पडला आणि धावायला लागला, अशातला काही प्रकार शिवाजीचा नव्हता. बापाच्या खांद्यावर उभा राहून शिवाजी पहिल्यांदा उच्चासनस्थ झाला. निंबाळकर, मोहिते, जाधव, महाडीक, गायकवाड इत्यादी थोर मराठा कुळांशी शहाजीचा पिढीजात शरीरसंबंध असल्यामुळे, शहाण्णव कुळीतील नामांकित मराठ्यांचे साहाय्य मिळाले. तात्पर्य, दरबारी मुत्सद्दी, लष्करी सरदार, लढाऊ सामान, शहाण्णव कुळींच्या जेधे आदिकरून मराठ्यांचे साहाय्य व शहाजीच्या नावाचा दरारा व दिमाख, ह्या देणग्या शहाजीकडून शिवाजीस मिळाल्या. शिवाय अडचणीच्या प्रसंगी वेळोवेळी शहाजीची मदत शिवाजीस पोहोचत असे ती निराळीच. शक १५८३ तील शिवाजीचा आदिलशहाशी तह शहाजीने आपण होऊन घडवून आणला. ह्या सगळ्याचा मथितार्थ एवढाच की, स्वराज्यस्थापनेचा धागा शहाजीच्या अर्थपासून इतिपर्यंतच्या सबंध चरित्रात शक १५५१ पासून शक १५८३ पर्यंत अनुस्यूत झालेला आढळतो. पहिला १५५१ तला स्वराज्यस्थापनेचा प्रकट प्रयत्न चार-सहा महिन्यांत आटोपला. शक १५५५ तील दुसरा प्रच्छन्न प्रयत्न शहाजहानाने हाणून पाडिला. शक १५७० तील कर्नाटकातील मांडलिकी राज्यस्थापनेचा तिसरा प्रयत्न बराच सफल झाला. परंतु शिवाजीच्या द्वारा सुरू केलेला शक १५६२ तील पुण्याकडील पूर्णपणे स्वतंत्र स्वराज्यस्थापनेचा चौथा प्रयत्न मात्र अंदाजाबाहेर फलद्रूप झाला.

## साधनांची जमवाजमव

धोरण व इतिकर्तव्यता ह्यांचा खुलासा झाल्यानंतर, ज्या साधनांच्या चाकांवर धोरण व इतिकर्तव्यता यांचा गाडा चालवणे शक्य होते व ज्या साधनांच्या अभावी मनांतले थोर राजकीय विचार जागच्या जागी शुष्क होऊन जातात त्या साधनांची निर्मिती व जोपासना शहाजीने कशी केली तेही शोधणे क्रमप्राप्त होते. एवढे मोठे हजारोने मोजता येण्यासारखे प्रबल सैन्य शहाजीने कोठून आणिले आणि त्याला रोजमुरा कोठून दिला हा साधनसंबंधक पहिला प्रश्न. आणि दोनतीन वेळा स्वराज्यसाधनिकेत फसला असता खचून न जाता उत्तरोत्तर ज्या नव्या दमाने शहाजी कामास लागलेला दिसतो तो दम त्याला कोठून पैदा झाला हा दुसरा प्रश्न. हे प्रश्न सोडविताना प्रथम लक्षात धरले पाहिजे की, शहाजी हा प्राधान्ये करून व्यवहारचतुर मुत्सद्दी होता, केवळ कल्पनातरंगावर वाहवत जाणारा शेखमहंमद नव्हता. त्याच्या आधी व त्याच्या काली राष्ट्र सुधारण्याचे प्रयत्न करणारे शेखमहंमद थोडेथोडके झाले नव्हते. कली मातला, सबंध समाजाला दैन्य आले व ते भोगिल्याखेरीच गत्यंतर नाही, असे रडगाणे गाऊन स्वस्थ बसणारे ऐदी किती तरी होते. विठोबा सर्व काही योग्य वेळी नीट करील, त्याला जनतेची काळजी आहे, असे समाधान करून घेणारे भक्तिमार्गी तर असंख्य होते. मुसुलमानी पेहराव, मुसुलमानी चालीरीती, मुसुलमानी भाषा व मुसुलमानी धर्म स्वीकारून समाजाच्या यातना बंद करू पाहाणारे किती तरी हिंदू प्रांतोप्रांती पीर होऊन बसले होते. यवनांवर रुसून, त्यांच्याशी व्यवहार बंद करून त्यांचे मुखावलोकन न करणारी दासोपंतादी मंडळीही आपल्याकडून यवनांच्या पारिपत्याचे प्रयत्न करीतच होती. यवनसेवा करून जनतेचा परामर्ष घेऊ पाहाणारे दामाजीपंतही अनेक होऊन गेले. यवनांविरुद्ध बंड करून स्वराज्य मिळविणारेही काही वेडे निपजले. मंत्रतंत्रांनी यवनांना स्तंभित करण्याचा कित्येकांचा खटाटोप होता. यज्ञयागांचा व देवदेवालयांचा जीर्णोद्धार करून धर्मसंरक्षण करण्यात कित्येकांनी सर्वस्व खर्चिले. गोरक्षण करून प्रजेत जोम उत्पन्न करू पाहाणारे गोरखनाथीही देशात वावरत होते. कथाकीर्तने व रामायणभारते देशभाषेत बनवून देशातील लोकांच्या अंगी स्फुरण चढवू पाहाणारे कीर्तनकार व ग्रंथकार तर त्याकाळी शेकडोंने मोजावे लागत. असे नाना प्रकारचे बरेबुरे उपाय जो तो आपापल्या परीने करीतच होता. परंतु असले हे सर्व उपाय तीनशे वर्षे करूनही यवनांचे काडीमात्र कोणी नुकसान करू शकले नाही. तेव्हा जो तो समाधान असे करून घेई की, बी रुजत घातले आहे, ते योग्य वेळी रुजून त्याला फळे आल्याशिवाय राहणार नाहीत. ही भविष्यवादी विचारसरणी निरुत्तर करणारी असल्यामुळे, भविष्यकाळी तिची साफल्यता अनुभवास यावयाची असल्यामुळे, व भविष्यकाळाला अंत नसल्यामुळे, ह्या आशेची निराशा तीनशे वर्षे निघून गेली तरीही कधीच झाली नाही. अशातला आशावादी शहाजी नव्हता. तो पक्के जाणत होता की, यवनांचे राज्य हे विधर्मी परदेशी अल्पसंख्याकांचे राज्य आहे, ते हिंदूंच्या हत्यारांहून श्रेष्ठतर हत्यारांच्या जोरावर व जरबेवर चालले आहे, आणि ह्या परदेशी अल्पसंख्याक राज्यकर्त्यांत आपसातील यादवीमुळे किंवा ऐषआरामोत्पन्न असल्यामुळे दौर्बल्य निर्माण झाल्यासही त्यांच्याहून श्रेष्ठतर, निदान त्यांच्या बरोबरीची हत्यारे, जित लोकांनी पैदा केल्याशिवाय, त्यांचा पाडाव होणे अशक्य आहे. तो हेही आणखी स्वानुभावाने जाणत होता की, हिंदुस्थानात व महाराष्ट्रात अशा किती तरी लढाऊ जाती आहेत की, ज्या वाटेल त्या स्वधर्मी किंवा परधर्मी धन्याची लष्करी नोकरी करून केवळ भाकरीकरिताही स्वतःचा प्राण देण्यास व दुसऱ्याचा घेण्यास एका पायावर तयार आहेत. तो हेही पाहात होता की, महाराष्ट्रातील एकाच गावातल्या व एकाच कुळातल्या व गोतातल्या भाऊबंदांपैकी काही लोक मराठ्या सरदारांच्या लष्करी तैनातीत आहेत व काही मुसुलमान सरदारांच्या व बादशहांच्या लष्करी

तैनातीत आहेत आणि त्यांपैकी कोणीही धन्याच्या देशाची, राष्ट्राची, धर्माची, हेतूची किंवा कशाचीच विचारपूस, इष्टनिष्टता, आवडनिवड किंवा श्रेष्ठकनिष्ठता पाहात नाही. स्वतःचे भोसले कूळ पाहावे तर, तो व त्याचा बाप हे निजामशाही नोकर होते, त्यांचे चुलतभाऊ मोंगलाई नोकर होते व त्याचे कुळभाऊ आदिलशाही व बेरीदशाही सैन्यात होते. अशा स्थितीत स्वतःचा स्वतंत्र पक्ष, स्वतःची स्वतंत्र फौज व स्वतःची श्रेष्ठतर हत्यारे कशी निर्माण करावी ह्या तीन बाबींचा त्याने खल केला. पक्ष निर्माण करणे म्हणजे ज्यांचा पक्ष निर्माण करावयाचा त्यांच्यात कोणती तरी सामान्य आकांक्षा अस्तित्वात असली पाहिजे. धर्म, जाती, देव, देश ही चार स्थाने उत्तम पुरुषांच्या ठायी समान आकांक्षेचे विषय होऊ शकतात. परंतु त्या काळी मराठ्यांच्या मनोरचनेत ह्या स्थानांना, बिलकुल म्हटले तरी चालेल, अवकाश नव्हता. अशा द्विपाद पशुतुल्य अधम लोकात समानबंधनत्व फक्त एकच सापडण्याजोगे होते. ते हेच की, ह्या द्विपादांच्या पोटापाण्याची व्यवस्था करून त्यांना आपल्या हुकमतीत बैलाप्रमाणे किंवा गाढवाप्रमाणे राबविणे आणि मनाजोगी कामगिरी करून घेतल्यावर दोन ममतेचे शब्द बोलून पाठ थोपटणे. तात्पर्य, पोटाला भाकर देणारा धनी हा ह्या अधम संस्कृतीच्या लोकांचा समानबंधनत्वाचा विषय होता. तो पाठीवर असला म्हणजे हे लढावयाचे, तो मेला किंवा पळाला तर पोटाच्या भीतीने हे पळावयाचे. लढाईत धनी मेला की हिंदुस्थानातील शिपुर्डी पळ का काढितात, याचे खरे बिंग न कळल्यामुळे, अनेक परकीय इतिहासकार या पळकुट्यांना भेकड म्हणतात. परंतु हे म्हणणे अवास्तव आहे. हिंदुस्थानातील शिपायांना मरणाचे भय इतके वाटत नाही. त्या पशूंना मुख्य भय पोटाचे. धनी मेल्यावर, पोटाला घालणारा मेला, म्हणून हे लोक पोटाला घालणारा दुसरा धनी पाहाण्याकरिता जीव बचावून पळतात. अशी ही ह्यांच्या पलणाची मीमांसा आहे. शहाजी हे सर्व जाणून होता. शहाजीस ह्या लोकांना पदरी बाळगण्याची म्हणजे आपल्या फौजेत त्यांची भरती मनसबदार ह्या नात्याने राजरोस करण्याची मुभा होती. हे सैन्य जमवून स्वपक्ष निर्माण करण्याच्या कामी मनसबदारी त्याच्या आयती पथ्यावर पडली. तो मनसबदार नसता व आपल्या पाटिलकीच्या गावी पाटील किंवा देशमुख म्हणून असता व फौज जमविण्याचा उद्योग करता, तर त्याची गणना बंडखोर पुंडांत झाली असती व त्याचे शासन ताबडतोब झाले असते. जुलमी परकीय राजांचा नाश करावयाचा म्हटला म्हणजे त्यांची नोकरी करून व विश्वास संपादून योग्य समयी त्यास गचांडी देण्याचा मार्ग जित लोकांना सदा श्रेयस्कर, सुरक्षित व न्याय्य गणलेला आहे. तो मार्ग शहाजीच्या बापाने चोखाळून आपल्या मुलाला साफ करून ठेविला होता. तात्पर्य, निजामशाही मनसबदार असल्यामुळे त्याला फौज बिनबोभाट जमविता येणे सहज झाले होते. आणि ही फौज म्हणजेच शहाजीचा पक्ष बनला होता. साधनांपैकी पक्ष आणि फौज बापाच्या मृत्यूनंतर त्याच्या हुकमतीत आल्यावर, शहाजीने आपल्या गोड वागणुकीने फौजेला आपली इतकी काही ममता लाविली की बखरकार लिहितो, फौजेतील शिपायाला व अंमलदारांना असे वाटे की नोकरी करावी तर ती राजा शहाजीची करावी, शहाजी केवळ आपला मायबाप आहे. मायेने असा आपलेपणा फौजेत उत्पन्न केल्यावर शहाजीने पाहिले की केवळ मायेनेच सर्व काम भागत नाही व माया पोटभर दाखविली म्हणजे शिपाई जास्त कर्तबगार होतो अशातलाही अर्थ नव्हे. मायेने फार तर शिपाई इमानी बनेल. परंतु इमानाइतकीच कर्तबगारीची किंमत असल्यामुळे, आपल्या फौजेची कर्तबगारी व कार्यक्षमता जेणेकरून वृद्धिंगत होतील ते साधन शहाजीने पैदा करण्याच्या योजना केल्या. ते तिसरे साधन म्हणजे श्रेष्ठतर हत्यारे.

### हत्यारांचे महत्त्व

हत्यार चोख पाहिजे आणि ते प्रतिपक्षाच्या हत्याराहून श्रेष्ठतर पाहिजे, ह्या बाबीची जाणीव शहाजीच्या ठायी स्वकालीन अनुभवाने अत्युत्कट बाणलेली होती. पूर्वेतिहासही त्याला तेच शिकवीत होता. कोणत्याही राष्ट्राच्या संस्कृतीचा श्रेष्ठकनिष्ठपणा त्या राष्ट्राच्या हत्याराच्या स्वरूपावरून ओळखता येतो. फार काय सांगावे, हत्यार हे राष्ट्राच्या एकंदर संस्कृतीचे मापक आहे. जशी ज्या राष्ट्राची संस्कृती तसे त्या राष्ट्राचे हत्यार. पशुपक्ष्यांची हत्यारे म्हणजे नांग्या, दात, नखे, खूर, सोंडा, शेपट्या, पिसे वगैरे त्यांचे अवयव होत. त्याहून उच्चतर कोटीतला वानर क्वचित धोंडे, फांद्या, वगैरे सहजोपलब्ध बाह्य साधनांचा उपयोग करू शकतो. त्याहून श्रेष्ठ जो अर्धवट रानटी माणूस, तो गारेच्या बोथाट्या वगैरे ओबडधोबड दगडी हत्यारे घासून तयार करतो व प्रसंगी उपयोगी पडावी म्हणून संग्रही जमा करून ठेवितो आणि पशुपक्ष्यादींचा संहार करतो. त्यांच्याहून श्रेष्ठ पाथरीचा आर्य माणूस खाणी खणण्याचा व त्यातून तांबे, लोखंड वगैरे धातू काढण्याचा शोध लावितो व त्या धातूंचे भाले, बरच्या, तिरांचे फाळ, सुऱ्या, वगैरे धारेची दूरवर फेकता येण्याजोगी हत्यारे बनवितो व केवळ आंगलट करून झोंबाझोंबी किंवा मारामारी करणाऱ्या अर्धरानटी समाजाला जिंकून गुलाम बनवितो. धनुर्धारी राम ह्या खनिकर्मकुशल आर्यांपैकी होता व तो आपल्या शेकडो लोखंडी बाणांनी एतद्देशज रानटी भिल्ल, गोंड, कातकरी, राक्षस, वगैरे लोकांचा नायनाट करी व त्यांपैकी कित्येकांना शूद्र करून आपली काबाडकष्टाची कामे करवी. लोखंडी बाणाहूनही दूर पल्ल्याच्या हत्यारांचा म्हणजे दारूने उडणाऱ्या वेळूच्या कांडांचा शोध लावणाऱ्या आर्यांनी केवळ लोखंडी तीराने लढणाऱ्या आर्यांचा पराभव करून आपले रसायनमिश्रणज्ञान जगाच्या अनुभवास आणिले. त्याही पुढे मजल मारून लोखंडी नळयांत दारू अर्ध्या पाव कोसावरून शत्रूचा पाडाव करणाऱ्या मुसुलमानांनी ख्रिस्ती, हिंदू, वगैरे कनिष्ठ संस्कृतीच्या लोकांचा पराभव केला. पुढे युरोपियन लोकांनी नाना शास्त्रीय शोधांच्या द्वारा नेमके काम करणाऱ्या व दूरवर पल्ल्यांच्या तोफा, बंदुका, वगैरे संगीन हत्यारांच्या जोरावर मुसुलमानांची युरोपातील स्पेन वगैरे देशांतून हकालपट्टी केली व पृथ्वीवरील अमेरिका, आफ्रिका व हिंदुस्थान हे देश जिंकण्याची खात्रीपूर्वक हिंमत बांधिली. एवढी मोंगलांची अफाट व प्रबळ सत्ता, परंतु पोर्तुगीझ चाच्यांनी कितीदा तरी समुद्रावर त्यांची इज्जत घेतली. ह्याच काळी कुस्तुतुनियाच्या तुर्कांनी व्हेनिशियन लोकांपासून श्रेष्ठ बंदुका व तोफा आणि दारूगोळा तयार करण्याची सर्वश्रेष्ठ कला अर्धीमुर्धी व उष्टीमाष्टी किंचित आपलीशी केली होती. त्या अर्धवट तुर्क कारागिरांना पदरी ठेवून, दिल्लीचा मोंगल व दक्षिणेतील शहा

हत्यारे व दारूगोळा बनवून त्याच्या जोरावर देशातील अर्धवट सुधारलेल्या टाळकुटया हिंदूना व परस्परांना भिवडवीत असत. ह्या सर्व चमत्कार शहाजी पाहात होता. उत्तम कारागीर हत्यार कोठून पैदा होते व कोण आणून देते ह्याचा अनुभव जुन्नरच्या घाटाखालील कोकणात त्याला आला होता. दमण, दीव, वसई, गोवा, सुरत, तेलीचेरी इत्यादी स्थलींच्या टोपीवाल्यांकडून कारीगार हत्यारे पैदा करून निजामशाही, आदिलशाही व मोंगलाई सैन्याहून शहाजी आपली फौज जास्त कर्तबगार ठेवू लागला. अशा तऱ्हेने पक्ष, सैन्य व हत्यार शहाजीने निर्माण केले आणि त्यांच्या जोरावर प्रगट स्वराज्य, प्रछन्न स्वराज्य, मांडलिकी स्वराज्य व निर्मळ स्वतंत्र स्वराज्य उत्तरोत्तर स्थापित असता, वेळोवेळीं येणाऱ्या विपत्तीत दम न सोडता पूर्वीच्याहून जास्त हुरूपाने पुढील कर्तव्य तो बजावीत राहिला. सैन्य व हत्यार ह्यांच्यावरील त्याचा विश्वास मोठ्या विपत्तीतही कधी ओसरला नाही. शेवटी ह्या साधनांच्या जोरावर आपण विजयी होऊच होऊ अशी त्याची बालंबाल खात्री होती व परिणामावरून पाहाता ही खात्री साधार होती. शहाजीच्या अलौकिक निर्धाराची व दमाची ही अशी मीमांसा आहे.

## सगळेच आंधळे !

येथे एक अनुषंगिक प्रश्न असा निघतो की, टोपीवाल्यांकडून कारीगार बंदुका, तोफा व दारूगोळा जो शहाजी घेई तो त्याने महाराष्ट्रात स्वावरहुकूम बनविण्याची व्यवस्था का केली नाही ? अथवा शहाजीचा मुलगा शिवाजी त्याने तरी का केली नाही ? किंबहुना बाजीराव बल्लाळ, बाळाजी बाजीराव व नाना फडणवीस ह्या गृहस्थांनी का केली नाही ? उत्तम हत्यारांकरिता दुसऱ्यांचे मिंधे राहाण्याची लज्जा यांना कधी वाटली नाही ? प्रश्नाला उत्तर एकच आहे व ते अगदी साधे आहे. ते हे की, उत्तम, रेखीव व नेमके हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्वतयारी राष्ट्रात व्हावी लागते ती त्या काली महाराष्ट्रात नव्हती. शहाजीच्या ह्यातीत युरोपात डकार्ट, बेकन, इत्यादी विचारवंत सृष्टपदार्थ संशोधन कार्याचे चाली जारीने पंचभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते. आणि आपल्या इकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपटनिरंजन इत्यादी संत पंचभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारात राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटीत होते. अशांना स्क्रू, टाचणी, बंदूक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यात नवल कसचे ? थोडक्यात, आगस्ट कोंट यांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे महाराष्ट्र त्या काळी metaphysical अवस्थेत होते आणि positive अवस्थेत येण्यास त्याला अद्याप पाचशे वर्षे अवकाश होता. म्हणजे शक २००० च्या सुमारास महाराष्ट्र positive बनणार होते. अशा अवस्थेत आपल्याला बनविता येत नाहीत ती श्रेष्ठ हत्यारे दुसऱ्याकडून विकत घेण्याखेरीज गत्यंतर नव्हते. सध्या महमन्द, आफ्रीडी, चित्राळी, अफगाण, इराणी इत्यादी अर्धसुधारलेल्या लोकांची जी अवस्था आहे तीच आपली शहाजीच्या काळी होती. उत्तम जर्मन, फ्रेंच किंवा रशियन बंदूक घेऊन जो आफ्रीडी माणूस चोऱ्या, दरोडे व हल्ले करतो, त्याहून शहाजीकालीन मराठा जास्त सुधारलेला होता हे खरे. परंतु शस्त्राकरिता तो युरोपियनांचा आफ्रीडीच्या इतकाच परावलंबी होता. ह्या परावलंबित्वाचा अर्थ शहाजीच्या काळी कोणाच्या लक्षात कितपत आला असेल ते सांगण्यास साधन नाही. परंतु विष जे आहे ते जाणून खा की, नेणून खा, आपला अंमल केल्याशिवाय जसे राहात नाही, तसेच ज्याचे हत्यार त्याचे राज्य हा नियम – कोणाला समजो की, न समजो – आपले कार्य केल्याशिवाय राहात नाही. अर्थात, मूळ हत्यार तयार करणारे जे फिरंगी, फ्रेंच, डच किंवा इंग्रज वगैरे युरोपियन त्यांना राज्य कमावून देण्याकरिता नजाणतेपणे शहाजी जिवापाड मेहनत करीत होता असा याचा अर्थ झाला. आणि हा अर्थ शहाजी व त्याचे ब्राह्मण मुत्सद्दी यांच्या लक्षात यावा तसा नव्हे तर मुळीच आला नाही. ज्या दिवशी व्हास्कोने कालिकतच्या चामुरीच्या थोबाडीत मारली तोच हिंदुस्थानचे साम्राज्य युरोपियनांच्या हातात जाऊ लागण्याचा पहिला दिवस होय. मूठभर फिरंगी लोकांनी एका हिंदू राजाला पहिले छूट कुंठित करावे असे त्यांच्याजवळ कोणते बरे सामर्थ्य होते ? काय त्यांना दहा तोंडे व वीस हात होते ? की ते इजार नेसत होते व बायबल पढत होते म्हणून ते इतके प्रबल झाले ? तर अनेक शोधांच्या साहाय्याने सिद्ध झालेली जी लांब पल्ल्याची कारीगार हत्यारे त्यात त्यांचे सामर्थ्य होते. ही हत्यारे म्हणजे युरोपियन शास्त्रीय संस्कृतीचा केवल निष्कर्ष होत. ह्या हत्यारांच्या जोरावर एक युरोपियन हजार हिंदुमुसलमानांना भारी होता. हा अर्थ शहाजीसारख्या धोरणी, दूरदर्शी, मतलबी व जागरूक सरदारांच्या लक्षात न यावा अशीच तत्कालीन महाराष्ट्र समाजाची स्थिती होती. तेव्हा दोषाचा वाटा शहाजीप्रमाणेच तत्कालीन समाजावर पडतो, हे उघड आहे. सगळेच आंधळे, त्यात एकालाच सुळावर चढविण्यात मतलब काय ? ह्या बाबीत शहाजीच्या पंक्तीस अकबर, शहाजहान, मीरजुमला व औरंगझेब असे सारेच बसतात. तेव्हा हा तत्कालीन भारतवर्षीय संस्कृतीतलाच सर्वसाधारण दोष होय, हे कबूल करावे लागते.

हा एक सर्वसामान्य दोष सोडला तर दुसरा कोणताही मूढ दोष शहाजीच्या चरित्रात दिसून येत नाही. पक्ष, सैन्य, हत्यार ही तीन साधने जुळविण्यात शहाजीने जशी मेहनत घेतली तशीच मुख्य धनी बुऱ्हाणशहा त्याची मर्जी संपादण्यातही शहाजीने बहुत चातुर्य दाखविले. मलिकंबर, फतेखान, जाधवराव, इत्यादी साऱ्यांना मागे सारून बुऱ्हाण निजामशहाच्या गळ्यातील केवळ ताईत शहाजी झाला. त्यामुळे आपले राज्यस्थापनेच्या हेतूची सिद्धता करण्याचे त्याचे काम बरेच सुकर झाले. दुसऱ्याच्या मनात शिरून त्याला आपला करण्याची करामत शहाजीच्या इतकी तत्कालीन ऐतिहासिक व्यक्तीत फारच थोडयांच्या ठायी आढळण्यात येते.

शहाजीचे उत्तरचरित्र म्हणजे शक १५६२ पासून शक १५८५ पर्यंतच्या तेवीस वर्षांतील चरित्र शिवाजीच्या तत्कालीन चरित्राशी समान्तर आहे, आणि समान्तर आहे इतकेच नव्हे तर शिवाजीच्या चरित्राचे प्रोत्साहक आहे. शहाजी, दादाजी कोंडदेव, हणमंते, पिंगळे, पानसंबळ, जिजाबाई, इत्यादींनी शिवाजीच्या चरित्राला स्वतंत्र स्वराज्योन्मुख वळण देण्याची शिस्त कशी बांधून दिली ते शहाजीच्या चरित्रातील उत्तरकालीन खटपटीवरून स्पष्टपणे नजरेस येते. तेव्हा आता असा प्रश्न येतो की, शहाजी वगैरेंनी जर शिवाजीचा स्वतंत्र स्वराज्य आक्रमिण्याचा मार्ग आखून ठेविलेला होता, तर रामदासाचा शिवा-

जीच्या चरित्रावर कोणता परिणाम घडला? अथवा ह्याच प्रश्न दुसऱ्या तऱ्हेने असा विचारिता येतो की, महाराष्ट्र राज्य–संस्थापनेत रामदासाचे कार्य काय? ह्या प्रश्नाचे उत्तर देताना, दुसरा एक प्रश्न विचारात घेतला असता, प्रश्नाचे उत्तर शोधण्याचें काम साधे होते. दुसरा प्रश्न असा :–रामदास झाला नसता, तर स्वराज्यसंस्थापनेच्या कार्यात काय व्यंग राहिले असते? कारण रामदास झाला असता किंवा झाला नसता, तथापि शहाजीने योजिल्याप्रमाणे शिवाजीने स्वतंत्र स्वराज्य स्थापिलेच होते व स्थापिलेच असते. रामदासाच्या शिकवणीने शिवाजीच्या स्वराज्यसंस्थापनेच्या रूपात असा कोणता स्पृहणीय फरक पडला की ज्यामुळे शिवाजीने व शिवोत्तर मराठ्यांनी रामदासाचे सदा ऋणी राहावे? शहाजीने गोब्राह्मणप्रतिपाल, वैदिक संस्कृतीचे संगोपन, संस्कृत, मराठी, हिंदी वगैरे भाषांचे संवर्धन, देवालयादींचा जीर्णोद्धार, वगैरे हिंदू संस्कृतीची प्रोत्साहक कृत्ये थोडीफार, परिस्थितीला सांभाळून, आरंभिलीच होती, ती शिवाजीने, रामदास नसता तरी, जास्त प्रमाणावर चालविली असती ह्यात बिलकुल संशय नाही. सध्या देखील शिवाजीचा मोठेपणा गाताना ह्याच कृत्याचा प्रामुख्याने आपण उल्लेख करतो की नाही? मग ह्याहून आणिक कोणते महत् कृत्य शिवाजीकडून रामदासाने करवून घेतले? असा आक्षेप प्रस्तुत प्रकरणी घेता येतो. ह्या आक्षेपाला उत्तर असे आहे की, शहाजीला जे करता आले नाही, असे एक कृत्य करण्याची सल्ला रामदासाने शिवाजीला दिली आणि तसली सल्ला रामदासापर्यंत दुसऱ्या कोणीही शहाजीला किंवा शिवाजीला दिली नाही. आजपर्यंत शहाजीच्या कारकीर्दीत काय होत असे की, देशातील मराठ्यांची बहुतम संख्या यवनादींची सेवा करण्यात पाप मानावयाच्या ऐवजी प्रायः भूषणच मानीत असे. तो देशघातक व राष्ट्रघातक ओघ बदलून, देशातील सर्व मराठा असेल नसेल तेवढा एका ठायी म्हणजे स्वराज्याच्या ठायी मेळवावा, ही उच्चतम राष्ट्रीकरणाची सल्ला रामदासाने शिवाजीस दिली. शहाजीच्या सैन्यात मराठा, पुरभय्या, पंजाबी, हिंदू, मुसलमान, बेरड, वगैरे सर्व जातींचे लोक सरदार असत व सर्व जातींचे लोक ठेविल्याशिवाय शहाजीला परिस्थितीमुळे गत्यंतरही नव्हते. शिवाजीला रामदासाने एकजात मराठे सरदार व शिपाई ठेवण्याची सल्ला दिली. ती अशाकरिता दिली की, स्वराज्य आपले आहे व तत्प्रीत्यर्थ जीव खर्ची घातला असता, महाराष्ट्र धर्म टिकावयाचा आहे, अशी बुद्धि बाळगण्यात प्रत्येक मराठ्याला अभिमान वाटावा. आजपर्यंत मोगलादींच्या सैन्यात मराठे असत, परंतु धनी मारला गेल्यास, कशाकरिता लढावयाचे ते न समजून ते प्रायः सैरावैरा पलायन करून इतस्ततः पांगत असत. आज ह्या धनी तर उद्या तो, असा त्यांचा व्यवहार सुटून, सर्व मराठ्यांच्या ठायी कोणता तरी प्रबल सामान्यधर्म उत्पन्न व्हावा व धनी गेला, मेला किंवा पराभूत झाला, तथापि सामान्यधर्माच्या बचावाकरता मराठ्यांनी जास्तच आवेशाने प्राण खर्ची घालावे, एतदर्थ रामदासांनी शिवाजीस ही बहुमोल सल्ला दिली व त्या चतुरस्त्र मुत्सद्द्याने व वीरपुरुषाने ती सर्वांशाने यद्यपि नव्हे तथापि बरीच अमलात आणिली. मराठा तेवढा मिळवावा आणि आपुला महाराष्ट्र धर्म राखावा व वाढवावा ह्या उपदेशाची देणगी रामदासांनी शिवाजीला व तत्कालीन मराठ्यांना दिली, म्हणजे महाराष्ट्रात रामदासांनी राष्ट्रीयत्व व राष्ट्रभावना म्हणून जी म्हणतात ती उत्पन्न केली. कल्पक रामदास व कर्ता शिवाजी ह्या महाराष्ट्रधर्माच्या ऊर्फ राष्ट्रभावनेच्या समानधर्माचा मराठ्यात अवतार झाल्याने, शिवाजीच्या पश्चात संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दीत, धनी नसताही, मराठा सरदारांनी औरंगझेबाला मट्टघास आणिले. ही राष्ट्रभावना जर नसती–आणि नाही अशी औरंगझेबाची प्रथम कल्पना होती–तर शिवाजीच्या मृत्यूनंतर त्याने स्थापिलेले राज्य थोड्याच दिवसांत लयास गेले असते. आता रामदासाला प्रथम कल्पक म्हटल्याने व शिवाजीला कर्ता म्हटल्याने असे समजावयाचे नाही की, महाराष्ट्र धर्माची म्हणजे समान राष्ट्रधर्माची जाणीव शिवाजीच्या ठायी मूलतः अगदीच नव्हती. शिवाजीच्या ठायी ही कल्पना अभाव रूपाने म्हणजे यवनांच्या द्वेषरूपाने बाळपणापासूनच होती. इतकेच की, तिला भावरूप अद्याप आले नव्हते. ते रामदासांनी उच्चस्वराने पुकारिल्यामुळे व त्याची सोपपत्तिक तत्त्व म्हणून मांडणी केल्यामुळे, भावरूपाने म्हणजे मराठ्यांची एकजूट करण्याच्या रूपाने शिवाजीच्या मनात उत्कटत्वाने वास करते झाले. रामदास नसते, तर शिवाजीने हे राजकीय तत्त्व शोधून काढले असते की, नसते, हा वाद घालण्यात काही हाशील नाही. कदाचित काढले असते व कदाचित काढले नसते. रामदास नसते आणि शिवाजीने ते स्वतः शोधून काढले असते तर कल्पकत्वाचा मान आम्ही शिवाजीस दिला असता. एकंदर विवेचनाचा मथितार्थ असा की, शहाजीच्या वेळी राष्ट्रधर्माची कल्पना उदय पावली नव्हती आणि शिवाजीच्या वेळी ती उदय पावली होती. रामदासांनी ती पुकारल्याबरोबर समानशीलत्वास्तव व हितगर्भत्वास्तव शिवाजीने तिचे तात्काल मंडन व ग्रहण केले. ते मंडन व ग्रहण शहाजीच्या स्वतःच्या हातून त्या काळी होण्यासारखे नव्हते. शहाजीच्या वेळीही यवनद्वेष नव्हता असे नाही. परंतु त्या द्वेषाला भावरूप देणे म्हणजे केवळ मराठ्यांची तेवढी एकजूट करून त्यांच्या जोरावर स्वराज्य मिळविणे शहाजीला शक्य नव्हते. तीन प्रयत्न करता करता चवथ्या प्रयत्नात मुसुलमानांचे मांडलिकत्व तेवढे त्याला स्वतःला साधता आले. अशा स्थितीत यवनांचा द्वेष प्रकटपणे करणे शहाणपणाचेही नव्हते व सोयीचेही नव्हते. शहाजीच्या काळी यवनांना बाद करण्याच्या गोष्टी शहाजीच्या दरबारात निघाल्याचे जयराम लिहितो.

> राजा हो नृप शहाजी यवन करावे बाद।
> हेजिब विधिसि बोलिला ऐसा द्विजसंवाद ॥ ९६ ॥

बाद करणे म्हणजे राज्यच्युत करणे असा मात्र अर्थ ह्या संवाद करणाऱ्या ब्राह्मणांच्या डोक्यात नव्हता. कारण, पुढील श्लोकात बाद करणे म्हणजे काय करणे तेही जयराम नमूद करतो.

> व्यापिली हे अवनी यवनी मुण वैदिक वाक् सिणोन निजेली।
> या वरि साहेबकीर्तिची मूर्तिच आपली हे जीव हेजिब केली।
> शाहजिराजे व बादशाह असि वृत्ति करू जगत्रयि विधिसंनिधि
> गेली ॥ ९७ ॥

यवनांनी सर्व पृथ्वी म्हणजे भरतखंड व्यापिलेले पाहून, वैदविद्या त्रासून मूर्च्छित झाली. परंतु शहाजीराजाच्या पराक्रमाने ती सावध झाली, आणि ब्रह्मदेवाकडून भरतखंडाच्या राज्यवृत्तीची वाटणी

शहाजीराजे व शहाजहान पातशहा या दोघात तिने करून देवविली. यवनाला नर्मदेच्या उत्तरेस वाटणी दिली आणि शहाजीराजे यास नर्मदेच्या दक्षिणेस वाटणी दिली. तात्पर्य, या श्लोकात बाद करणे म्हणजे वाटणी करून देणे असा अर्थ अभिप्रेत आहे, यवनांना उच्छिन्न करून त्यांची पातशाहत आक्रमण करणे असा अभिप्राय नाही. शहाजीच्या काळीं ह्याहून जास्त भाषा सार्थ झाली नसती. परंतु रामदास व शिवाजी यांच्या काळी, यवनांना उच्छिन्न करण्याची भाषा उत्कटत्वाने महाराष्ट्रात रामदासांनी वापरिली आहे. यवनांच्या पातशाहीला रामदास बहुता दिवसांचे बंड म्हणतात व कुत्ते मारून परते घालावे म्हणून निक्षून सांगतात. शहाजी व शिवाजी ह्यांच्या काळात राजकीय विचारात केवढा हा फरक ! बुडाला औरंग्या पापी दुष्ट चांडाळ घातकी, ही भाषा शहाजीकाळी संभाव्यसुद्धा नव्हती, प्रकटपणे बोलणे तर दूरच राहिले.

## सिद्धांत आणि व्यवहार

स्वतःच्या दरबारात यवनांची किंचित कुचेष्टा झालेली शहाजीला खपत असे. बाहेर कागदोपत्री शहाजी आदिलशहाला आपला अधिराज म्हणून आदबीने संबोधी आणि घरी दरबारात त्याचे कवी शहाजीने आदिलशहाचे राज्य राखले आहे म्हणून शहाजीची प्रौढी गात. बाहेर बोलावयाचे झाले म्हणजे शहाजहानाला शहानशहा म्हणून किताब लावावा आणि घरात बोलताना त्याच्याशी वाटणी करून बसलो आहो अशी बरोबरीची भाषा वापरावी, असा दुटप्पी प्रकार शहाजीचा असे. आणि हा सर्व प्रकार आदिलशहा, शहाजहान वगैरे लोकांच्या कानावर त्याचे अखबरनवीस घालीत असत. परिणाम असा होई की, शहाजीसंबंधाने आदिलशहा किंवा शहाजहान यांच्या मनात सदा संशय वास करी. त्याच्यावर विश्वास कोणाचाच नसे. कामापुरता शहाजीला जवळ करायचा आणि काम संपले म्हणजे त्याला हाकून द्यावयाचा असा प्रकार शहाजीच्या चरित्रात कितीदा तरी घडला आहे. ह्या दुटप्पी वर्तनाने जी मानखंडणा होई ती शहाजीच्या आंगवळणी पडलेली होती. स्वतःचा कार्यभाग कसा साधेल, इतकेच शहाजीचे पाहाणे असे. त्यात मानखंडणा होते की, मानमंडना होते ह्याचा कीस करीत बसण्यास त्याला अवकाश नव्हता. परंतु, शिवाजीसारख्यांना ही धरसोड व तज्जन्य मानहानी बिलकुल खपत नसे. एकदा एतत्संबंधाने वृद्ध सोनोपंत डबीर व तरुण शिवाजीराजे यांच्यामध्ये एक मोठा मनोरंजक संवाद झाला तो बृहदीश्वरशिलालेखकाराने दिलेला मनन करण्यासारखा आहे. शिवाजी म्हणतो :—' वडील प्रथम निजामशाहाच्या संगतीस होते. ते आदिलशहाच्या बोधनेवरून त्याकडे गेले. परतून निजामशहांनी बोलाविताच त्याजकडे आले. पुनः बिनसून आदिलशहाकडे गेले. अशा दोनतीन मेरजारा झाल्या. वडील आपल्याकडून सर्वांची कामे निर्मळ मनाने करीत. परंतु, आज इकडे उद्या तिकडे, अशा करण्यांनी सर्वांस कपटी म्हणून भासू लागले. कार्य अडले म्हणजे वडिलांचा ते ते शहा बहुमानही करीत, परंतु मनात किंतू धरीत. खरे पाहिले तर, थोर मनुष्यांनी ज्याची एकदा संगती धरीली त्याशी कदापि बिघडू नये आणि कदाचित विघाड झालाच तर पुनः त्याजपाशी परतून येऊ नये. ही नीती आहे. ती न पाळल्यामुळे यवनांनी वडिलांशी कृत्रिम वर्तन केले. परंतु वडील शूर व निर्मळ म्हणून बचावले.' शिवाजीचा सिद्धान्त खरा होता यात संशय नाही. परंतु शहाजीचा व्यवहार त्या सिद्धांताहूनही खरा होता, हे व्यवहारज्ञ स्वतःच्या अनुभवाने सांगू शकतील. अपवाद खरे असतात, म्हणूनच सिद्धान्तांना चिकटविलेले असतात ! स्थितीच अशी होती की, दुटप्पीपणाशिवाय शहाजहान, औरंगझेब, मीरजुमला, महमदशहा, फतेखान, मुस्तफाखान, इत्यादी कपटनाटक्यांच्या मध्ये शहाजीचा सरळपणाने टिकाव लागला नसता.

प्रकट स्वराज्य, प्रच्छन्न स्वराज्य, मांडलिकी स्वराज्य व स्वतंत्र स्वराज्य म्हणजे स्वतःचे व्यक्तिमात्राचे राज्य स्थापिण्याचे उत्तरोत्तर प्रयत्न करणें ही शहाजीची इतिकर्तव्यता होती. ही इतिकर्तव्यता अथपासून इतिपर्यंत विकास पावत असता, शत्रू, मित्र व उदासीन यांच्याशी प्रसंगाला अनुकूल दिसेल ते शत्रुत्वाचे, मित्रत्वाचे किंवा उदासीनतेचे वर्तन ठेवणे, हे शहाजीचे धरसोडीचे धोरण होते. आणि हे धोरण अमलात आणण्याकरिता करोल सैन्य व सामग्री ह्यांच्या साहाय्याने त्याने स्वतःचा पक्ष निर्मून 'साधनसंपत्तीची जोड केली होती. शहाजीच्या इतिकर्तव्यतेची ही अशी मीमांसा आहे. ह्या इतिकर्तव्याचे तत्कालीन हिंदुस्थानच्या इतिह्यसात कार्य काय त्याचा आता निर्णय करू. शहाजीच्या हयातीत हिंदुस्थानात एकंदर पाच स्वतंत्र मुसलमानी राज्ये होती. (१) दिल्लीची मोगलाई, (२) दौलताबादची निजामशाही, (३) विजापूरची आदिलशाही, (४) गोवळकोंड्याची कुतुबशाही व (५) वेदरची क्षुद्र बेरीदशाही. ह्या पाच मुसलमान शाह्यांनी तुंगभद्रेच्या तीरापासून हिमालयापर्यंतचा व आसामपासून इराणपर्यंतचा सर्व टापू आक्रमिला होता. तुंगभद्रेच्या दक्षिणेस कर्नाटकात काही क्षुद्र हिंदू पाळेगार तेवढे थोडेबहुत स्वतंत्र राहिले होते. त्यांचे स्वातंत्र्य निजामशहाने हरण करावे की आदिलशहाने हरण करावे की कुतुबशहाने हरण करावे की दिल्लीवाल्याने हरण करावे, एवढाच काय तो मत्सराचा प्रश्न घुटमळत राहिला होता. बाकीचे सर्व भरतखंड यवनांच्या कबजात जाऊन, हिंदुत्वाच्या हयातीचे माप भरत आले होते. सहाशे वर्षे झगडता झगडता इस्लामाच्या हातून आर्यसंस्कृतीचा पाडाव आणिक पाचपन्नास वर्षांत परिपूर्ण झाला असता. ह्या पाच पातशाह्या अन्योन्य मत्सराने एकमेकांचे बल क्षीण न करत्या आणि स्नेहवृद्धीचे तह करून इस्लामी संस्कृतीचा विजय करणे हे एकच धोरण अक्षत पाळत्या, तर हिंदुसंस्कृती पृथ्वीतलावरून उच्छिन्न होऊन गतेतिहासाचा करुण विषय झाली असती. इस्लामी धर्माचा प्रसार करण्याची प्रतिज्ञा प्रत्येक पातशहा करी; परंतु ती दुसऱ्याच्या हातून सफल न होता आपल्या हातून व्हावी अशा अभिमानाने एक दक्षिणीशहा दुसऱ्या दक्षिणीशहाच्या उरावर बसे. दक्षिणी सर्व शहा शियापंथी पडल्यामुळे उत्तरेकडील सुनी मोगल त्यांना धर्मभ्रष्ट समजत व हिंदूप्रमाणेच त्यांचाही उच्छेद करण्याचा पैगाम बांधीत. अशी दुफळी नव्हे, त्रिफळी नव्हे, पंचफळी मुसुलमानी पातशाह्यांमध्ये होती. तीही झाली, तत्रापि देखील मुसुलमान पातशहा एका बाबीची खबरदारी घेते, तर हिंदू संस्कृतीचा त्यांच्या हातून नायनाट झाला असता. पंचफळीमुळे फार झाले तर पाच शाह्यांतून कोणत्या तरी एका शाहीच्या हातात सर्व राज्यसत्ता जाती व त्या सार्वभौम यावनी राजसत्तेच्या द्वारा आर्य-

पृष्ठ २४ वर

कथा

# राज्य कुणाचे? कायदा कुणाचा?

रूपांतर : प्रा. ब. द. पंडित (म्हापसा, गोवा)

या देशात लोकांचे सार्वभौमत्व आहे, याविषयी आपण खूपसे ऐकतो. तरी पण पुष्कळसे लोक यास कपोलकल्पितच मानतात, हे सार्वभौमत्व कोठे आहे, त्याचे रक्षणकर्ते कोण आहेत आणि कायदा नसताना त्याची वेगवेगळी रूपे व घटक कशाप्रकारे अंमलात येतील, याविषयी साश्चर्य चर्चा करतात. मी मात्र या गूढाविषयी आश्चर्य करणारांपैकी नाही. कारण मी स्वतः हे सार्वभौमत्व त्याच्या मूळ स्वरूपात कार्य करताना पाहिले आहे, अनुभवले आहे. सार्वभौमत्व कशात आहे, त्याचे रक्षणकर्ते कोण आहेत व त्याचा गरजेनुरूप कसा उपयोग केला जातो याची मला माहिती आहे.

¤

न्यायालयात प्रचंड गर्दी झाली होती. जवळ जवळ सर्व गावच त्या गर्दीत सामावला होता. कारण तो एक कुप्रसिद्ध खटला होता.

एलिव्ह् मार्श नावाच्या गृहस्थाचा त्याच्या घरातच खून झाला होता. बंदुकीच्या गोळीने त्याच्या छातीत एक मोठे भोक पडलेले होते. त्यामुळे तो आपल्या खोलीत मृतावस्थेत पडला होता. तो कुटुंबातील शेवटचा गृहस्थ होता. स्वभावाने ताप्ट असल्याने तो एकटाच राहत होता. त्याच्याजवळ असणारी उत्कृष्ट जमीन हीच काय ती आयुष्यातील त्याची संपत्ती होती व उरलेली दूरच्या नातलगाकडे होती. अधूनमधून शेजारच्या शेतावरील एक मुलगी त्याचा स्वयंपाक करण्याचे व घर व्यवस्थित सजविण्याचे काम करीत असे. शिवाय आणखी एक कामगार शेतावर राबत होता.

ज्यावेळी मार्शला लोकांनी पाहिले तेव्हा सर्व काही जिथल्या तिथे आहे तसे होते. त्याच्याजवळ खूपशी संपत्ती असूनही त्याची कधी चोरी झाली नव्हती.

अर्थात या घटनेबद्दल फारसे गूढ असण्याचे कारण नव्हते. कारण आता शेतावर काम करणारा माणूसच पसार झाला होता. या भागात तो नवीनच होता. काही महिन्यांपूर्वी तो पर्वताफ्लीकडून आला होता. आणि तो मार्शकडे काम करीत होता. तो दिसण्यात मात्र इतरांपेक्षा सुंदर व आकर्षक होता. त्याने आपले नाव टेलर असे सांगितले होते. तरी पण तो अबोल असल्याने त्याच्याविषयी फारच थोडे माहीत होते.

आता सर्वांचे लक्ष मात्र त्याच्याकडे लागले होते. त्याला पर्वताच्या पायथ्याशी पकडण्यात आले, त्यावेळी त्याच्या गाठोड्यात सर्व कपडे बांधलेले आढळले. त्याच्या खांद्यावर पक्षी मारण्याची लांब नळीची एक बंदूक होती.

त्याने सांगितलेली हकीकत अशी की, 'सकाळी तो आणि मार्श घरी होते. दुपारी त्याने घर सोडले. परंतु आपली बंदूक विसरल्यामुळे तो परत माघारी गेला होता. तो साधारणतः चारच्या सुमारास घरी पोहचला, स्वयंपाकघरात गेला, खुंटीवरील बंदूक त्याने घेतली व लगेच तो बाहेर पडला. त्यावेळी त्याने मार्शला पाहिलेही नव्हते व तो कोठे होता, हेही त्याला माहीत नव्हते.'

त्याने हे मात्र कबूल केले की, त्याच्या बंदुकीत एक मोठी शिशाची गोळी होती. त्याने असेही सांगितले की, त्यानेच ती गोळी घराजवळ फिरणाऱ्या एका कुत्र्याला मारण्यासाठी भरली होती. तो कुत्रा नेहमी घरापासून काही अंतरावर फिरत असे. जेव्हा त्याला असे सांगण्यात आले की, बंदुकीतील गोळी उडवलेली आहे, तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. त्याने सांगितले की, त्याने ती बंदूक चालविली नव्हती व तोपर्यंत ती बंदूक मोकळी आहे, हेही त्याला माहीत नव्हते. जेव्हा त्याला विचारण्यात आले की, 'तू अचानक निघून का गेलास?' तेव्हा मात्र तो काहीच बोलला नाही.

'त्याची परत तुरुंगात रवानगी करण्यात आली आणि आता सर्किट कोर्टमध्ये त्याच्यावर खटला चालविण्यात येत होता.

लौकरच न्यायालयीन कामकाजाला सुरुवात झाली. न्यायाधीश सायमन किलरेल हे एक जमीनदार होते. ते जरी सुमारे पाचसहा मैल दूर असलेल्या शेतात राहत असले तरी ते सकाळीच कोर्टात आले होते. जेव्हा कोर्ट सुरू होत असे तेव्हाच ते न्यायालयीन कामकाज पाहत. इतर वेळी मात्र आपल्या शेतात गवत कापण्याचे व गुरे चारण्याचे कामकाज करीत. त्या भागात राहणाऱ्या इतर माणसांप्रमाणे हेही आपली जमीन वाढविण्याच्या प्रयत्नात होते.

त्या भागात—व्हर्जिनियात—जमीन मालकीची असणे हे एक मानाचे व प्रतिष्ठेचे लक्षण होते. तिसरे जॉर्ज यांनी दिलेली मानपत्रे जेफर्सन यांनी रद्द केली होती. त्यामुळे जमीन हेच सरदारकीचे प्रतीक होते. त्यामुळे सायमन किलरेल त्यांनाही आपण या जमीनदारांपैकी एक असावे असे वाटत होते. आणि त्या दृष्टीने ते प्रयत्नशीलही होते. जेव्हा त्यांना न्यायाधीश म्हणून पाचारण करण्यात आले तेव्हा त्यांनी आपली अधिकारसूत्रे हाती घेतली आणि ते कर्तव्यकठोर बनले.

मला असे वाटते की, प्रत्येकजण हा खटला ऐकण्यासाठी येत होता. माझे चुलते अॅबनर आणि वृद्ध असलेले डॉ. स्टॉर्म हे दोघे न्यायालयात मध्यभागी असणाऱ्या बाकावर बसले होते. मी त्यांच्या पाठीमागे होतो. आता मला कायद्याची दहशत व त्यातील निष्ठुरता पाहण्यास मिळत होती.

तो कैदी हे एक न्यायालयात आकर्षण होते. तो मात्र जीवनातील घटनांशी बेफिकीरपणे वागणाऱ्या माणसाप्रमाणे अगदी मख्ख चेहऱ्याने बसला होता. त्याच्याविषयी कोणालाच सहानुभूती नव्हती. माझे चुलते अॅबनर

व डॉ. स्टॉर्म हे दोघे स्वयंपाक करणाऱ्या मुलीचे निरीक्षण करीत होते.

त्या मुलीचे सौंदर्य काही आगळेच होते; तिचे काळेभोर केस आणि डोळे जिप्सीप्रमाणे वाटत होते. ती साक्षीदारांच्या मध्यभागी हातरुमाल घट्ट पकडून बसली होती. एकंदरीत ती निराश वाटत होती. मला वाटते, केवळ त्यामुळेच डॉ. स्टॉर्म तिचे निरीक्षण करीत असावेत. तिच्या डोळ्यात आसवे जमत, नंतर ती आपली मान तिरस्काराने झटकत असे. तिच्या हातातील रुमालाशी तिचा चाळा चालू होता. ती वेळ अगदी जोरदारपणे बोलण्याची होती, त्यामुळे बरेचसे साक्षीदार बेचैन झाले होते. मला वाटते, माझे चुलते आणि डॉ. स्टॉर्म आपापसात कुजबुजले नसते तर त्या मुलीकडे माझे लक्षही गेले नसते.

खटला पुढे चालू झाला. आता कैद्याला फाशीची शिक्षा मिळणार हे स्पष्ट दिसू लागले. तो (टेलर) घाईने घरातून बाहेर का पडला? याचे कारण सांगण्यास त्याने दिलेल्या नकारास काही तरी अर्थ होता. शिवाय परिस्थितिजन्य पुरावाही त्याच निष्कर्षाप्रत येत होता. फक्त शंका होती ती कैद्याच्या हेतूविषयी. न्यायाधीशांनी तर इतर खटल्यांचे पुरावे देऊन इतक्या बळकटपणे हल्ला केला होता की, त्यामुळे त्यातला एखादा चांगला गुणही लोप पावला होता. स्वतः न्यायाधीश त्या माणसाविषयी निष्ठूर होते. आणि खरोखरच कुणालाही त्याच्याविषयी मुळीच दया वाटत नव्हती; कारण ती एक दुष्ट हत्या होती. एका वृद्ध माणसाचा बळी पडला होता. त्या वृद्धाच्या निरपराधित्वामुळेच टेलरची सुटका होणे अशक्य होते.

सर्वत्र भयाण शांतता पसरलेली होती.

अचानक साक्षीदारांच्या मध्यभागी बसलेल्या त्या मुलीच्या डोळ्यातून एकदम अश्रू वाहू लागले. ती हुंदके देत थरथरत उभी राहिली, तिच्या कंठातून शब्द फुटत नव्हता आणि डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनी तिची बोटे भिजून चिंब झाली होती.

ती काय बोलली ते त्यावेळी लोकांना समजलेच नाही. परंतु त्यामुळे न्यायाधीश मात्र उभे राहून तिच्याकडे धावले आणि ज्यूरीने तिच्याभोवती कडे केले. आणि त्यामुळेच आतापर्यंत शांत असणारा कैदी संतापाने नकार देऊ लागला. तो त्या मुलीचे बोलणे थांबवण्यासाठी तिच्याकडे जाण्यासाठी धडपडत होता. परंतु लौकरच त्या मुलीने काय सांगितले ते सर्वांना समजले. कारण ते लिहून घेतले गेले व त्यावर सह्याही झाल्या. तो खटला टेलरच्या विरुद्ध म्हणजेच वकिलांच्या भाषेत कोर्टाबाहेर गेला.

त्या मुलीने मार्शचा खून केला होता.

ती आणि टेलर प्रेमिक होते. लौकरच त्यांचे लग्नही होणार होते. परंतु मार्शचा खून होण्याच्या आदल्या रात्रीच तिचे व टेलरचे कडाक्याचे भांडण झाले होते. दुसरे दिवशी सकाळी टेलरने तो गावच सोडला होता. मार्शने त्या मुलीच्या चारित्र्याविषयी घेतलेला आक्षेप हेच त्यांच्या भांडणाचे कारण होते. ती दुपारी घरी परतली तेव्हा आपला प्रियकर आपणास सोडून गेल्याचे तिला समजले, तेव्हा आपला प्रियकर घालविण्यास कारण ठरलेल्या त्या म्हाताऱ्याला पाहून तिने संतापाने भिंतीवरील बंदूक घेतली व मार्शला गोळी घातली. त्यावेळी दुपारचे दोन वाजले होते. टेलर बंदुक नेण्यास येण्यापूर्वीच हे सर्व एक तासभर अगोदर घडले होते.

यामुळे लोकांच्या मनोवृत्तीत एक जबरदस्त बदल घडला होता. कारण सत्य बाहेर पडले होते आणि हकीकत टेलरविरुद्धच्या बाह्य पुराव्याशी जुळत होती. एवढेच नव्हे तर ती त्याने सांगितलेल्या घटनांशीही जुळत होती. त्या हत्येमागील भावना लोकांना माहीत होती. आपण निघून जाण्याचे कारण काय होते हे सांगण्यास टेलरने नकार का दिला, हेही स्पष्ट झाले होते. मुलीने जे काही सांगितले त्याचा टेलरने इन्कार केला आणि त्याने मुलीला मध्येच थांबविण्याचा प्रयत्न केला. यातून हेच स्पष्ट होत होते की, कैदी हा एक माणूस होता आणि त्याला स्वतःसाठी प्रेयसीचा त्याग पसंत नव्हता.

मी कोर्टातील कायद्याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही, तरी पण त्या मुलीचा जबाब असत्य वाटेल अशी एकही घटना घडली नाही. त्या मुलीला शेरिफच्या स्वाधीन करण्यात आले. आता तिला दुसरे दिवशी न्यायालयात येणे आवश्यक होते.

आता जरी टेलर कायद्याच्या दृष्टीने निर्दोष ठरणार होता तरी त्याची सुटका करण्यात आली नव्हती. तर त्याला कोठडीत ठेवण्यात आले. न्यायाधीशांनी निकाल दिला नाही. त्यांचे असे म्हणणे होते की, खटला पुढे चालू राहणे इष्ट आहे व या गुन्ह्याबद्दल कोणाला तरी शिक्षा झालीच पाहिजे. ◻

त्या संध्याकाळी न्यायाधीश आणि आम्ही एकत्र मिळूनच घरी परतलो. रस्त्यातून जाताना न्यायाधीशांनी अॅबनर व डॉ. स्टॉर्म यांच्याशी चर्चा केली ती कुरणांविषयी आणि जनावरांच्या किंमतीविषयी. मला वाटले होते की, ते खटल्याविषयी काही तरी बोलतील. परंतु त्या संदर्भात त्यांनी एक शब्दही काढला नाही. फक्त एकदा एवढे मात्र बोलले की, 'त्या दोघांपैकी एकालासुद्धा फिर्यादीच्या बाजूने सरकारी वकिलाने साक्षीदार म्हणून का बोलाविले नाही?' कारण त्या दोघांनीच प्रथम मार्शला पाहिले होते. शिवाय मार्शची मरणोत्तर तपासणी करणाऱ्यात डॉ. स्टॉर्म यांचाही समावेश होताच. यावर अॅबनर म्हणाले की, मार्श यांच्या मृत्यूच्या परिस्थितीविषयी प्रश्न निर्माण न झाल्याने व इतर व्यक्ती साधारणपणे त्याचवेळी आल्याने प्रॉसिक्यूटरला त्याबाबतचा पुरावा गरजेचा वाटला नाही.

यावर न्यायाधीशांनी संमतिदर्शक मान हलविली आणि संभाषणाला वेगळीच कलाटणी मिळाली. यावेळेपर्यंत आम्ही सर्वजण न्यायाधीशांच्या घरासमोर आलो होतो. त्यांनी औपचारिकपणा म्हणून आम्हाला आत येण्याची विनंती केली. एवढ्यावर लगेच अॅबनर व डॉ. स्टॉर्म घरात निघाल्याचे पाहून मला आश्चर्य वाटले. त्याचप्रमाणे न्यायाधीशही काहीसे आश्चर्यचकित झाल्याचे दिसून आले, तरी पण त्यांनी आम्हाला त्यांच्या ग्रंथालयात नेले.

अॅबनर व स्टॉर्म येथे का थांबले असावेत याचे गूढ मात्र मला उकलले नाही. जेव्हा मला आठवले की, हे दोघे पहिल्या दिवसापासूनच त्या मुलीचा विचार करीत होते, तेव्हा असे वाटले की, त्या मुलीविषयी चांगले चार शब्द सांगण्याच्या इराद्याने हे दोघे आत आले असावेत. त्या मुलीविषयी त्यांच्या मनात एक उदात्त भावना जागृत झाली होती. तिने मोठ्या धैर्याने हादरून टाकणारा एक मोठा त्याग केला होता. हे दोघे तिला

शक्य तितका मदतीचा हात देण्याचा प्रयत्न करीत होते.

परंतु पुढे मला असे समजले की, त्या मुलीविषयी बोलण्यासाठीच ते आले होते. परंतु तिच्या बाजूने नाही. नंतर पुढे त्यांनी न्यायाधीशांना पुढील अद्‌भुत गोष्ट सांगितली. जेव्हा खटला सुरू झाला तेव्हा त्यांचे असे मत होते की, टेलर दोषी नव्हता. तरी पण पुढे काय घडते याची ते वाट पाहत होते. कारण काही परिस्थितिजन्य पुराव्यांकडे— स्त्रीचा गुन्हा आणि टेलरचा निरपराधीपणा— याकडे प्रॉसिक्यूटरने दुर्लक्ष केले होते. जेव्हा डॉ. स्टॉर्मने मार्शच्या शवाची तपासणी केली तेव्हा त्याला असे आढळून आले होते की, मार्शचा मृत्यू विषबाधेने झाला होता. आणि ज्यावेळी त्याला गोळी घातली त्यापूर्वीच तो मेलेला होता. यावरून असे स्पष्ट होते की, गोळी घालणे हा टेलरविरुद्ध संशय निर्माण करण्याचा एक प्रयत्न होता. सकाळीच त्या मुलीने मार्शसाठी स्वयंपाक केला होता आणि त्याच्या अन्नात विष घातले होते, तेच अन्न त्याने दुपारी खाल्ले होते.

ॲबनर न्यायाधीशांना काही तरी स्पष्टीकरण करणार होता, पण तेवढ्यात तेथे एक नोकर आला व त्याने न्यायाधीशांना 'किती वाजले ?' असे विचारले. या विचारण्याचा न्यायाधीशांवर चांगलाच परिणाम झालेला दिसला, आणि ते विचारात गढून गेल्याप्रमाणे वाटले. त्यांनी घड्याळ खिशातून काढून पाहिले व घड्याळ बिघडले असे सांगितले. त्या गृहस्थाला ॲबनरने वेळ सांगितली व ते न्यायाधीशांना म्हणाले, 'कदाचित माझ्याजवळ असणाऱ्या चावीने तुमच्या घड्याळास चावी देता येईल.' त्यामुळे न्यायाधीशांनी आपले घड्याळ ॲबनरकडे दिले. ॲबनरने त्यास चावी दिली व घड्याळ टेबलावर ठेवून दिले. त्यावेळी मला असे वाटले की, माझ्या चुलत्यांकडे डॉ. स्टॉर्म मोठ्या औत्सुक्यपूर्ण नजरेने पाहत होते. परंतु न्यायाधीशांचे मात्र तिकडे लक्ष नव्हते. ते आपल्याच विचारात मग्न होते. नंतर ते म्हणाले, 'यामुळे सर्वच गोष्टींवर प्रकाश पडतो आहे. त्या मुलीने आपल्या कबुली जबाबात दिलेल्या माहितीप्रमाणे मार्श यांचा खून केला व नंतर टेलरच्या विरुद्ध खोटा पुरावा निर्माण केला. कारण तिने त्याचा त्याग केला होता... आणि तिचे हे कृत्य स्त्रीजातीला साजेसेच म्हणावे लागेल. या गोष्टीचा नंतर तिला पश्चात्ताप झाला व तिने कबूलही केले.'

त्यांनी नंतर माझ्या चुलत्यांना विचारले की, 'तुम्हाला याबाबत आणखी काही सांगावयाचे आहे काय ?' त्यांना काही सांगावयाचे होते, पण तेवढ्यात तिथे नोकर आल्याने त्यांनी नाही असे म्हटले व घोडे आणण्यास सांगितले. त्यामुळे न्यायाधीश घोड्यांची व्यवस्था करण्यासाठी बाहेर गेले. यावेळी माझे चुलते एखाद्या कल्पनेवर विचार करीत असल्याप्रमाणे शांत होते, तर डॉ. स्टॉर्म काहीसे निराश वाटत होते. जेव्हा दार बंद झाल्याचा आवाज आला त्यावेळी ते खुर्चीवरून उठले आणि शेल्फमध्ये असणारी कायद्याची पुस्तके चाळू लागले. पुस्तके पाहता पाहता ते एकदम थबकले आणि त्यातील एक छोटासा ग्रंथ त्यांनी उचलला; त्यातील काही मजकुरावरून त्यांनी बोटे फिरविली, अस्पष्टपणे काही तरी ते पुटपुटले आणि त्यांनी ते पुस्तक आपल्या खिशात टाकले. त्यानंतर त्यांनी माझ्या चुलत्यांना खूण करून बोलाविले व ते दोघे खिडकीजवळ जाऊन बोलू लागले.

आम्ही सर्वजण तेथून निघालो. मला खात्री होती की, त्या दोघांना त्या मुलीबद्दल— ती दोषी असो अथवा नसो— काही तरी चांगले सांगावयाचे असावे कारण तिने स्वतःहून कबुली दिली होती. परंतु न्यायाधीशांशी झालेल्या मुलाखतीत, त्यांनी कशामुळे तरी आपला हेतू बदलला होता. कदाचित त्यांनी न्यायाधीशांचे म्हणणे ऐकले तेव्हा न्यायाधीशांना काही सांगण्यात स्वारस्य वाटले नसावे. परत येताना ते एकमेकाशी काही तरी बोलत होते. ते माझ्या फारच पुढे असल्याने ते काय बोलत होते ते मला समजले नाही. परंतु ते त्या मुलीविषयीच बोलत असावेत, कारण त्यांचा पुढील संवाद माझ्या कानावर पडला. डॉ. स्टॉर्म म्हणाले, 'परंतु यामध्ये हेतू कोठे आहे ?'

यावर माझे चुलते म्हणाले, 'किंगच्या एकविसाव्या प्रकरणात.'

¤

आम्ही लौकरच कोर्टात गेलो. त्या दिवशी न्यायालय दारापर्यंत गच्च भरले होते. माझ्या चुलत्यांनी येतानाच त्या परगण्यातील कारकुनाच्या ऑफिसमधून एक नोंदणीपुस्तक आणले होते आणि ते मला बसण्यासाठी दिले होते. मला खूप आनंद झाला, कारण त्यामुळे माझी बैठक उंचावली गेली व कोर्टात काय घडते ते मी पाहू शकलो. त्यावेळी कोर्टात सर्व स्तरातील लोक उपस्थित होते.

शेरिफने न्यायालय उघडले. कैद्यांना आणण्यात आले. न्यायाधीश स्थानापन्न झाले. यावेळी न्यायाधीश काहीसे रात्री न झोपलेल्या माणसाप्रमाणे थकलेले वाटत होते. खरे पाहता ज्याच्यापुढे एवढे कठोर कर्तव्य आहे त्याला झोप तरी कशी येईल ? या ठिकाणी एका बाजूला त्या मुलीला वाचविण्याची तळमळीची भावना होती तर दुसऱ्या बाजूला तिला फाशी देण्यासाठी कायदा सज्ज होता. जरी न्यायाधीश दमलेले वाटत असले तरी जेव्हा ते काम करू लागले, तेव्हा मात्र निश्चयी दिसत होते.

न्यायमूर्तींनी जबाब वाचण्यास सांगितले व त्या मुलीस उभे राहण्यास सांगितले. त्यावेळी टेलरने विरोध दर्शविण्याचा प्रयत्न केला. पण त्याला खुर्चीत बसविण्यात आले. ती मुलगी धीटपणे उभी राहिली. पण पांढरी पडल्याप्रमाणे वाटत होती. तिचे डोळे विस्फारलेले होते. तिला विचारण्यात आले की, तुला कबुलीजबाब मान्य आहे का ? आणि तुला त्याच्या परिणामाची कल्पना आहे का ? यावर ती नखशिखांत शहारली. तरी पण ती स्पष्टपणे बोलली. न्यायालयात सर्वत्र निरव शांतता पसरली होती. न्यायाधीश बोलणार एवढ्यात कोणी तरी बोलले. मी वळून पाहतो तो ते बोलणारे माझे चुलतेच होते, असे दिसून आले. ते म्हणाले,

'मी या कबुलीजबाबास आव्हान देतो.'

आता संपूर्ण न्यायालयात हालचाल झाली. प्रत्येकाची नजर दूर उभ्या असलेल्या त्या दोन व्यक्तींवर खिळून राहिली. एक होती ती निस्तेज मुलगी तर दुसरे होते माझे चुलते.

यावर न्यायाधीश आश्चर्यचकित झाले व म्हणाले, 'तुम्ही हे कोणत्या पुराव्याच्या जोरावर बोलत आहात ?'

पुढे माझे चुलते म्हणाले, 'त्या मुलीचा कबुलीजबाबच असत्य आहे.'

न्यायालयात सर्वत्र इतकी शांतता होती की, टाचणी पडली असती तरी आवाज आला असता. त्या मुलीने श्वास रोखून धरला. टेलर अर्धवट उठला व परत खुर्चीत बसला. न्यायाधीशांनी बोलण्यासाठी आपले तोंड उघडले, पण एकदोन क्षण तेही काहीच बोलले नाहीत. न्यायाधीश आश्चर्यचकित झाले आहेत, हे मी ओळखले. ज्या अॅबनरने त्या मुलीच्या जबाबाला न्यायाधीशांसमोर पाठिंबा दिला होता, तेच त्या जबाबाचा इन्कार करीत होते. त्यामुळे अॅबनरला काय म्हणावे, हे त्यांना समजत नव्हते.

न्यायाधीश आवाज चढवून म्हणाले, 'हे योग्य वाटत नाही. कदाचित असे असेल की, या मुलीने मार्शाचा खून केला असेल किंवा टेलरने केला असेल आणि या दोन माणसात तुम्ही सुचवू पाहता त्याप्रमाणे गुप्त करार असेल व या वस्तुस्थितीवर प्रकाश टाकणारी काही माहिती तुमच्याजवळ असेल किंवा नसेलही. ते काहीही असले तरी तुमचे म्हणणे ऐकून घेण्याची ही वेळ नव्हे. जेव्हा हा खटला चालविला जाईल त्या वेळी त्यावर बोलण्याची संधी तुम्हाला मिळेल.'

यावर अॅबनर म्हणाले, 'तरी पण तुम्ही हा खटला चालवू शकणार नाही.'

या खटल्याविषयी लोकांना किती औत्सुक्य होते, याचे वर्णन करता येणार नाही. आता सर्वजण श्वास रोखून शांत बसले होते. बाहेरच्या रस्त्यावरून जाणाऱ्या घोड्यांचे व माणसांचे आवाज खिडकीवाटे न्यायालयात येत होते. अॅबनर काय सांगत होते, हे कुणालाही काही कळत नव्हते. तरी पण सर्वांना माहीत होते की, अॅबनर जे बोलत होते त्याला विशिष्ट अर्थ होता.

न्यायाधीशांनी अॅबनरकडे रागीट मुद्रेने पाहिले. 'याचा अर्थ काय ?' असे विचारले. अॅबनर यांनी आपल्या जरबेच्या आवाजात सांगितले की, 'तुम्ही तुमच्या आसनावरून खाली या.'

यावर न्यायाधीश रागाने लालबुंद झाले व तावातावाने म्हणाले, 'तुम्हाला मी कैद करण्याचा हुकूम देतो.' व लगेच शेरिफला त्यांनी जोराने हाक मारली. एवढे झाले तरी अॅबनर तसूभरही डगमगले नाहीत. उलट त्यांनी न्यायाधीशांकडे शांतपणे रोखून पाहिले.

नंतर ते म्हणाले, 'तुम्ही मला धमकी देत आहात, परंतु साक्षात परमेश्वरच तुम्हाला धमकी देत आहे.' नंतर ते श्रोते-प्रेक्षकांकड वळले व म्हणाले, 'कायद्याची अंतिम सत्ता या परगण्यातील लोकांच्या हाती असताही हा अन्याय तुम्ही सर्वजण सहन करणार आहात काय ?'

त्यानंतर तेथे काय घडले हे मात्र मी विसरणार नाही. कारण मी माझ्या आयुष्यात इतकी छाप पाडणारी गोष्ट नंतर पाहिली नाही. हळूहळू व शांतपणे लोक न्यायालयात उभे राहू लागले.

सर्वप्रथम उभा राहिला तो रॅनडॉल्फ. तो स्वतः शांतताप्रिय न्यायाधीश होता. तो दिखाऊ आणि पोकळ डामडौलात रमणारा होता. त्याचप्रमाणे स्वतःच्या कर्तृत्वाचा दिमाख मिरविणारा होता. त्यामुळेच त्याच्या उथळपणाबद्दल माझ्या चुलत्यांना तिरस्कार होता. तरी पण त्याच्याबद्दल काहीही म्हटले तरी मला असे सांगावेसे वाटते की, त्याची श्रद्धा व डामडौल माणुसकीच्या भरभक्कम पायावर उभारलेला होता. तो एकटाच उभा राहिला. इतर लोक काय करतात याची त्याने दखल घेतली नाही.

त्यानंतर हिरम् अरनोल्ड उभा राहिला. त्या मागोमाग रॉक्फोर्ड, आर्मस्ट्राँग, आल्फेअर, मुनरो, एलन्थनस्टोन आणि माझे वडील, लेविस्, ड्रेटन, मॅडिसन हे सर्व उभे राहिले. त्यावेळी मला असे वाटले की, त्या परगण्यातील टेकड्या आणि दऱ्याच उभ्या राहिल्या होत्या.

हे सर्व अगदी वैचित्र्यपूर्ण होते. त्याचप्रमाणे धडा देणारेही होते. ही सर्व मंडळी उभ्या चेहऱ्याची होती. त्यांना परिणामाची फिकीर नव्हती. राजकीय घडामोडीत मोठमोठ्याने ओरडणारी अथवा एखाद्या झुंडीबरोबर ओरडत धावणारांपैकी ही कोणीही नव्हती, तर ज्यांच्यामुळे सार्वभौमत्व डोळ्यासमोर येईल अशीच ही माणसे होती. देशातील कायदा, सुव्यवस्था आणि संस्कृतीची उभारणी झाली होती, ती या माणसांच्या हृदयात तेवत असणाऱ्या न्यायाच्या भावनेवरच !

यानंतर उभे राहिले ते फादर डॉन-व्हॅन. त्यांच्या मालकीचा एक कळप नदीपलीकडे होता. तो कळप जितका गरीब होता तितकेच ते विनम्र होते. त्याचप्रमाणे ते धावरलेलेही नव्हते. बॉनसन याने कॅलविन व अॅडम रायडर यांना उपदेश केला होता. त्या काळात कोणाचाही एक दुसऱ्याच्या शिकवण्यावर, उपदेशावर विश्वास नव्हता, परंतु त्या सर्वांची न्यायावर मात्र नितांत श्रद्धा होती आणि त्यांना आता न्यायाची बाजू दिसत होती ती अॅबनरचीच !

सर्वांत शेवटी उभे राहिले ते नॅथॅनिअल डेव्हिसन. ते वयोवृद्ध असल्याने मुलांनी मदत करण्याची वाट पाहत होते. ज्यावेळी व्हर्जिनियात विधानसभेत प्रतिष्ठित आणि जमीनदार यांनाच बसण्याचा मान मिळत होता, तेव्हा ते तिचे सदस्य होते. ती एक न्यायी, निर्भयी व सन्माननीय व्यक्ती होती.

न्यायाधीश मात्र दुर्मुखलेल्या चेहऱ्याने आपली सर्वोच्चता लादण्याचा वेडा प्रयत्न करीत होते. त्यांनी रागारागाने बाक बडविले व न्यायालय मोकळे करण्याची आज्ञा शेरिफला फर्माविली. तरी पण शेरिफ शांतपणे एका बाजूला उभाच होता. पण न्यायाधीशांची आज्ञा पाळण्याबाबत त्याने एकही पाऊल उचलले नाही.

न्यायाधीश अधिकच भडकले व म्हणाले, 'मी या ठिकाणी कायद्याचा प्रतिनिधी म्हणून उभा आहे. तुला सांगितलेले काम तू कर.'

शेरिफ हा सरळ मनाचा माणूस होता. तो म्हणाला, 'मी कायद्याच्या प्रतिनिधीचे म्हणणे मान्य केले असते, जर या न्यायालयात कायद्याचे अस्तित्व नसते तर.'

न्यायाधीश उभे राहिले, 'ही एक क्रांतीच म्हणावी लागेल. याबाबत लष्करी कारवाईसाठी मी गव्हर्नरकडे तक्रार करतो.'

यावर वयोवृद्ध मॅथॅनिअल डॅव्हिसन खड्या आवाजात म्हणाले, 'न्यायाधीशमहाशय, आपण खाली बसा. इथे क्रांती वगैरे काहीही नाही आणि तुम्हाला लष्करालाही पाचारण करण्याची जरूरी नाही. आम्ही या ठिकाणी जमलो आहोत ते कायदेशीर घडणाऱ्या गोष्टींना पाठिंबा देण्यासाठीच ! तुमच्यावर सर्वांची श्रद्धा असल्यानेच तुम्हाला न्यायाधीश म्हणून निवडले आहे आणि जर काही गैरसमज झाला असेल तर तो त्यांच्या लक्षात येईलच.' ते काही वेळ स्तब्ध राहिले. जणू काही ते

श्वास घेत होते. नंतर ते बोलले, 'अधिकाराचे हक्क आपणाकडेच अबाधित आहेत. तुम्ही आमच्यावर कायद्याचे सार्वभौमत्व लादा आमचा तुम्हाला सदैव पाठिंबा राहील आणि याचबरोबर याचीही खात्री बाळगा की, तुमच्या रूपाने अपमानित झाल्याचे आम्हाला खपणार नाही.' यावेळी त्यांचा आवाज गंभीर व निश्चयी बनला. पुढे ते म्हणाले, 'तुम्ही आम्हाला तुमच्या विरुद्ध आहोत असे म्हणता ही एक गंभीर बाब आहे आणि ही गोष्ट कोणीही मनुष्य एखाद्या क्षुल्लक कारणासाठी सहजपणे करू शकणार नाही.' ते नंतर ॲबनरकडे वळले व म्हणाले, 'ही काय भानगड आहे?'

जरी मी लहान होतो तरी मला हे समजले की, ते वृद्ध गृहस्थ लोकांच्या वतीने बोलत होते. मला मात्र भीती वाटू लागली. कारण त्यांनी स्वीकारलेला पवित्रा हा एकदम वरच्या दर्जाचा होता. तरी पण ते एखाद्या मोठ्या खडकाच्या सावलीप्रमाणे अगदी निश्चल होते.

ॲबनर म्हणाले, 'मी न्यायाधीशमहाशयांवर एलिव्ह मार्शचा खून केल्याचा आरोप करतो. त्यामुळे त्यांनी आपली जागा खाली करावी अशी मी मागणी करतो.'

मी जेव्हा या अद्भुत गोष्टीविषयी विचार करतो तेव्हा मला हा आघात सायमन किलरेलने किती शांतपणे सहन केला हे पाहून आश्चर्य वाटते. आता तो पुढील प्रसंगांना तोंड देण्यासाठी तयारही झाला होता. तरी पण एवढी तयारी असूनही त्या पोलादी पुरुषावर खुनाच्या आरोपाचा परिणाम झाला, त्यामुळे तो थिजून गेला. त्याने अत्याचार दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यात त्याला यश आले नव्हते. आता ते शांतपणे टेबलावर कोपर टेकून बसले होते. त्यांनी थंडपणे ॲबनरकडे पाहिले, परंतु एकही शब्द उच्चारला नाही. न्यायालयात सर्वत्र शांतता पसरलेली होती. या शांततेचा भंग मॅथॅनिअल डेव्हिसनने केला. त्याची मुद्रा करारी बनली. पोलादी आवाजात म्हणाले, 'नाही ॲबनर, तुम्ही केलेल्या आरोपावरून न्यायाधीश आपले आसन खाली करणार नाहीत. त्यासाठी तुमच्याकडे जर काही पुरावे असतील तर न्यायालयात सादर करा.'

न्यायाधीशांनी आपली शांत मुद्रा ॲबनरकडून नॅथॅनिअल डेव्हिसनकडे वळविली व नंतर त्यांनी न्यायालयात उभ्या असलेल्या लोकांकडे दृष्टिकटाक्ष टाकला.

न्यायाधीश म्हणाले, 'मी या पदावर राहू इच्छित नाही व एखाद्या सामान्य माणसाच्या तोंडी आरोपावरून माझी परीक्षा घेऊ देणार नाही. जर इच्छाच असेल तर तुम्ही माझ्याकडून न्यायालयीन कायद्याचा हक्क काढून घेऊ शकता. परंतु व्हर्जिनियाची राज्यघटनाच बेकादेशीर ठरवू शकणार नाही व त्या राज्याचा नागरिक या दृष्टीने माझे अधिकारही स्थगित ठेवू शकणार नाही.' यानंतर ते उठून उभे राहिले व म्हणाले, 'जर तुमची इच्छाच असेल तर मी माझी जागा खाली करीन, कारण तुमच्या या कृत्याने हे न्यायालय म्हणजे एक अत्याचाराची कोठडी बनली आहे.' हे सर्व बोलणे अगदी शांतपणे झाले. मला वाटते, आता मात न करता येण्यासारखी अडचण निर्माण झाली होती. या आघाडीवर सर्व लोक शांत कसे राहणार? बेकायदेशीर घटकांना कायद्यापुढे कसे हजर करणार होते? व या माणसाचा तो औपचारिकपणा कसा नाकारणार होते? वरिष्ठ ज्युरी, औपचारिक आरोप व सर्व हक्क हे सर्व काही एकाच माणसासाठी होते काय? इतरांसाठी नव्हते?

या कूटप्रश्नाला नॅथिअल डेव्हिसनने उत्तर दिले. तो म्हणाला, 'या घटकेला आपल्या नागरिकत्वाच्या हक्कांचा काहीही संबंध नाही. तुमचे नागरिकत्वाचे हक्क अबाधित आहेत व त्याला धक्काही पोचणार नाही. परंतु तुम्ही सामान्य नागरिक नाही. तुम्ही तर लोकांवर कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि तुमच्या तेवढ्याच हक्कांना आव्हान दिले गेले आहे. तुमच्या पाठीशी असणारी अंतिम सत्ता या दृष्टीने आम्हाला कारण समजू देत.'

यावर न्यायाधीश म्हणाले, 'तुम्ही मला या ठिकाणी कैदी समजता की काय?'

डेव्हिसन म्हणाले, 'आम्ही तुम्हाला न्यायाधीशच समजतो. तुम्हाला न्यायालय सोडता येणार नाही. एवढेच नव्हे तर आपले आसनही सोडता येणार नाही. हे न्यायालय लोकांची इच्छा असेपर्यंत आहे व तसेच अबाधित राहील. त्यात कोणत्याही परिस्थितीत एखाद्याच्या मागणीवरून बदल केला जाणार नाही. पण पुरेसे कारण असेल तरच त्यात बदल केला जाईल.'

पुन्हा मला चुलत्याविषयी चिंता वाटू लागली. कारण मला माहीत होते की


## दहा दर्जेदार स्वस्त कादंबऱ्या

कोहिमा / केशव केळकर / डेमी ९६ / ३-००
वावर / प्र. ना. शेणई / डेमी ८६ / ३-००
अंधाराचे अश्रू / हिदायतखान / डेमी १३२ / ३-००
प्रतीक्षा / प्रभाकर पेंढारकर / डेमी १०६ / ३-००
काळोख आणि किरण / ल. ग. जोग / डेमी ८८ / ३-००
प्रतिष्ठा / अनंत मनोहर / डेमी ८० / ३-००
'मे'तील सात दिवस / नरूभाऊ लिमये / डेमी १२८ / ३-००
अंतरपट / अ. ह. लिमये / क्राऊन १४० / ३-००
जीवनसंगीत / ना. सी. फडके / क्राउन १९४ / ३-००
परशुरामाची सावली / रवींद्र पिंगे / बारावा डेमी १३८ / ४-००

**विश्वकर्मा साहित्यालय .....** दूरध्वनी : ४१२०९
२०३५/२ सदाशिव पेठ, टिळक पथ, पुणे ३०.

लोकांनी नियुक्त केलेल्या एखाद्या न्यायालयीन अधिकारी व्यक्तीच्या कामकाजात अडथळा आणणे ही गंभीर बाब होती. अॅबनर यांना या सर्व गोष्टीची कल्पना असावी आणि ते मला आता निश्चयी वाटत होते. अॅबनरने बोलण्यास सुरुवात केली.

टेलर व त्या मुलीकडे बोट दाखवून ते म्हणाले, 'या दोन व्यक्ती एकमेकांना वाचविण्यासाठी स्वतःचे बलिदान करण्यास तयार आहेत. परंतु या दोघांपैकी कोणीही खुनी नाही. टेलरचे शांत राहणे व आतापर्यंत ही मुलगी जे जे बोलली, ते सर्व खोटे आहे. सत्य हे आहे की, या प्रेमिकात भांडण झाले. टेलरने देश सोडला होता. फक्त जोपर्यंत ही मुलगी या खटल्यात ओढली जात नाही तोपर्यंत त्याने आपला उद्देश स्पष्ट केला नव्हता. याउलट ही मुलगी आपल्या प्रियकराला वाचविण्यासाठी तिने न केलेला गुन्हा कबूल करीत आहे. तर मग हा खून कोणी केला ? हा प्रश्न आहेच.'

अॅबनर काही वेळ शांत राहिले व डॉ. स्टॉर्म यांच्याकडे निर्देश करून म्हणाले, 'आम्ही त्या मुलीविषयी संशय घेतला होता, कारण मार्शवर पावातून (अन्नातून) विषप्रयोग केला होता, व नंतर बंदुकीची गोळी चालविली होती. हे सर्व सांगण्यासाठी कालच आम्ही न्यायाधीशांच्या घरी त्यांच्याबरोबर गेलो होतो.' त्यानंतर अल्पकाळ थांबून ते पुढे म्हणाले, 'पण त्यांच्या घरी गेल्यावर अशी एक घटना घडली, त्यामुळे आमच्या लक्षात आले की, आपली काहीतरी चूक होते आहे. नंतर आणखी एका घटनेने त्यास दुजोरा दिला. काही वेळाने घडलेल्या तिसऱ्या घटनेने आमची तशी पक्की खात्रीच झाली. या घटना म्हणजे, न्यायाधीशांचे घड्याळ बंद पडले होते. दुसरे असे की, आम्हाला त्यांच्या ग्रंथालयात एक विशिष्ट पानच फाडलेले पुस्तक आढळले आणि तिसरे म्हणजे त्या परगण्यातील कारकुनाच्या ऑफिसमध्ये एक जुने नोंदणीपुस्तक दिसले.'

अॅबनर पुढे म्हणाले, 'टेलरच्या व या मुलीच्या आरोपाच्या जोडीला आणखी एक पुरावा होता. परंतु तिला पाठिंबा देणारी एकच घटना होती, त्यामुळे इतर गोष्टी स्पष्ट होईपर्यंत ती सुचविण्याविषयी आम्हाला भीती वाटत होती. वैयक्तिक स्वार्थापायी कोणीतरी मार्श यांचा अशाप्रकारे खून केला होता की, ज्यामुळे त्याचा संशय स्वयंपाक करणाऱ्या मुलीवर येईल. नंतर टेलर निघून गेल्याचे त्या व्यक्तीच्या लक्षात आले. त्यामुळे भिंतीवरील बंदुक पाहून खोटा पुरावा निर्माण करण्यासाठी नवीन कल्पना लढवून त्याने मार्शवर गोळी चालविली होती. अशा प्रकारे या सर्व घटना घडल्या होत्या.

'बंदूक चालविताना बंदुकीच्या चापावरील पट्टी हत्या करणाऱ्या माणसाच्या घड्याळात अडकली व त्यामुळे त्याचे घड्याळ बाहेर ओढून आले. त्याने घड्याळ परत खिशात ठेवले, पण फरशीवर पडलेली चावी उचलण्यास मात्र तो विसरला. ती चावी नंतर मार्शच्या शवाजवळून मी उचलली.'

यानंतर अॅबनर न्यायाधीशांकडे वळून म्हणाले, 'या सर्व पुराव्याच्या आधारावरच सायमन किलरेल यांच्यावर मार्शच्या खुनाचा मी आरोप करीत आहे; कारण त्या चावीने त्यांच्या घड्याळास चावी देता येते; दुसरे असे की, जुने नोंदणीपुस्तक असे सांगते की, मार्श यांची सर्व जमीन त्यांच्या मृत्यूनंतर सायमन किलरेल यांच्याकडेच येणार होती. तिसरे म्हणजे, त्यांच्या ग्रंथालयात एक पुस्तक मिळाले, त्यातील फक्त एकच पान फाडलेले होते, की ज्या पानावर विषप्रयोग कसे करावेत हे सांगितलेले होते. ज्या पद्धतीने एलिव्ह मार्शवर विषप्रयोग केला गेला होता, त्या पद्धतीचे वर्णन करणारे पान त्या पुस्तकातून फाडलेले होते.'

अॅबनर यांच्या या वक्तव्यानंतर काही काळ पसरलेली शांतता एका गडगडाटी आवाजाने भंग पावली. तो आवाज होता रॅन्डॉल्फचा ! ते म्हणाले, 'न्यायाधीशमहाशय, खाली या.' यावेळी नॅथिनिअल डेव्हिसन मात्र शांत होते.

न्यायाधीश हळूहळू उभे राहिले. आता त्यांच्या चेहऱ्यावर एक निग्रह दिसू लागला होता. आणि पटकन् ते म्हणाले, 'होय, मी या प्रश्नाचे उत्तर काही क्षणांतच देतो.'

त्यानंतर न्यायाधीश तिथून वळले आणि न्यायालयामागे असणाऱ्या आपल्या खोलीत गेले. त्या खोलीला न्यायालयाच्या बाजूला उघडणारे तेवढे एकच दार होते.

न्यायालयातील सर्व खिडक्या उघड्या होत्या; त्या मधून आम्हा सर्वांना दूरवर पसरलेली हिरवीगार शेते, सूर्य, दूरवरचे पर्वत दिसत होते. अद्याप त्या खोलीतून न्यायाधीश परतले नव्हते. परंतु लौकरच त्या बंद दारामागून गोळी चालविल्याचा आवाज आला. लगेच शेरिफने दार उघडले आणि लोकांनी पाहिले, तो हातात एक पिस्तुल घेऊन रक्ताच्या थारोळ्यात सायमन किलरेल पडले होते. □

[ मूळ संग्रह : 'Great stories of detection'
Edited By : R. C. Bull

कथा :
Naboth's Vineyand.
By : Melville Devisson Post ]





# अशी चौकशी, अशी फाशी !

र. धों. घाणेकर

## : सहा :

३० मे १९६० ला सुप्रसिद्ध Memorial Day ह्या दिवशी अमेरिकेतील नवकोटनारायण नेल्सन रॉकफेलर ह्यांनी टेरिटाऊन न्यूयॉर्क येथे आपल्या निवासस्थानी आपल्या सहकाऱ्यांची बैठक भरवून आपण राष्ट्रपतिपदाची निवडणूक, जर रिपब्लिकन पक्षाने आपल्याला उभे केले तर, लढविणार असल्याचे बोलून दाखविले. वर्तमानपत्रांतून तसे जाहीर झाले. १ जून १९६० ते १९ जुलै १९६० ह्या दरम्यानच्या काळात रॉकफेलरनी टी. व्ही. व रेडिओवरून आपले म्हणणे जनतेच्या कानावर घालण्याचा सपाटा लावला होता. त्याला हे पक्के माहीत होते की, निक्सनची निवडणूक-यंत्रणेवर फार भक्कम पक्कड असून ती पक्कड ढिली करणे कठीण आहे.

कॅलिफोर्नियातील नामांकित वकील, रॉकफेलरचा मित्र—विल्यम ब्रिटन ह्याने 'सिटिझन्स फॉर रॉकफेलर' ही चळवळ उभारली, नॅशनल ड्राफ्ट रॉकफेलर ही संस्था उभी करून त्या संस्थेमार्फत प्रायमरी निवडणुकीत रॉकफेलर कसा निवडून देता येईल, ह्याचा विचार केला. त्याचे प्रचारतंत्र सॅनफ्रान्सिसको, सॅन डिआगो लॉस एन्जेल्स व सॅक्रॅमेंटो येथे जोरात सुरू झाले.

शिकॅगो हे अमेरिकेतील असे शहर आहे की, ज्या ठिकाणी आतापर्यंत अनेक महत्त्वाच्या परिषदा, बैठकी, वार्षिक अधिवेशने मोठ्या प्रमाणावर भरली गेलेली होती. ह्याच शहरामध्ये भरलेल्या राजकीय मेळाव्यातून पक्षाध्यक्षांनी आपआपल्या उमेदवारांची नावे जाहीर केली होती व ते निवडून आणले होते. असा ह्या शहराचा लौकिक.

लिंकन, गारफील्ड, ग्रॅन्ट, क्लेव्हलंड, हॅरिसन, थिओडेर रुझव्हेल्ट, हार्डींज, कूलिज, फ्रँकलिन रुझव्हेल्ट, ट्रूमन आणि आयसेनहॉवर ह्या प्रत्येक राष्ट्राध्यक्षाचे नाव त्या त्या पक्षानी शिकॅगोमध्ये भरलेल्या राजकीय परिषदांतूनच सुचविले होते व ते पक्षाने मान्य केले होते.

शिकॅगो नगरपालिकेला, अशा मोठमोठाल्या परिषदा भरत असल्यामुळे, त्या नगरपालिकेला व्यवस्था आणि बंदोबस्त योग्य तो थोड्या मुदतीत कसा ठेवावयाचा याची कल्पना असे. आरोग्य राखण्याच्या बाबतीत अगोदरपासूनच विशेष काळजी घेण्यांत येते. पोलिस बंदोबस्त योग्य तऱ्हेने कसा करावयाचा ह्याचा आराखडा नेहमीच तयार असतो. 'टॅक्सीवाल्याच्याकडून जनतेला पिळवणूक होऊ नये व त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळावे म्हणून टॅक्सी ड्रायव्हर्सना त्यावेळेपुरते खाकीऐवजी पांढरे पोषाख वापरण्याची सक्ती केलेली असते. स्वतंत्र, स्वच्छ उपाहारगृहे व हॉटेल्स खास बांधून घेतलेली असतात. त्यामुळे शिकॅगोच्या अधिकाऱ्यांना आलेल्या पाहुण्यांची बरदास्त ठेवण्याची जणू काय सवयच झालेली असते. अशा मोठ्या परिषदांच्या जोडीला लहानलहान संमेलने भरतच असतात. शेतकरी—कामकरी वर्ग एकत्र येऊन नव्या नव्या ओळखी करून घेत असतात.

दर ४ वर्षांनी अमेरिकेच्या अध्यक्ष-निवडणुकांच्या निमित्ताने भरणारे अधिवेशन तर क्रांतिकारच ठरते.

१९५६ पासूनच रिपब्लिकन पक्षाला गळती लागली होती. चांगली चांगली मंडळी राजीनामा सादर करून बाहेर पडत होती. पक्ष-

संघटनेत जोर व तेज राहिले नव्हते. आयसेनहॉवरनी उत्तेजक कार्यक्रम आखून तो पार पाडण्यासाठी निक्सनची नेमणूक केली. रिपब्लिकन पक्षाने तत्त्वे व मूल्ये सामान्य व्यक्तीपर्यंत नेऊन पोहचविण्याची योजना आखली गेली. चार्लस पर्सी ह्या व्यक्तीची निवड त्या कामासाठीच निक्सनने केली. पुरे वर्षभर राबून १९६० च्या सुरुवातीपर्यंत चार्लस पर्सी व निक्सन ह्यांनी पक्ष मजबूत करण्याचा व नवनवीन माणसे पक्षात आणण्याचा सपाटाच लावला. निक्सनला हे माहीत होते की, त्याला टक्कर देण्यासाठी रॉकफेलर उभा राहाणार आहे. यासाठी त्यांच्यातील दोषांचे पूर्ण मूल्यमापन निक्सनने केलेले होते.

रॉकफेलरला आपल्या मताशी जुळते घेण्यासंबंधी विचार करावयाला लावावा, ह्या उद्देशाने निक्सन त्याला भेटला. दोघांची बोलणी फिसकटली व ६ जुलैला निक्सन लॉस एन्जेल्सला परतला. जुलै १८ पासून लहान लहान सभा-संमेलने सुरू झाली. ५० संस्थानांमधील रिपब्लिकन पक्ष-शाखांच्या गुप्त बैठकी होऊन विचार-विनिमय सुरू झाला. निक्सनने आपण राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी उभे राहाणार असल्याचे पक्षाध्यक्षांना कळविले. २१ जुलै १९६० ला पुनः एकदा प्रयत्न करून पाहावा ह्या उद्देशाने निक्सन मेजर डोनॉल्ड ह्यूजेस ह्याला बरोबर घेऊन रॉकफेलरला भेटण्यासाठी गेला. बराच वेळ बोलणी झाली. उपराष्ट्रपतिपद त्याने स्वीकारावे अशी त्याला निक्सनने विनंती केली. ती धुडकावली गेली. परंतु पक्षसंघटना, पक्षकार्यक्रम ह्या विषयांवर दोघात रात्रभर विचारविनिमय झाला व २३ जुलैला दोघांनी एक जोड-पत्रक बाहेर पाडले.

एका कोटयधीशाच्या घरात निक्सनसारखी व्यक्ती आपणहून पक्षाला न कळविता जाते, रात्रभर विचारविनिमय करते, दुसऱ्याच दिवशी ताबडतोब रिपब्लिकन पक्षाने काय करावे ह्या विषयीचे पत्रक बाहेर काढते, हे सर्व अधिवेशन-कमिटीला बिलकुल पसंत पडले नाही.

सिनेटर गोल्डवॉटरने तर रागाच्या भरात टी. व्ही. वरील मुलाखतीत जाहीर केले की, न्यूयॉर्कमधील पाचव्या ॲव्हेन्यूमधील हा करार म्हणजे पक्षाचे डंकर्क! रिपब्लिकन-पक्षाचा सत्यानाश! पक्ष कायमचा गारद होणार!!

ह्या प्रकरणाची इतकी जबरदस्त राळ उडविली गेली की, आयसेनहॉवरच्या कानावर जेव्हा ही बातमी पोहोचली तेव्हा त्यालाही म्हणावें लागले की, निक्सनला हा लुडबूडपणा व अव्यापारेषु-व्यापार करायला कोणी सांगितले होते? आपणच आपले नाव राष्ट्रपतिपदासाठी जाहीर करावयाचं आणि रॉकफेलरला उपराष्ट्रपतिपद बहाल करावयाचं–छान धंदा!

नाही तरी आयसेनहॉवर आता काही राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी उभा राहाणार नाहीच, तेव्हा त्यांनी काहीही म्हटले तरी त्याला विशेषसे मत द्यायला तयार नव्हता.

'निग्रोचें मतदान' हा ह्यावेळी चर्चिला जाणारा महत्त्वाचा विषय. उत्तर अमेरिकेचे निग्रो-मतदान हे डेमोक्रॅटिक पक्षालाच मिळणारे व दक्षिण अमेरिकेतील गोऱ्या लोकांचे मतदान हे रिपब्लिकन पक्षाला– तेव्हा उत्तर भागातील निग्रो मतदान हे आपल्या बाजूस कसे कळवावयाचे, हा निक्सनपुढे मोठा बिकट प्रश्न येऊन उभा राहिला होता.

ह्या निग्रो-प्रश्नावर रॉकफेलरनी, निक्सनशी समझौता केला असता व त्या बाबतीतील अटी निक्सननी मान्य केल्या असत्या, तर निक्सनी राष्ट्रपतिपदाची निवडणूक सहजासहजी जिंकली असती. तो प्रश्न केनेडीने चांगला हाताळला व त्याला लढत जिंकणे सोपे झाले होते.

२४ जुलै १९६० ला रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन भरले व दुसरे दोन दिवस–२५ व २६ जुलै–सोमवार आणि मंगळवारी रॉकफेलर यांनीं सबमरिन्स व बॅलिस्टिक मिझाईल्स ह्यांच्या बाबतीतील आणलेले दोन ठराव, पुष्कळ चर्चा झाल्यावर, मतास टाकावयाचे ठरले. दोन्हीही ठराव बहुमताने उधळले गेले. रॉकफेलरच्या अंगाचा भडका उडाला. त्याने निवडणुकीतून आपले अंग काढून घेतले.

२७ जुलै ह्या दिवशी रिपब्लिकन पक्षाने राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी निक्सनला उभे केल्याची घोषणा केली. परिषदेचे सूप वाजले.

२८ जुलैला सकाळीच कॉनरेड–हिल्टन हॉटेलमध्ये निक्सनने पक्षाच्या मुख्य मुख्य अशा ३६ व्यक्तींना बोलावून घेतले व उपराष्ट्रपतिपदासाठी कोणाला उभे करावयाचे ह्याविषयी बोलणी केली. चर्चेनंतर त्याच दिवशी संध्याकाळी हेन्री कॅबट् लॉज ह्याचे नाव मान्य केले गेल्याचे जाहीर करण्यात आले.

रिपब्लिकन पक्षातर्फे निक्सन व डेमोक्रॅटिक पक्षातर्फे जॉन केनेडी हे दोघे १९६० च्या नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी रणांगणात उतरले.

१९५० सालात अमेरिकेची लोकसंख्या १५ कोटी १३ लाख होती, ती १९६० मध्ये १७ कोटी ९३ लाख झाली. सर्वांत अधिक वाढ म्हणजे ४४ टक्के लॉस एन्जेल्स ह्या भागात झाली. अमेरिकेतील एकंदर परगणे ३०७२ धरले तर १५३६ परगण्यांमधून लोकसंख्येची वाढ झाली नाही, उलटी घटली. एकंदर प्रमाण असे दिसते की, शहरे सोडून लोकसंख्या खेडेगावांतून वाढत चालली. १० वर्षांच्या काळात खेडेगावांतून २ कोटी ८० लाख लोकवस्ती वाढली.

उत्तर अमेरिकेत ह्या १९६० सालात १ कोटी ८८ लाख निग्रोंची वस्ती होती. वॉशिंग्टन (डी. सी.) ह्या राजधानीच्या शहरी ५४ टक्के निग्रो, न्यूयॉर्कमध्ये १४ टक्के, मानहातीनमध्ये २९ टक्के, फिलाडेल्फिया २६ टक्के, डेट्रॉइट २९ टक्के व नेवॉर्क आणि न्यूजर्सीमध्ये १४ टक्के हे प्रमाण होते.

अशा परिस्थितीत निग्रो–मतांची भर ही प्रत्येक निवडणुकीत महत्त्वाची ठरली गेली व त्याचा परिणाम १९६० च्या निवडणुकीवरही झालाच. ह्यावेळी फक्त ७ टक्के निग्रो अशिक्षित होते व जे शिक्षित होते ते मतदानाच्यावेळी जिकडे तारू झुकेल त्या दिशेला सुकाणू लावून आपला कार्यभाग उरकून घेत. १९५४ मध्ये सुप्रीम कोर्टाने निकाल दिल्यानंतर निग्रोला आपल्या मुलांना त्यांना पाहिजे त्या शाळांतून व महाविद्यालयांतून शिक्षण घेण्याची मुभा मिळाली व त्यामुळे शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. हा निकाल १७ मे १९५४ ला लागला आणि हा सुप्रीम कोर्टाचा निकाल एक ऐतिहासिक घटना ठरली. कारण १८९६ मध्ये PLESY V/S FERGUSON ह्या खटल्यात झालेला निकाल आता ४८ वर्षांनंतर फिरविला गेला व त्यामुळे काळे आणि गोरे हा भेदभाव कायमचा नष्ट झाला. आयसेनहॉवरची त्या निकालावरील प्रतिक्रिया विचारता तो म्हणाला, 'कोर्टाने एकदा साधकबाधक विचार

करून न्याय दिल्यानंतर, माझ्या पसंती व नापसंतीचा प्रश्नच उरत नाही. तो कायदा झाला आणि त्याचा मी मान राखणारच! हा एक तत्त्वाचा प्रश्न असतो.'

दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न ह्यावेळेस उभा होता तो म्हणजे कॅथॉलिक धर्मीयांच्या मतांचा. केनेडी हा कॅथॉलिक धर्माचा आहे म्हणून त्याला अमेरिकेतील सर्व कॅथॉलिक पंथियांनी स्वतःचे मत देऊन निवडून आणलेच पाहिजे, अशा तऱ्हेची चळवळ सुरू झाली.

एकंदर १७ कोटी ९३ लाख वस्तीपैकी ३ कोटी ४५ लाख कॅथॉलिक्स होते, म्हणजे जवळजवळ ४० टक्के. ह्यापैकी न्यूयॉर्क स्टेटमध्ये ४० टक्के, पेनसिल्व्हानियामध्ये २९ टक्के, एलिनॉईसमध्ये ३० टक्के, न्यूजर्सीमध्ये ३९ टक्के, मॅसॅच्यूसेटसमध्ये ५० टक्के, कनोवीकटमध्ये ४९ टक्के, ऱ्होड आयलंडमध्ये ६० टक्के, कॅलिफोर्नियामध्ये २२ टक्के, मिचिगॉनमध्ये २४ टक्के, मिनिसोटामध्ये २४ टक्के. ओहिओमध्ये २० टक्के, विसकॉनसिनमध्ये ३१ टक्के, मेरिलँडमध्ये २१ टक्के व मोंटानामध्ये २२ टक्के आणि बाकीच्या संस्थानांतून अगदी अल्प प्रमाण होते.

असे असूनसुद्धा महत्त्वाची गोष्ट म्हणजे जॉन केनेडी ह्याने असा कधीच प्रचार केला नाही की आपण आयरिश- कॅथॉलिक आहोत म्हणून कॅथॉलिक्सनी आपली मते द्यावीत. उलटपक्षी सुरुवातीलाच त्याने ह्या विषयीची दखल घेऊन जाहीरपणे निवेदन बाहेर काढले की राजकारण व धर्म ह्या दोन्हीही गोष्टी अगदी स्वतंत्र व विभिन्न आहेत. आपल्या अमेरिकेत राजकारण धर्मावर अधिष्ठित नाही. जरी आपण स्वतः रोमन कॅथॉलिक असलो तरी त्या भूमिकेवरून ही निवडणूक लढविली जात नाही हे प्रत्येकाने ध्यानात घ्यावे. रोमन कॅथॉलिक म्हणून मला मत देऊ नका. मी अमेरिकन होतो, आजही आहे व पुढेही अमेरिकन म्हणूनच जगणार आहे!

२८ जुलै १९६० पासून ते थेट ८ नोव्हेंबर १९६० पर्यंत निक्सन निवडणुकीच्या निमित्ताने सबंध अमेरिकाभर संचार करीतच होता. जवळजवळ सर्व संस्थानांच्या मुख्य मुख्य ठिकाणी तो भेटून आला. निवडणूक बोर्ड त्याने नेमले व त्या बोर्डाच्या मार्फतच सर्व चळवळीचे सूत्र हलविले जात होते. ह्या बोर्डमध्ये लिओनार्ड हॉल, रॉबर्ट फिंग, जेम्स बॅसेट, मॉर्टन, गायले, केरोल न्यूटन, रॉबर्ट मरियम अशा कर्तबगार व्यक्ती होत्या.

टी. व्ही. वर ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पाच फिल्म निक्सनविषयी दाखविल्या गेल्या. त्यांत निक्सनची रशिया भेट, चीन भेट, घरगुती जीवन ह्या संबंधीचे ते चित्रपट होते.

कॅलिफोर्निया, न्यूयॉर्क, ओहिओ, एलिनॉइस, पेनसिल्व्हानिया, टेक्सास व मिचिगॉन ह्या सात संस्थानांमध्ये रिपब्लिकन पक्ष मजबूत होता व त्या संस्थानांतून अधिक नेटाने व जोमाने काम करावयाचे ठरले.

प्रॉटेस्टंट-मत व उपनगर-वस्ती-मत ह्या दोन्हीही मतांच्याबद्दल केनेडी साशंक होता, तर कॅथॉलिक-मत आणि शेतकरी-मत ह्याविषयी निक्सनला भरंवसा नव्हता.

आठ वर्षे आयसेनहॉवरची रिपब्लिकन राजवट अमेरिकेत राहिल्यामुळे, निक्सनला पार्श्वभूमी चांगली मिळाली होती. ह्या कारकीर्दीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कारभार उपराष्ट्रपतिपदावरून निक्सनने चांगला हाताळलेला होता; त्याची राजकीय प्रतिमा जनतेपुढे आलेलीच होती. काही विशिष्ट गट मात्र असे होते की, निक्सनची प्रसंगोपात दिसणारी हातचलाखी, मध्येच उफाळणारा फाजील शहाणपणा व नको तेथे तिरसटपणाने वागण्याची वृत्ती त्यांना मान्य नव्हती. मोठमोठाले वर्तमानपत्रकार व स्तंभलेखक त्याच्या बाजूला कधीच नव्हते. प्रख्यात व्यंगचित्रकार हरबर्ट ब्लॉक, 'टाईम्स' व वॉशिंग्टन पोस्टमध्ये निक्सनच्या राजकीय आयुष्यातील महत्त्वाच्या वेचक गोष्टी हास्यचित्ररूपाने जनतेपुढे ठेवीत असत.

'शांतता व सुबत्ता' हे आयसेनहॉवरचे ब्रीदवाक्य निक्सननेही उचलले व आपली निवडणूक-चळवळ त्या ब्रीदाला धरूनच आखली.

युनायटेड नेशन्समध्ये उत्कृष्ट काम केलेला हेरी कॅबट लॉज हा देखील ज्यू, निग्रो ह्या जमातींशी संधान बांधून निवडून येण्याची शर्थ करीत होता.

'परराष्ट्रीय राजकारण' हे दोघांचेही हुकमी पान होते!

सर्व दौऱ्यामध्ये निक्सनचा नॉर्थ कॅरोलिना, अल्लाबामा व अटलांटा ह्या भागांतील दौरा अत्यंत यशस्वी झाला. जॉर्जिया भागात तर काय विचारायलाच नको. आयसेनहॉवरला दोन्ही वेळेस ह्या भागांतून ७० टक्के मते पडली होती. रिपब्लिकन पक्षाचे येथे बहुमत होते, ह्याचे कारण आयसेनहॉवर ही व्यक्ती रिपब्लिकन पक्षातर्फे उभी राहिली. त्यामुळे पक्षाची बूज वाढली व पक्ष बळकट झाला हे होय. आयसेनहॉवरच्या आठ वर्षांच्या कारकीर्दीला कोणी कधीही नावे ठेवली नाहीत; कसलेच आरोप करण्यास कोणी धजावले नाही. वय व आजारपण ह्यामुळे त्याचा जेवढा उपयोग पक्षाला व राष्ट्राला व्हावयास पाहिजे होता तेवढा झाला नाही, परंतु त्याने पक्षाची व राष्ट्राची प्रतिमा मात्र खासच उजळली.

पुढील ८ दिवस निक्सनचा प्रवास चालूच होता. निक्सन भाषणे देत होता, लोक ऐकत होते. त्या दौऱ्यात त्याने मिसिसिपीचा भाग रेडओक, डलेस सेंटर, द् मॉईन्स-नंतर मिसुरी-एकेका शहरातील अंतर कमीत कमी १५० मैल, पण निक्सन व त्याचे सहकारी व बातमीदारांच्या गाड्या सारख्या धावतच होत्या.

द मॉर्टन्स, मिसुरी, कान्सास, नेब्रास्का व डकोटा हे सर्व भाग शेतकऱ्यांचे, ह्या प्रदेशातून सगळीकडे मका पेरलेला. येथील मतदानांपैकी ६० टक्के मते निक्सनला मिळालेली. ह्यास कारण म्हणजे शेतकऱ्यांच्यापुढे भाषण करताना तो गावंढळ आणि ओबडधोबड भाषा वापरत असे. केनेडीला ते कधीच जमले नाही. जरा वरच्या थाटाची, अभिनयमुक्त, एखाद्या नटासारखी व कसलेली 'हार्वर्ड' इंग्लिश भाषा ही त्याची बोलण्याची ढब व लकब.

सप्टेंबरअखेरीला निक्सन व केनेडी ह्या दोघांचेही बाहेरचे दौरे संपले. आणि आता प्रचाराकरता रेडिओ व टेलिव्हिजनचा विशेष उपयोग प्रचारकार्याकरता दोघेही करू लागले.

## 'शांतता व सुबत्ता' हे निक्सनचे ब्रीदवाक्य!

१९५० साली अमेरिकेत ४४ लाख घरांतून म्हणजे लोकसंख्येच्या ११ टक्के टेलिव्हिजन-सेटस होते. १९६० साली मात्र ४ कोटी लोकांच्या घरांतून टी. व्ही. जाऊन पोहोचले. १९५९ पर्यंत राजकीय प्रचाराची भाषणे टेलिव्हिजनवर करण्यास अमेरिकन सरकारची बंदी होती. १९६० च्या सुरुवातीला N. B. C. व C. B. S. ह्या दोन मोठ्या कंपन्यांनी ३१५ व्या कलमामध्ये दुरुस्ती करवून घेतली व त्यामुळे प्रचारासाठी दूरचित्रवाणी मोकळी झाली.

राजकारणावरील भाषणासाठी टेलिव्हिजनचा उपयोग पहिल्या-प्रथम रीचर्ड निक्सनने सप्टेंबर १९५२ मध्ये करून घेतला. ते त्याचे भाषण बरेच गाजले. त्याला चेकर्स स्वीच ही संज्ञा मिळाली. त्यानंतर राजकारणी प्रचारतंत्रासाठी टी. व्ही. चा उपयोग बंद करण्यात आला व तो कायदा १९६० मध्ये बदलला गेला.

२६ सप्टेंबर, ७, १६ व २१ ऑक्टोबरला निक्सन व केनेडी ह्यांच्यातील निवडणुकीविषयक बोलणी टी. व्ही. वर एकांच बैठकीत सादर केली जावीत, असा करार झाला. पहिला संवाद C. B. S. शिकॅगो स्टेशनवरून, दुसरा संवाद N. B. C. वॉशिंग्टहून, तिसरा व चौथा A. B. C. लॉस एन्जेल्स व न्यूयॉर्कमधून असे ठरले. व्यवस्था झाली.

सप्टेंबर २५ ला निक्सन व केनेडी दोघेही शिकॅगोला येऊन पोहोचले. केनेडीने अॅम्बॅसॅडर-ईस्ट हॉटेलमध्ये मुक्काम ठोकला व व्हाइस प्रेसिडेंट निक्सनने पिक-कॉंग्रेस हॉटेलमध्ये आपल्या सह-काऱ्यांसह तळ ठोकला.

२६ तारखेला दोघेही कार्यक्रमाच्या अगोदर अर्धा तास स्टुडि-ओवर जाऊन पोहोचले.

बरोबर वेळेवर मॉडरेटर हारवर्ड स्मिथ रंगमंचावर येऊन म्हणाला, 'युनायटेड स्टेशनच्या रेडिओ आणि टेलिव्हिजन्सच्या सर्व केंद्रांवरून उपराष्ट्रपती निक्सन व केनेडी ह्यांचे चालू राजकारण आणि आगामी निवडणुका ह्यावरील मूल्यवान विचार ऐकायला मिळतील.'

७० मिलियन अमेरिकन्स डोळे विस्फारून व कान टवकारून आपल्या आपल्या घरच्या टी. व्ही. सेटससमोर ठाण मांडून बसले होते.

एकंदर जनमताचा अंदाज घेता असे बाहेर आले की, निक्सनच्या-पेक्षा केनेडीच्या बोलण्यात उठावदारपणा अधिक होता, विषय मांडण्याची ढब उत्कृष्ट होती व बोलणे सहजस्फूर्त वाटत होते.

ठरल्याप्रमाणे ७, १३ व २१ ऑक्टोबरला दोघांच्याही निर-निराळ्या केंद्रांवर मुलाखती झाल्या. पण पहिल्याचे नावीन्य नंतरच्या कार्यक्रमांतून वाटले नाही.

सी. बी. एस्. च्या अंदाजाप्रमाणे १२ कोटी लोकांनी दोघांची भाषणे ऐकली व दोघांनाही पाहिले. गॅलप पोल ताबडतोब बाहेर पडले व त्याचा अंदाज, केनेडीने निक्सनवर बाजी मारली असा आला.

निक्सनच्या दृष्टीने बघावयाचे म्हणजे त्याचेही दूरचित्रवाणी-वरील चर्चासत्रे हा एक धोका ठरला. उपराष्ट्रपती म्हणून तो आम जनतेच्या चांगलाच परिचयाचा होता, पण टेलिव्हिजनमुळे केनेडी लोकांच्या मनात अधिक भरला.

२२ ऑक्टोबरपासून दोघांचेही फिरून दौरे सुरू झाले. हार्टफोर्टहून भाषणे देत देत निक्सन ब्रिजपोर्ट, बफेलो, नायगारा, जॅकसनव्हिल' मिआमी, टंपा वेलिंग्टन् येथे भाषणे करून न्यूयॉर्कला पोहोचला. सभांतून मोठमोठाले फलक लावून ठेवलेले होते :

'We like Ike but we back Jack.'

राष्ट्रपतीच्या पदासाठी उभा राहण्याला उमेदवाराला कायद्याने ३० लाख डॉलर्स खर्च करण्याची परवानगी दिली आहे. पण १९६० सालच्या निवडणुकीत रिपब्लिकन व डेमोक्रॅट पक्षांनी आपल्या उमेदवाराकरिता प्रत्येकी एक कोटी डॉलर्स खर्च केले असावेत, असा अंदाज आहे.

७ नोव्हेंबर १९६० ला संध्याकाळी निक्सनच्या कार्यकर्त्यांनी आढावा घेतला. त्यांच्या मते एलिनॉईस, पेन्सिल्हानिया, टेक्सास, ओहिओ, कॅलिफोर्निया आणि मिचिगॉन ह्या संस्थानांतून त्याला ५० टक्के मते मिळतील व दक्षिण कॅरोलिना, लुईझाना, मिनिसोटा आणि डेलाक्स येथे ८० टक्के आणि न्यूयॉर्कला ३० टक्के-असा अंदाज झाला.

एकदाची ८ नोव्हेंबर उगवली. सकाळी मतदान सुरू झाले; व संध्याकाळी ५ वाजता संपले. मतमोजणीचे काम कॉम्प्यूटर्सवर पर-स्पर झटाझट होत राहिल्यामुळे निकाल रात्री १२ वाजून गेल्यावर बाहेर पडू लागले.

राष्ट्रपती निवडून येण्यात प्रत्येक व्यक्ती भाग घेते, असे जगामध्ये दोनच देश-- अमेरिका व जर्मनी.

जॉन केनेडी हा २३ संस्थानांतील ३०३ इलेक्टोरल व्होटस् मिळ-वून निवडून आला. रीचर्ड निक्सनला २६ संस्थानांतून २१९ मते मिळाली व मिसिसीपी ह्या संस्थानातून व्हर्जिनियाचा हॅरीवॉल्ड निवडला गेला.

सिनेटमध्ये ६४ डेमोक्रॅटस व ३६ रिपब्लिकन्स आणि हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये २६२ डेमोक्रॅटस व १७५ रिपब्लिकन्स निवडून धाडले गेले.

१० कोटी ७० लाख मतदारांपैकी ६ कोटी ८८ लाख ३२ हजार आठशे अठरा मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

केनेडीला ३४, २२१, ४६३ व निक्सनला ३४, १०८, ५८२ मते पडली.

निक्सनपेक्षा केनेडीला अवघी १ लाख १२ हजार मते अधिक पडली, यावरून निवडणूक किती चुरशीची झाली, हे कळते.

निवडणुकीच्या अगोदर निक्सनने अनेक किरकोळ चुका केल्या, परंतु सर्वांत मोठी घोडचूक केली ती म्हणजे निग्रो जमातीचे मत आपल्या बाजूस वळवून घेतले नाही. निग्रोंचा नेता मार्टिन ल्यूथर किंग ह्याला जुलै महिन्यात किरकोळ गुन्ह्यासाठी ४ महिन्यांची शिक्षा झाली होती, ती आपल्या अधिकारात निक्सनने माफी देऊन त्याला मुक्त केले असते, तर निवडणुकीचा रंग कदाचित पालटला असता. केनेडीने ह्या बाबतीत शक्य तो प्रयत्न केला. काही झाले नाही तरी निदान प्रयत्न करतो आहोत, असा आभास त्याने निर्माण केला व निग्रोंची सहानुभूती मिळविली.

अमेरिकेतील कॅथॉलिक धर्माचे लोक १९५० पर्यंत डेमोक्रॅटिक उमेदवाराला मत देत होते. आयसेनहॉवरला दोन्ही वेळेला त्यांनी आपली मते दिली, तशीच मते १९६० मध्येही निक्सनला मिळाली.

निक्सन हरला पण त्याची हिंमत खचली नाही थोडक्या मतांनी त्याचा पराभव झाला, ही गोष्ट त्याला विसरता येत नव्हती.

काही दिवसांनीच निक्सननी वृत्तपत्र बैठक घेतली व त्यात सांगितले, 'मित्रांनो, ह्यापुढे निक्सन तुम्हाला इकडे तिकडे लुडबुडताना दिसणार नाही. बातमीदारांशी आजची ही माझी अखेरचीच मुलाखत आहे!'

५ दिवसांनी लगेच A. B. C. नी टी. व्ही. वर पूर्वी ५ वर्षे कारावासाचीसजा झालेला कम्युनिस्ट अल्जर हिस ह्याला मुद्दाम मुलाखतीसाठी बोलावला व त्याने आपल्या मुलाखतीत म्हटले: It was the political obituary of Richard Nixon' [ही निवडणूक म्हणजे निक्सनचा राजकीय मृत्यू ठरला आहे!]

वॉशिंग्टनहून आपला गाशा गुंडाळून निक्सन वकिलीचा धंदा करण्यासाठी न्यूयॉर्कला गेला, तेथील वकिलीची त्याला सनद नव्हती, ती मिळण्यासंबंधी त्याने अर्ज केला.

रोस्को ड्रूमंड ह्या सुप्रसिद्ध स्तंभलेखकाने त्याची खास मुलाखत घेतली. त्यात निक्सन म्हणतो: I say catagorically that I have no contemplation at all of being the candidate for anything in 1964, 1968 or 1972. I have no political base. Anybody who thinks I could be candidate for anything in any year is off his roeker.' [मी आता निक्षून सांगतो की, मला १९६४, ६८ किंवा ७२ ह्या कोणत्याच वर्षी कोणत्याही निवडणुकीला उभे राहण्याची इच्छा नाही!']

आणि इतके स्पष्टपणे जाहीर करून सुद्धा निक्सन १९६४ साली कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरपदाच्या निवडणुकीला उभा राहिला...... आणि पडला!

असं म्हटल्याखेरीज राहवत नाही की, Honest men will lie and decent men will cheat for POWER.

['सत्ता काबीज करण्यासाठी प्रामाणिक व्यक्तीदेखील असत्य बोलतील आणि सत्शील व्यक्ती फसवाफसवीचे धंदे करतील!']

१९६२ सालानंतर निक्सनने राजकारणाकडे पाठ वळविली व तो न्यूयॉर्क येथे ब्रॉडस्ट्रीटवरील नामांकित सॉलिसिटर्स पेढी–MUDGE, STERN BALDWIN AND TODD ह्यांच्यामध्ये शिरला. त्या पेढीलाही निक्सनसारखी एक वजनदार व्यक्ती आपल्यात येऊन मिळाल्याचा आनंद झाला. त्यांनी आपल्या पेढीचे पूर्वीचे नाव बदलून NIXON–MUDGE–ROSE–GUTHERIE, ALEXANDER AND MITCHELL असे नाव ठेवले. नावावरून तरी असे स्पष्ट दिसते की, निक्सन व त्याचा दोस्त मिचेल हे एकदम आत शिरले, वकिलीचा व्यवसाय करू लागले, आणि ५ वर्षांनंतर एकदमच बाहेर पडले. एक अमेरिकेचा राष्ट्रपती झाला आणि दुसरा व्हाईट हाऊसचा अॅटर्नी जनरल! १९६८ मधील ही घटना आणि नंतर १९७४ मध्ये दोघांनीही आपल्या पदाचे राजीनामे दिले. मिचेलला ५ वर्षांची शिक्षा झाली–निक्सन कसा तरी निसटला, कारण प्रेसिडेंट फोर्डनी 'सर्व गुन्हे माफ' हा निक्सनच्या कपाळावर शिक्का मारला.

सुप्रसिद्ध कादंबरीकार चार्लस डिकन्स ह्याने Christmas Cards म्हणून सुंदर कादंबरी लिहिली आहे. त्यात मुख्य नायक मार्लो ह्याचे जे वर्णन केले आहे ते १९६३ पर्यंतच्या निक्सनच्या जीवनाला तंतोतंत लागू पडते.

'A man is not finished when he is defeated. He is finished when he quits.'

[निवडणुकीत हार-जीत चालायचीच. हरला म्हणजे तो अगदी खलास झाला, असे काही नव्हे! त्याने पदत्याग करणं म्हणजे तो खरा खलास झाला असं समजायचं!]

१९४६ सालात निक्सन राजकारणात शिरला तो कॉंग्रेसमन म्हणून व १९६० मध्ये बाहेर पडला तो राष्ट्रपतिपदाची निवडणूक हरला म्हणून; परंतु पुन: १९६८ची निवडणूक त्याने जिंकली, तो राष्ट्रपती झाला– पुन: १९७२ मधे त्याच पदावर निवडून आला आणि ८ ऑगस्ट १९७४ ला बाहेर पडला. १९४६ सालापासून तो १९७४ पर्यंत निक्सनची कारकीर्द संपेपर्यंत अमेरिकेच्या अत्यंत मानहानीकारक असे प्रकरण म्हणजे व्हिएटनाम. परराष्ट्रीय राजकारण लढविणे हेच निक्सनचे जीवन असल्यामुळे नेहमीच व्हिएटनाम प्रश्न त्याच्या मनामध्ये घोळत असायचा.

हे अत्यंत महत्त्वाचे असे व्हिएटनाम प्रकरण काय व ते अमेरिकेने कसे हाताळले, हे सविस्तरपणे सांगितलेले बरे.

[क्रमश:]


पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

## The Secret Life of Plants

By Peter Tompkins and Christopher Bird

(Avon Books, Pages 416, $ 1·95)

---

वनस्पतीमध्ये जीव असतो हे जगदीशचंद्र बोसने दाखवून दिले. पण तुम्हाला कोणी सांगितले की, वनस्पती ही मनुष्यापेक्षा जास्त संवेदनशील 'वस्तू' आहे तर तुम्हाला ते खरे वाटेल काय ? तुमच्या मनात काय विचार चालले आहे हे सुद्धा वनस्पतीला कळते, असे टॉम्पकीन्स व बर्ड म्हणतात ! (म्हणजे आता अगदी जंगलात निवांतपणे खाजगी गोष्टी करण्याचे टाळा व तुमच्या घराच्याभोवती झाडे लावू नका !) अर्थात टॉम्पकीन्स आणि बर्ड जेव्हा 'म्हणतात' तेव्हा त्यामागे पुष्कळ संशोधन केलेले असते. हे पुस्तक लिहिताना ह्या लेखकद्वयांनी ह्याच विषयावरील इतर ३७९ पुस्तके व थिसीस वाचले. एवढा एकटक विद्याव्यासंग केल्यानंतर अर्थातच त्यांचे 'म्हणणे' आपण respectfully ऐकले पाहिजे. तथापि कोणतीही 'supernature' ची गोष्ट (पु. भा. भाव्यांच्या भाषेत) "फिरंगीच्या" शब्दात म्हणायचे झाले तर "चिमूटभर मिठाबरोबर घेतलेली बरी" (with a pinch of salt). आणि हे ४१६ पानी पुस्तक फक्त चिमूटभरच मिठाबरोबर घेतले तरी अळणी वाटणार नाही ह्याची मी हमी देतो.

तर मी काय म्हणत होतो ? तुमच्या मनात काय चालले आहे, हे वनस्पतीला तर कळतेच. पण त्या अवकाशात ते रहस्यमय कार्य आहे ? ज्याला कुणी परमेश्वर तर कुणी नियती म्हणतात, त्याच्याबरोबरसुद्धा वनस्पती जग communicate करते, असे हे लेखक म्हणतात ! एकदा तर कहरच झाला. सहा जणांना एका वनस्पतीसमोर उभे केले गेले. हे सहाजण त्या वनस्पतीसमोर येण्याआधीच एक 'कट' करून आले होते. तो 'कट' असा होता की, त्या सहामधील एकाने दुसऱ्या एका जवळच्या झाडाचा 'खून' करावा ! अर्थात त्याचा सुगावा ते सहा लोक ज्या वनस्पतीसमोर उभे राहिले होते त्याला लागणे शक्य नव्हते. कारण सर्व हितगुज अगदी बऱ्याच दूरवर झाले होते. मग आयडेंटिटी परेड सुरू झाली ! त्या वनस्पतीला जोडून पॉलीग्राफ मशिन ठेवले होते. आणि काय आश्चर्य ! तो 'खुनी' नेमका त्या वनस्पती व मशीनसमोर आला की, त्यातील सुईने 'खुनी' ला एकदा नाही पण अनेकवेळा 'आयडेंटिफाय' केले !

आणि ऐकदा एका माणसाच्या डोक्यात एका वनस्पतीबद्दल अपमानकारक विचार आला व त्याची प्रतिक्रिया म्हणून ती वनस्पती 'बिथरली !'

मी तुम्हाला स्पष्ट सांगून टाकतो की, हे पुस्तक वाचून झाल्यानंतर मला फूल तोडण्याचे धैर्य तर होतच नाही, पण झाडाच्या सावलीत बसण्याचे सुद्धा धारिष्ट्य होत नाही ! आणि बसलोच तर एखादे ट्रँक्विलायझर घेऊन बसतो म्हणजे वाईट विचाराचे प्रमाण बरेच कमी होते !

पुस्तकाच्या एका भागात तर एका प्रयोगाचे वर्णन केले आहे ते स्तिमित करून टाकणारेच आहे. हा प्रयोग दोन इंजिनीयर्स व एका इलेक्ट्रॉनिक तज्ज्ञांनी केला होता. ह्या प्रयोगात एका कापसाच्या शेताचे थोडे साधे फोटोग्राफ्स घेण्यात आले. हे फोटोग्राफ्स त्या शेतापासून २० ते ३० मैल लांब ठेवण्यात आले. नंतर फक्त ह्या फोटोवर किडे मारण्याच्या औषधाचे फवारे मारण्यात आले. खऱ्या शेतावर मात्र कोणत्याच प्रकारची औषधे मारली नव्हती. त्या इंजिनीयर्सना वाटले की, त्या फोटोवरच्या मोलिक्युलर व अॅटॉमिक इमल्शन ह्या फ्रिक्वेन्सिस व खऱ्या शेतावरच्या फ्रिक्वेन्सीस एकसारख्या असतील. (Molecular and atomic make-up of the emulsion on the photograph would be resonating at the identical frequencies of the objects represented pictorially, page 334). आणि ज्या फोटोवर कीटकनाशक औषधे मारली होती, त्या शेतात ८० ते ९० टक्के किडे मेले तरी होते किंवा नाहीसे तरी झाले होते ! (हे वाचून तुमच्या शत्रूच्या फोटोच्या नाकात विषारी औषध मारून त्याला मारण्याचा प्रयत्न करू नये !)

आता हा प्रयोग जर यशस्वी झाला तर किती अल्प प्रमाणात शेतात कीटकनाशक औषधे लागतील, ह्याची कल्पना सहज येईल. समजा, ५० एकरांचे एक शेत आहे व त्याचा एक किंवा दोन किंवा फार तर तीन फोटो घेतलेले आहेत. त्या फोटोवर एक दोन फवारे मारले की त्या शेतातले ८०% किडे नाहीसे होतील. (हे प्रयोग कोणत्या गोष्टीमुळे अयशस्वी होतात त्याची कारणेही ह्या पुस्तकात दिली आहेत.) धान्यावर व फळभाज्यांवर सारखी कीटकनाशक औषधे मारल्याने माणसाच्या आरोग्याला जी हानी होते, तीही टळेल. आपल्या हिंदुस्थानात तर डी. डी. टी. वगैरे किटाणूनाशक वापरण्याची 'सेफ लिमिट' किती आहे, याचा शेतकऱ्याला पत्ताच नसतो व ह्या औषधांचा बेसुमार वापर केला जातो. समजा, शेतकऱ्याने शेतावर भरमसाठ डी.डी.टी. मारली व पालेभाज्या व फळे नीट न धुता आपण खाल्ली तर ती राहिलेली डी.डी.टी. सरळ आपल्या हाडात जाऊन डिपोझिट होते. आणि प्रमाणाबाहेर डी.डी.टी. मारली तर फळे वगैरे धुऊन सुद्धा आत थोडीथोडी डी.डी.टी. मुरतेच. भरमसाठ डी.डी.टी. मारलेल्या त्याच शेतातला उरलेला पाला व गवत गुरांना देण्यात येतो. त्या गुरांचे मांस व दूध यातूनसुद्धा माणसाच्या पोटात डी.डी.टी. जाऊ शकते. ह्याला food chain म्हणतात

अणुबाँबच्या चाचण्यांतून उडालेले रेडियो-ॲक्टिव्ह मटेरियल सुद्धा असे हवेतून वनस्पतीत व वनस्पतीमधून प्राण्यांमध्ये व त्यांच्यातून माणसात प्रवेश करू शकते. मी थोड्याच दिवसांपूर्वी एका वर्तमानपत्रात असे वाचले होते की, भारतीय रहिवाशांच्या शरीरात ह्या प्रकाराने झालेले डी.डी.टी. चे डिपोझिट इतर सर्व देशांच्या रहिवाशांपेक्षा जास्त आहे. काही पाश्चात्य देशांत तर डी.डी.टी. निर्मितीलाच बंदी केली आहे.

ह्या लेखकद्वयाने तर फोटोवर अल्प कीटकनाशक औषधे मारण्याच्या प्रयोगाची होमिओपॅथीशी तुलना केली आहे. होमिओपॅथीमध्ये सुद्धा अगदी अल्प प्रमाणात औषधे वापरून त्या रोगाचाच symptom आणला की, तो रोगच नाहीसा होतो. फोटोवर अल्प प्रमाणात किटाणुनाशक औषधे मारण्याचे हे प्रयोग यशस्वी झाले तर ही औषधे उत्पादन करणाऱ्या कंपन्या बऱ्याच प्रमाणात बंद पडतील !

जगदीशचंद्र बोसवर ह्या पुस्तकात बरीच पाने लिहिली आहेत. बोसनी biophysics व plant response वर इतके संशोधन केले होते की, अजूनही त्यातून वेगवेगळे निष्कर्ष निघत आहेत.

संगीताचा वनस्पतीवर कसा परिणाम होतो, हे आता सिद्ध झालेच आहे. पण Rock music मात्र वनस्पतींना आवडत नाही ! कारण ह्या प्रकारच्या संगीतात गोडी व harmony नसते ! म्हणजे वनस्पती किती choosy असू शकतात, ते बघा !

ह्या पुस्तकाचे सर्वांत आश्चर्यचकित करून सोडणारे चौथे प्रकरण म्हणजे 'Visitors From Space.' जॉर्ज लॉरेन्स नावाच्या गृहस्थाने अवकाशामधून आलेले Signals वनस्पतीला कसे कळतात, याचे वर्णन केले आहे. इथे क्षणभर थांबून खोल विचार करायला हवा. हे Signals मिळविण्यासाठी आतापर्यंत कोटचवधी रुपये खर्च करून Sophisticated equipments बनवल्या गेल्या आहेत आणि ह्या यंत्राला जे जमले नाही, ते साध्या वनस्पतीला जमते म्हणजे तो एक निसर्गाचा चमत्कारच समजला पाहिजे. अर्थात हे Signals येतात ते परग्रहांवरून, फारच विकसित झालेल्या संस्कृतीपासून येत असावेत, असा अंदाज आहे. लॉरेन्स ह्या लेसर किरणावरचा तज्ज्ञ होता व त्या विषयावर पहिलेवहिले तांत्रिक पुस्तक त्यानेच लिहिले होते. त्याने केलेल्या प्रयोगातले Signals पृथ्वीवरून पाठवले गेले असतील असे नाही, परंतु ते एका सुधारलेल्या संस्कृतीने दुसऱ्या सुधारलेल्या संस्कृतीला पाठवले असतील व पृथ्वीवरून पास होत असतील ! पण त्या Signal चा अर्थ लावण्यासाठी आपल्याला बायॉलॉजिकल कम्युनिकेशनबद्दल काहीच माहिती नाही.

वनस्पतिजग हे किती संवेदनशील आहे, याची यथासांग माहिती ह्या पुस्तकात मिळते.

–जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


**SOME NEW TITLES RECEIVED**

( 1 ) **I am not an Island** – ( An Experiment in the Autobiography ) – Abbas K. A. Rs. 45/–

( 2 ) **The Idolaters** – ( Bestseller- Novel ) – William E. Hegner Rs. 14·55

( 3 ) **The Romeo Error** – ( Bestseller-about Death & after Life ) – Lyall Watson Rs. 13/–

( 4 ) **The Dice Man** – ( A sexy, hilarious, funny Novel ) – Luke Rhinehart Rs. 15/–

( 5 ) **The Final Days** – ( Nixon's last days ) – Carl Bernstein & Bob Woodward Rs. 15/–

( 6 ) **Edgar Cayce on E. S. P.** – ( Parapsychological phenomenon ) Editor Cayce Hugh Lynn Rs. 15/–

( 7 ) **On the Way Up** – ( The Executive's guide to company politics )– Terry Fransworth Rs. 15/–

( 8 ) **King of the Gypsies** – ( The Violent, Blood-thirsty, Vicious world of Gypsies ) – Peter Maas.

* आपल्या पुस्तकांना प्लॅस्टिकचे सुंदर कव्हर घालून मिळेल.
* डेलि-बेसीसवर नॉन-मेंबर्सकरितां पुस्तके वाचावयास मिळतील.
* दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून सभासद होता येते.

**' THE PHOENIX LIBRARY '**
727, OPP. : Sadashiv Post, Poona 30,

# राजवाडे विचारदर्शन : पृष्ठ १० वरून

संस्कृतीचा परिपूर्ण नाश होता. फक्त एका बाबीकडे त्यांनी बिलकुल दुर्लक्ष करता कामा नव्हते. ती बाब ही की, त्यांनी कोणाही हिंदुधर्मी लढवय्याला मनसबदारी किंवा सरदारी देऊन प्रबल बनू द्यावयाचे नव्हते. हे अनुभवसिद्ध सामान्य धोरण त्या काळी मुसुलमान पातशहांना माहीत नव्हते असेही म्हणता येत नाही. शहाजहान व औरंगझेब यांच्या तर ते मुखोद्गत होते. दक्षिणेतील शहांनाही ते अवगत होते. परंतु कोणतेही धार्मिक, वैय्यापारिक किंवा राजकीय धोरण कितीही महत्त्वाचे असले तत्रापि ते स्वसंरक्षणाच्या व खास बचावाच्या धोरणापुढे फिके पिडते. अकब्बराने जेव्हा निजामशाही घशाखाली उतरविण्याचा घाट घातला व निजामशाहीतील दक्षिणी व परदेशी मुसुलमानांचे दोन्ही पक्ष शद्वाच्या खांद्यावर कुरघोडी करू लागले, तेव्हा निजामशहाने मालोजी भोसले या लढवय्याला मनसबदारी देऊन स्वसंरक्षणार्थ विश्वासूक असा मराठ्यांचा तिसरा पक्ष निर्माण केला. प्रथम मालोजीची मनसबदारी पंचहजारी अशी बेताचीच होती. परंतु धन्याचा विश्वास बसत बसत व लढाईच्या निमित्ताने वाढत वाढत, शहाजीच्या हाताखाली ती मनसबदारी एखाद्या शहाला शोभेला अशी तोलदार फौज बाळगणारी झाली. असल्या मनसबदारीला कह्यात ठेवणे मोठे जीवावरचे, नाजूक व संकटाचे काम असते. सुखविली तर ती आयतीच अलगज प्रेमाने उरावर बसते आणि दुखविली तर रागावून प्राण घेते. सनातनधर्मी प्रबल मनसबदार जो शहाजी त्याला मलिकंबर व मूर्तिजाशहा ह्यांनी ज्या दिवशी दुखविले त्या दिवशी हिंदुस्थानात सहाशे वर्षे बांधीत आणलेल्या इस्लामच्या तटात पहिले भगदाड पडले आणि सनातन संस्कृतीवरील इस्लामच्या मगरमिठीतील पहिली गाठ मोकळी झाली. शहाजी संतापून निजामशाहीतून निघून गेल्यावर मलिकंबराला मूर्तिजाने ठार केले, मूर्तिजाला फतेखानाने मारले व फतेखानाला शहाजहानाने पकडले. बेगमेने शहाजीचे साह्य घेताच निजामशाहीला पुनः जीव आला आणि तिने शहाजीला सोडताच निजामशाहीचा कायमचा अंत झाला. शहाजहानालाही ह्या वेळी शहाजीच्या प्राबल्याचा व करामतींचा अनुभव आला. शके १५५८ तील मोहिम पावसाळ्याच्या आत खलास करण्याचे शहाजहानचे सर्व अंदाज शहाजीने हुकविले आणि शहाजी म्हणेल त्या अटीवर मोहिम कशी तरी शहाजहानास संपवावी लागली. ह्या पुढे शहाजीच्या वाटेस शहाजहान कधी गेला नाही. आदिलशाहीत गेल्यावर शहाजीने कर्नाटक कसे सर केले, शहाजीला अटक केल्यामुळे कर्नाटकात व पुणे प्रांतात कसा धुमाकूळ उडाला, सुटल्यावर औरंगझेबाचा हस्तक व कुतुबशहाचा प्रधान जो मीरजुमला त्याला शहाजीने कसा बेदम बडविला, बंगळूरास स्वराज्य स्थापन शहाजीने कसे केले आणि पुणे प्रांतात स्वतंत्र राज्य स्थापन शिवाजीकडून कसे करविले, वगैरे कथानक मागे सविस्तर वर्णिले आहेच. तात्पर्य, एक हिंदुधर्मी प्रबल मनसबदार बनू देण्याच्या एका चुकीचा हा सर्व परिणाम झाला. त्या एका चुकीने नुसती निजामशाहीच खाल्ली नाही, तर कुतुबशाही खाकेत मारली, आदिलशाहीचे लचके तोडले, बेरीदशाहीचा चकनाचूर होऊ दिला आणि शेवटी दिल्लीची मोंगलाई रसातळास पोहोचविली. औरंगझेबाने शिवाजीस निसटून जाऊ देण्याची एक चुकी केली, तर त्याला सव्वीस वर्षे दक्षिणेत वनवास भोगावा लागून शेवटी हताश मरावे लागले. शहाजीला मनसबदारी देण्याच्या एका चुकीने त्याहूनही घोर धक्का इस्लामला बसला. इस्लामी राज्यसत्ता हिंदुस्थानातून कायमची बाद होण्याचा मार्ग खुला झाला. हिंदुस्थानाच्या तत्कालीन राजकारणात शहाजीच्या इतिकर्तव्यतेचे कार्य हे असल्या स्वरूपाचे म्हणजे यवनांची सत्ता खिळखिळी करून मोडण्याच्या पंथास लावण्याचे होते. थोडक्यात सांगावयाचे म्हटले तर शहाजी ह्या वेळी हिंदुत्वाचा विजयी वाली बनला होता.

येथे असा अचंबा उद्भवण्यासारखा आहे की, इराणपासून आसामपर्यंत व पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत ज्याची अमर्याद सत्ता त्या दिल्लीच्या मोगल पातशहाला किंवा दक्षिणेतील शहांना शहाजी व शिवाजी यांना, अथवा व्यक्तिनामे टाकून बोलले तर मराठ्यांना चिरडून टाकता कसे आले नाही ? ह्या प्रश्नाला उत्तर द्यावयाचे म्हणजे तत्कालीन ऊर्फ तद्युगीन सार्वजनिक मानवी हालचालींकडे व संस्कृतिप्रवाहाकडे नजर फेकली पाहिजे, पहिली व सर्वांत मुख्य अशी एकच एक बाब एतत्संबंधक म्हटली म्हणजे ही की, ह्या काळी इस्लामी विकृती म्हणून जिला म्हणता येईल तिचे पृथ्वीतलावरील कार्य संपून तिची शक १४०० पासून शक १५०० पर्यंतची शंभर वर्षे एका प्रचंड संस्कृतिप्रवाहाच्या रेट्यापुढे सारखी पिछेहाट होत चालली होती. हा प्रचंड संस्कृतिप्रवाह म्हणजे ज्याला आधुनिक भौतिक शास्त्रीय संस्कृती म्हणतात तो. ह्या शास्त्रीय संस्कृतिप्रवाहाने एकट्या इस्लामी विकृतीलाच तेवढे क्षीण केले असे नाही. ह्या प्रवाहाने ख्रिस्ती विकृतीलाही दुर्बल करून सोडले. ही संस्कृती कालांतराने हिंदू विकृतीला व बौद्ध विकृतीलाही मुरगाळून टाकणार होती. अशा ह्या अजिक्य व त्रिभुवनविजयी व कालत्रयव्यापक सनातन भौतिक शास्त्रीय संस्कृतीच्या धगधगीत तेजापुढे जुनाट मध्ययुगीन व रानटी इस्लामी विकृती शक १४०० पासून क्षय पावत पावत शक १५५० च्या सुमारास अतीच क्षीण झाली. तिला पहिला धक्का स्पेनमध्ये बसला, दुसरा धक्का पोलंडमध्ये मिळाला आणि तिसरी गचांडी अरबी समुद्रात, बंगाली समुद्रात व पॅसिफिक समुद्रात दिली गेली. मुस्लीम विकृतीला लत्ताप्रहार करणारी ही तीन राष्ट्रे म्हणजे स्पेन, पोलंड व पोर्तुगाल ही होत. पहिल्या धक्क्याने इस्लामाची भूमध्य समुद्रातून उचलबांगडी झाली दुसऱ्या धक्क्याने इस्लामला पश्चिम युरोप बंद झाला, आणि तिसऱ्या धक्क्याने आफ्रिकेच्या पूर्वेकडील सर्व समुद्रांना इस्लाम कायमचे मुकले. इस्लामला हे प्राणघेणे धक्के देणारी तिन्ही राष्ट्रे ख्रिस्ती विकृतीने पछाडलेली होती. परंतु ती ख्रिस्ती होती म्हणून त्यांनी इस्लामाचा पराभव केला असे मात्र समजावयाचे नाही. त्यांच्या जयाचे मुख्य कारण त्यांच्यात नव्या जोमाने उत्पन्न झालेली भौतिक शास्त्रीय संस्कृती होय. ही भौतिक शास्त्रीय संस्कृती त्यांच्यात उत्पन्न होण्याच्या अगोदर तीन-चारशे वर्षे युरोपातील सर्व ख्रिस्ती राष्ट्रांनी पालस्टैन घेण्याकरता इस्लामशी

झुंजण्यात जंगजंग पछाडले, पण इस्लामचे त्यांच्याच्याने अणुमात्रही वाकडे झाले नाही. परंतु, भौतिक शास्त्रीय संस्कृतीचा पाठिंबा मिळताच, आगीपुढे लोणी जसे वितळावे, तसा इस्लाम शास्त्रसंस्कृत युरोपच्या पुढे केवळ विरघळत गेला, आणि ख्रिस्ती राष्ट्रांच्या अन्योन्य मत्सराची थोडीफार थंडाई मिळून आस्ते आस्ते विरघळता विरघळता आता गेल्या दोन वर्षांपाठीमागे म्हणजे शके १८४० त केवळ नामशेष राहिला. हा सर्व प्रभाव भौतिक शास्त्रीय संस्कृतीचा होय. अरबी समुद्रात इस्लामला जो धक्का बसला त्याचा परिणाम असा झाला की हबस, शामळ, अरबस्थान, इराणी आखात, काठेवाड, गुजराथ व कोकण ह्या प्रदेशांच्या किनाऱ्याने हबशी, शामळ, अरबस्थानी, इराणी, मोंगल, निजामशाही व आदिलशाही मुसुलमान व्यापाऱ्यांच्या हालचाली संपुष्टांत आल्या, आणि हबस, शामळ, अरबस्थान व इराण ह्या देशांतून आदिलशहा व निजामशहा यांच्या सैन्यांत व दरबारात लढाऊ व कारकुनी पेशाच्या मुसलमान लोकांचा भरणा उत्तरोत्तर कमी होत गेला. त्यामुळे देशातील मराठा शिपायांचा व सरदारांचा व ब्राह्मणांचा पाठिंबा मिळविणे या दोन्ही शहांना अपरिहार्य झाले. युरोपियन भौतिक शास्त्रीय संस्कृतीच्या रेटयाचा दक्षिणी शहांवर हा असा परिणाम झाला. दिल्लीच्या मोंगलांवरही अशीच छाप शास्त्रास्त्रसंपन्न पोर्तुगीज लोकांची बसली. प्राजक्तांचे झाड हलविले असता फुले जशी टपटपा गळून पडतात, तशी गुजराथ, कोकण व बंगाल या देशांच्या किनाऱ्यांवरील बंदरे पोर्तुगीज लोकांच्या शस्त्रांच्या व अस्त्रांच्या दणक्याने पटापट युरोपियनांच्या पदरात पडली. त्यामुळे दिल्लीच्या मोंगलाचीही गुर्मी समुद्रावर जिरविणारे शेरास सवाईशेर कोणीतरी पृथ्वीच्या पाठीवर फिरंगी म्हणून लोक आहेत अशी हिंदुस्थानभर आख्या झाली व तितक्या पुरता मोगलांच्या इज्जतीस धक्का बसला. मोंगल एक काफर तर फिरंगी सात काफर, असे हिंदुस्थानांत लोकमत बनले. फिरंग्यांना जिंकणे म्हणजे मोठे घातकृत्य करणे, असे हिंदुस्थानातील लोकांस वाटू लागले. शहाजीने फिरंगी हातात धरली म्हणजे फिरंग्यांचा रंग जातो, अशी जी जयरामाने शहाजीची स्तुती केली आहे, त्यातील मतलब असा आहे की, अजिक्य फिरंग्यांनाही ज्याने जिंकले तो शहाजी मोंगलाची विशेष तमा बाळगीत नव्हता हे जाहीर व्हावे. ह्या सर्व तपशिलांचे तात्पर्य एवढेच की हिंदुस्थानातील व विशेषतः ज्यांना पोर्तुगीजांचा निकट शेजार होता त्या महाराष्ट्रातील लोकांच्या मनातून आदिलशहा, निजामशहा व मोंगल या तिघांच्या संबंधाने आदर व इज्जत उतरण्याला दुसरीही आणखी कारणे वावरत होती. मोंगल पातशहा वंशाने तुराणी, विद्येने इराणी व धर्माने अरबी होते. मूळचे मध्यआशियातील मोंगल लोक अर्धवट रानटी असून, शेजारास असलेले त्यांच्या देवधर्मांहून श्रेष्ठ असे देवधर्म ते स्वीकारीत असत. पूर्वी कित्येक शक मोंगल लोकांनी वासुदेवभक्ती घेतली होती, कित्येकांनी बौद्धमत अंगीकारिले होते, आणि सध्या ते महम्मदाच्या देवधर्माचे अनुयायी बनले होते. हिंदुस्थानात आल्यावर ख्रिस्ती, झरतुष्टी व वेदान्ती कल्पनांचा पगडा त्यांच्या मनावर बसून, निर्भेळ इस्लाममतापासून ते च्युत होत चालले होते. अकब्बर, जहांगीर, शहाजहान, ह्या मोंगल पातशहांनी अनेक हिंदू चाली उचललेल्या होत्या, हे सर्वप्रसिद्ध आहे. इब्राईम आदिलशहाला ललितकलांचा


☆ ☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेला

# राजहंस प्रकाशने

- **सांगत्ये ऐका**
  हंसा वाडकर
  (तिसरी आवृत्ती)
- **टॉलस्टॉय - एक माणूस**
  सुमती देवस्थळे
- **श्रीग्रामायन**
  श्री. ग. माजगावकर
- **शतपावली**
  रवींद्र पिंगे
- **पुरंदऱ्यांची दौलत**
- **पुरंदऱ्यांची नौबत**
  ब. मो. पुरंदरे

☆ ☆

इतका काही शोक असे की त्या पुढे तो मुस्लीमधर्म तुच्छ मानी, अशी काजीमुल्ला वगैरे धर्माचार्यांना भीती पडली. मोंगल लोकांचे देवधर्म-विकार असे शिथिल होत असता, त्यांच्या इराणी विद्यासंस्कारातही बदल होत गेले. फारशी भाषा मोंगल भाषेहून श्रेष्ठ पडल्यामुळे व मध्यआशियातील सर्व दरबारी व्यवहार फारसीत चालत असल्या-मुळे, ह्या अर्धरानटी मोंगल लोकांनी इराणची परकीय अशी फारसी भाषा स्वीकारिली व फारसीत लिहिणारे इराणी कारकून व मुत्सद्दी पदरी बाळगिले. ह्या इराण्यांहून हिंदू कारकून व मुत्सद्दी वरचढ असत, सबब सर्व दरबारी व्यवहार आस्ते आस्ते हिंदू कायस्थांच्या हाती गेला. देवधर्म व फारसी विद्या यांची अशी पायमल्ली होत असता मोंगलांची वंशशुद्धीही भेसळ होत गेली. रजपूत वगैरे हिंदू जातीशीं शरीरसंबंध होऊन, शुद्ध मोंगल उत्तरोत्तर विप्रडत गेले व त्याबरोबर मोंगल स्वभावही अपकृष्ट होत गेला. गनीमी काव्याने लढण्यात मूळ मोंगलांची व तुराण्यांची मोठी ख्याती. पण हिंदुस्थानात ती कीर्ती त्यांनी गमाविली. मराठ्यांच्या गनीमी पेचांपुढे व हुल-कावण्यांपुढे, हिंदुस्थानात सुखावलेले मोंगल कच खाऊ लागले. असा चोहोकडून युरोपात, समुद्रात, हिंदुस्थानात, धर्मात, विद्येत व वंशात ऱ्हास होत गेल्यामुळे, शहाजी व शिवाजी ह्या मराठ्यांना चिरडून टाकण्याचे सामर्थ्य दक्षिणेतील किंवा उत्तरेतील मुसुलमानांत राहिले नाही. शहाजीने मुसुलमानांची ही व्यंगे ओळखून, तदनुसार आपली कारवाई चालविली व तीत त्याला यावे तसे यश आले. मुसुलमान पातशाह्या दिसण्यात खूप टव्बू दिसत, परंतु आतून रोगांनी पोकरल्या गेल्या होत्या, हे शहाजीस ओळखता आले, ह्यातच शहाजीचे मोठेपण दिसून येते. दिल्लीन्द्र म्हणजे केवळ अजिक्य, ही जी तत्कालीन सामान्य समजूत, तीत तथ्यांश कितपत आहे, हे शहाजीने व शिवाजीने व त्यांच्या ब्राह्मण मुत्सद्द्यांनी उत्तमोत्तम जोखिले होते.

## वरच्या कोटीतील उत्तम पुरुष

शहाजीच्या चरित्रातील मुख्य धोरण काय होते, तो आपली इति-कर्तव्यता काय मानीत होता, धोरण अंमलात आणण्यास त्याने कोणती साधने निर्माण केली व त्याच्या काली, महाराष्ट्राची, भारतवर्षाची, युरोपची, मुसुलमान समाजाची व त्याची स्वतःची मनोरचना व विकृति-संस्कृती कोणत्या स्वरूपाची होती, इत्यादी महत्त्वाच्या बाबींचा खल झाल्यावर, आता चटणी-कोशिंबिरीदाखल एका लहानशा बाबीचे मनोरंजनार्थ किंचित पेषण करू. पंधरा-वीस हजार फौजेचा मालक असताना ज्याने निजामशाही पुनरुज्जीवित केली, ज्याला गप्प बस-विण्याचे शहाजहानाचे सर्व प्रयत्न फोल ठरले, साठ-सत्तर हजार फौज चालवून ज्याने मीरजुमल्यासारखा रूमशामपर्यंत गाजणारा जवाहिऱ्या सरदार सशाप्रमाणे गुत्तीत पकडला, ज्याच्या दराऱ्याखातर औरं-गझेबाचे आदिलशाही खालसा करण्याचे विचार लांबणीवर पडले, ज्याचे गणगोत व शरीरसंबंध जाधवराव, निंबाळकर, मोहिते, इत्यादी मोठमोठ्या मराठा घराण्याशी पिढ्यानुपिढ्या होत आलेले, त्या शहाजी महाराजाच्या दिगंतकीर्तिलेकाला आमचे बंगाली व्यवसायबंधू जदुनाथ सरकार obscure of no high family influence व of very small means म्हणून लिहिण्याच्या झोकात सहज शिफारसपत्र देतात आणि चार ओळी लिहून संपल्या नाहीत तोच ह्या क्षुद्र व तुटपुंजा माणसाने गडापाठीमागून गड हवकण्याचा सपाटा लाविला म्हणून तक्रार करतात! दरिद्री व तुटपुंजा इसम फार तर पैशा-अधेल्याची चोरी करील; पण किल्ल्यापाठी किल्ला खिशात कसा घालील, ते सांगण्यास खरोखर बंगाली जादूगारच हवा होता! कदाचित दरिद्री व तुटपुंज्या शिवाजीने हे किल्ल्यांवर किल्ले पटकाविण्याचे अजब कृत्य मंत्रसामर्थ्याच्या जोरावर केले असावे, असा जदुनाथांचा गर्भित आशय असल्यास, शिवाजीच्या जादूगारी संबंधाचा हा नवीन शोध लाविल्याबद्दल प्रोफेसर सरकार यांचे आम्ही आनंदाने व खुल्या दिलाने अभिनंदन करण्यात सौख्य मानितो आणि मुसलमान तवारीखकारांचे एकनिष्ठ फोनो बनण्यात प्राविण्य दाखविल्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात दंग होतो.

प्रोफेसर सरकार यांनी शिवाजीवर ह्या जो जादूगारीचा व मंत्र-सामर्थ्याचा गर्भित आरोप नकळत आणिलेला आम्हास दिसला, तसला आरोप चुकूनही शहाजीवर आजपर्यंत कोणी केलेला नाही व पुढे करणार नाही. शहाजी आपली कुलदेवता अंबाबाई व कुलदेव शिखरशिंगणापूरचा महादेव यांचे स्मरण संकटसमयी करीत नसे. परंतु शिवाजीप्रमाणे अंबाबाई किंवा शंभुमहादेव त्याच्या अंगात येऊन त्याच्या तोंडून भविष्यवाणी कधीं वदवीत नसे. बापलेकात महदंतर जे होते ते हेच होते. आपल्याला अंबाबाई व शंभुमहादेव प्रसन्न आहे व त्याच्या वरदहस्ताने स्वधर्म रक्षिण्यासाठी स्वराज्य-स्थापना आपणास अवश्य कर्तव्य आहे, ही शिवाजीची भाषा शहा-जीच्या तोंडून कधी निघाली नाही. हे मंत्रसामर्थ्य शिवाजीसारख्या राष्ट्ररचना करणाऱ्या जादूगाराच्या ठायीच संभाव्य होते. महाराष्ट्रा-तील देवभोळ्या लोकांना अत्यंत प्रिय जी शंकरपार्वती दैवते तीच मुळी शिवाजीच्या अंगात संचार करून दुष्टांचा संव्हार व साधूंचे रक्षण करू लागल्यावर, सामान्य जन शिवाचा अवतार जो शिवाजी त्याचे शुभचिंतन व समनुयान करणे आपले कर्तव्य समजू लागल्यास आश्चर्य नाही. मुसुलमानांवर पातशाहत करू पाहाणाऱ्या नापोलियोने आपण इस्लामचे कट्टे अनुयायी आहो ही भाषा सुरू केली आणि तसा प्रसंगच येता तर त्याने एखादे नवीन कुराणही रचिले किंवा रचविले असते. तोच प्रकार शिवाजीचा होता. हे अतिमानुष लोक सामान्य देवधर्माच्या वरचे होत. अंबाबाईचशी काय, कोणतेही दैवत शिवाजीच्या तोंडून भविष्य बोलण्यात अभिमान मानते. ही देवांचेही अधिपत्य करण्याची शिवाजीची किंवा नापोलियोची पाहारी शहाजीसारख्या व्यावहारिकांना शक्य नव्हती. काळवेळ-प्रसंग पाहून चार लोकांत गोड दिसून आपले कार्य बाताबेताने परंतु निखालस सिद्धीस जेणे करून जाईल तो सर्वमान्य रस्ता चोखळणाऱ्या उत्तम पुरुषांपैकी शहाजी हा बऱ्याच वरच्या कोटीतील पुरुष होता. □

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

पुन:पुन्हा पाहावसा (–खरं तर खेळावासा) वाटणारा रंगतदार

# लपंडाव

लपंडाव या 'कलावैभव' निर्मित नाटकाचे पुण्यात आतापर्यंत खरं तर तीन प्रयोग झाले. काही ना काही कारणामुळे पहिले दोन्ही हुकल्यानंतरही मी तिसरा प्रयोग पाहिला आणि 'बेटर लेट दॅन नेव्हर' या इंग्रजी म्हणीचा खरेपणा पटला वगैरे. मुख्य म्हणणे त्याचे पुण्यात तीनच प्रयोग व्हावेत आणि एकंदरीतच त्याचं स्वागत काहीशा थंडपणानंच व्हावं, याचं आश्चर्य आणि वाईटही वाटलं. अर्थात प्रत्यक्ष प्रयोगाला येणारे प्रेक्षक नाटक थंडपणानं पाहत नाहीत, पाहू शकतही नाहीत, अशी काही तरी अजबगजब धमाल लेखक सुरेश पिप्रोडिया आणि दिग्दर्शक अरविंद ठक्कर या डोकेबाज दुक्कलीनं उडवून दिली आहे. मनसोक्त हसण्याचा निर्भेळ–आणि दुर्मिळही–आनंद मिळवून देणारं हे नाटक लेखन आणि प्रस्तुतीकरण या दोन्हीतही अतिशय बंदिस्त आणि भरीव आहे, कथासूत्राशी ठाम प्रामाणिक आहे, फार्सच्या बाबतीत अधिक संभवणारा कुठेही भरकटत जाण्याचा धोका त्यानं टाळलाय् हे विशेष.

'कलावैभव' आणि निर्माते मोहन तोंडवळकर यांच्या या लपंडावाची सुरुवातच भलती दाद घेऊन जाते. नाटकाच्या अगदी सुरुवातीला ठेवलेलं आणि नाटकासंबंधी थोडी माहिती देणारी स्वगतछाप प्रस्तावना ठीक आहे, लेखनापेक्षा ती ज्या पद्धतीनं राबवली गेली त्यामुळे, ती कलात्मक कमी आणि कामचलाऊ जास्त झाली आहे. अर्थात मुद्दा तो नव्हे. अरविंद ठक्कर आणि नेपथ्यकार बाबा पार्सेकर यांनी नाटक जसं आणि जिथे सेट केलंय तो प्रकार नुसती दादच नव्हे तर हॅटच काढून मागणारा आहे. एकाच सेटचा आणि सारख्याच स्टेजप्रॉपर्टीचा वापर करून त्यांनी यशवंत फडके आणि रमाकांत राणे अशा दोन व्यक्तींच्या खोल्या, मध्ये कोणतीच भिंत-पडदा वगैरे न घालता उभ्या केल्या, एवढंच नव्हे तर त्या दोन घरांत वेगवेगळ्या वेळी चाललेले प्रसंग, घडणाऱ्या घटना, संभाषणं आणि हालचालीही त्यांनी त्या एकाच दिवाणखान्यात एकाच वेळी चालू ठेवल्या होत्या. दुसऱ्याच्या घरातील कशाचीच दखल न घेता दोन्ही घरातली माणसं रंगमंचावर बोलली-वागली आणि दोन्ही एकाच वेळी एकत्रच पाहणाऱ्या प्रेक्षकांनी या अफलातून क्लृप्तीला मनापासून हसून दाद दिली.

नाटकाच्या या सेटअपचा आणि अपरिहार्य बंदिस्तपणाचाच एक भाग म्हणजे मर्यादित पात्रसंख्या–मोजून सहा पात्रं फक्त-आणि त्याचा एक फायदा म्हणजे प्रसंगनिष्ठ विनोदाला आणि पात्रचित्रणाला मिळालेला वाव. विनोदी किंवा फार्सिकल नाटकात विनोदी घटनाक्रमाच्या मानानं अनेकदा पात्रचित्रणाला दुय्यम स्थान मिळतं. 'लपंडावा'त तसं झालेलं दिसत नाही. सहाही पात्रांना स्वत:चं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, गुणदोष वैशिष्टयांसह असल्याचं प्रकर्षानं जाणवतं हा लेखकाचा विजय म्हणायला हवा. विशेषत: यशवंत व सौ. यमुनाबाई फडके (सतीश दुभाषी व अरुंधती राव) आणि रमाकांत व सौ. रंजना राणे (अविनाश मसुरेकर–रोहिणी ओक) या दोन जोडप्यांच्या व्यक्तिरेखा पिप्रोडिया यांनी झक्क रंगविल्या आहेत. त्यासाठी त्यांनी प्रमुख आधार घेतलाय तो त्यांच्या दिनक्रमाचा. दोन्हीही कुटुंबातला दिवस कसा सुरू होतो याचं अगदी अस्सल दर्शन घडवीतच पिप्रोडियांनी, रमाकांत-यमुना भानगडीसारख्या गुंतागुंतीच्या प्रश्नापर्यंत आपल्याला नेलंय्. या भानगडी आणि त्यातून निर्माण होणारे समजुतींचे घोटाळे हाच नाटकाचा प्राण आहे. आपल्या नवऱ्याची काही तरी भानगड 'बाहेर' असली पाहिजे, हा संशय रंजनाच्या मनात अखंड असतो आणि आपला नवरा रोज रात्री उशिरा घरी का येतो, याचा शोध काढता काढताच रमाकांत–यमुना प्रकरणाचे धागेदोरे तिच्या हाती लागतात. यशवंत फडके हा त्यामानानं सरळ आणि गरीब माणूस. तो आपली बायको सोडून भलभलत्या मंडळींचेच संशय घेत राहतो आणि गैरसमजांचं प्रमाण वाढवतो, गुंतागुंतही वाढवतो. त्याच्याच कंपनीतला अकाउन्टंट सुकुमार महाजन आणि त्याची बायको सुलक्षणा हेही या घोळात सापडतात–नाटकाची कथा आणखी उलगडण्यात मतलब नाही, कारण हे सगळं सव्यापसव्य प्रत्यक्ष घडताना बघण्यातच मजा आहे–पण या ब्रह्मघोटाळ्याचा शेवट मात्र अति अफलातून केलेला आहे. रमाकांत-यमुना प्रकरण उघडकीला येतं, त्याच्यापुढचंच दृश्य, मध्ये मात्र काही महिन्यांचा कालावधी उलटलेला, यमुनाबाईंना दिवस गेलेले, आणि भर मध्यरात्री त्या रमाकांतच्या घरी फोन करून फडकेसाहेब अजूनही घरी न आल्याची तक्रार करतात, तेव्हा हतबुद्ध झालेल्या रमाकांतला ओरडायचंही भान राहत नाही, कारण रंजनाही तोवर घरी आलेली नसते! एवढा जबरदस्त हास्यस्फोटक 'ॲन्टिक्लायमॅक्स' भलताच दुर्लभ म्हटला पाहिजे.

या लपंडावाला रंगत आणण्यात लेखकाबरोबर दिग्दर्शक श्री. अरविंद ठक्कर यांचा वाटा मोठा आहे. मुळात रंगमंच आणि दृश्यप्रसंगांची त्यांनी केलेली कल्पक मांडणी अभिनव आणि रंजक आहेच, आणि पात्रांच्या हालचालीही या मांडणीच्या मर्यादेत त्यांनी उत्तम नियंत्रित केल्या आहेत. अभिनयाची आघाडीही तितक्याच सामर्थ्यानं सांभाळणारे सतीश दुभाषी, अविनाश मसुरेकर आणि रोहिणी ओक यांचं श्रेयही जरूर मान्य केलं पाहिजे. फार्सिकल प्रसंगामध्ये अत्यावश्यक असलेला मोकळेपणा व तरीही विनोदनिर्मितीसाठी कोणतीही ओंगळ अतिशयोक्ती न करता रंगमंचावरील विलक्षण सहज वावर ही या तिघांचीही वैशिष्टये. सुधीर जोशी व राधिका कदम यांना सुकुमार–सुलक्षणा महाजनच्या भूमिकांमध्ये मर्यादित वाव असला तरी आपापलं काम त्यांनी चोख सांभाळलं आहे. अरुंधती राव यांचा वावर सफाईदार

असला तरी त्यांच्या संवादफेकीत अनेकदा नैसर्गिकतेचा अभाव जाणवला. इंग्लिश मॅनर्सबरोबरच त्यांनी उचललेलं इंग्लिश 'टोनिंग' किती प्रमाणावर समर्थनीय ठरेल याबद्दल मला शंका आहे. अर्थात नाटकाच्या रंगतीत त्याचा बाध कमी येतो' हेही खरं. इतर पात्रांइतकीच महत्त्वाची आणि मजेदार कामगिरी बजावणाऱ्या दोन टेलिफोन्सचाही उल्लेख करायला हवा, कारण त्यांच्याभोवती गुंफलेले प्रसंग हे लेखक आणि सतीश दुभाषी-रोहिणी ओक यांच्या प्रतिभेचे व अभिनय-सामर्थ्याचे सुरेख नमुने आहेत. □

हिंदी चित्रपट

## 'एक ना धड...' म्हणून दुर्लक्षिला गेलेला

# फासला

फासला हा ख्वाजा अहमद अब्बासचा चित्रपट तसा नवा कोरा म्हणता येणार नाही. कारण तो बराच रेंगाळत पुरा झालाय्. अर्थात के. ए. अब्बास हे तसे बुजुर्ग आणि दादा लेखक-दिग्दर्शक असल्यामुळे, आणि हेतुप्रधान चित्रनिर्मितीचे त्यांचे प्रयत्न प्रदीर्घ-काळाचे असल्याने, त्यांच्या चित्रपटात कमीतकमी वेगळेपणा तरी आढळेल, एवढी अपेक्षा करणं चुकीचं नव्हतं. दुर्दैवानं कला, धंदा आणि प्रचार या तीन टोकांमध्ये सापडून ओढाताण झालेला 'फासला' कोणत्याच प्रकारच्या प्रेक्षकवर्गाच्या मागण्या पुऱ्या करू शकत नाही. बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट दणकून आपटण्याचं कारण बहुधा हेच असावं.

'फासला' म्हणजे अंतर; दुरावा. अब्बासजींनी हे अंतर म्हणजे मुख्यतः श्रीमंत-गरिबातली प्राचीन दरी असंच गृहीत धरलेलं आहे. श्रीमंती-गरिबीच्या विषमतेच्या समस्येवर ढीगभर चित्रपट निघालेले आहेत. तथापि अब्बासांचा प्रयत्न हा– किमान दगडापेक्षा वीट मऊ या नात्यानं तरी – कमी उथळ, कमी पोशाखी आणि जास्त प्रामाणिक वाटतो. एका बड्या उद्योगपतीचा नातू आणि वारस असलेला एक संवेदनाशील तरुण (रमण खन्ना) आणि प्रथम संघर्ष, अंतर मैत्री आणि शेवटी प्रेम अशा क्रमानं त्याच्या संपर्कात आलेली एक पत्रकार कम् वकील तरुणी (शबाना आझमी) हीच दोन ठराविक साच्याची आणि सतत वापरली जाणारी पात्रं त्यांनी या सामाजिक आर्थिक समस्येची प्रतिनिधी म्हणून घेतली आहेत; तरीही रमण खन्नावर भांडवलदारी हितसंबंधातून लादला जाणारा वेडेपणाचा आरोप, त्यातून त्याची सुटका करण्यासाठी शबानानं दिलेली अनेकपदरी झुंज आणि शेवटी नव्या आयुष्याची सुरुवात करण्याइतका बुद्धिनिश्चय आणि कृतिनिश्चय झालेला रमण हे एक जास्तीचं परिमाण जोडून अब्बासजींनी कथा गुळगुळीत होऊ नये याची काळजी घेतली आहे. भांडवलदार प्रतिनिधिवर्गाला भडक खलनायकी रंग न देताही त्यांच्याबद्दलची आपली प्रतिक्रिया त्यांनी प्रभावीपणे व्यक्त केली आहे. रमणच्या मोटारीखाली अपघातात सापडलेला शबानाचा धाकटा भाऊ अनिल ही एक लोभस व्यक्तिरेखा अब्बासांनी निर्माण केली आहे आणि त्या छोट्या कलाकारानंही हिंदी चित्रपटातल्या बालकलाकारांच्या परंपरेत शोभत नाही इतक्या समजुतदारपणानं, संयमानं आपली भूमिका केली आहे. पांगळ्या झालेल्या अनिलचं विश्व हा 'फासला'-मधला त्यातल्या त्यात सुखद भाग आहे.

कलाकारांमध्ये अग्रक्रमानं उल्लेख शबानाचा करावा लागेल. ती 'स्टार' झाली नव्हती, तेव्हा सुरू झालेल्या या चित्रपटात तिला प्रभावी आणि थोडी चाकोरीबाहेरची भूमिका मिळाली आहे, हे एक; अलीकडच्या तिच्या काही चित्रपटांपेक्षा यात तिनं उजवं काम केलं आहे हे दुसरं; आणि नायक रमण खन्नाच्या अभिनयात सुसंगती आणि तडफ यांचा संपूर्ण अभाव असल्यानं तिची भूमिका बरीचशी अधिक महत्त्वाची आणि मध्यवर्ती ठरली आहे. जयदेव यांच्या रटाळ संगीतानं त्यांच्याबद्दलच्या पूर्वकल्पनेला भलताच धक्का दिला आहे. इतर कशाचाच बरावाईट उल्लेख करण्याचं प्रयोजन दिसत नाही.

कला, प्रचार किंवा धंदा यातलं एकही उद्दिष्ट धड पुरं न केल्यामुळेच 'फासला' फसला आहे, कंटाळवाणा झाला आहे. □

## कौटुंबिक जिव्हाळ्याचा आणखी एक प्रसाद

# उधार का सिंदूर

निर्माते-दिग्दर्शक एल्. व्ही. प्रसाद आणि कौटुंबिक जिव्हाळ्याची हृदयस्पर्शी कथानके यांचं काहीतरी अतूट आणि 'जनम-जनमका साथ' म्हणतात तशातलं नातं असलं पाहिजे अशी माझी त्या जिव्हाळ्याइतकीच पक्की खात्री झालेली आहे. उधार का सिंदूर हे त्यांच्या 'फॅमिली सीरीज्' मधलं ताजं चित्र पाहिल्यानंतर प्रसादजी आपला साचा सोडायला तयार नाहीत, हे स्पष्टपणे जाणवतं.

उधार का सिंदूर ही नेहमीप्रमाणेच एका बड्या खानदानावर कोसळलेल्या संकट-परंपरेची रडकथा आहे. शांता (आशा पारेख) आणि रेखा (रीना रॉय) या एका लक्षाधीशाच्या दोन मुली. त्यातली शांता आंधळी, त्यामुळे पोस्टरवर आशा पारेखचे डोळे कायम ऊर्ध्वदिशेला लागलेले का, याचा उलगडा झाला. डोळ्यांची बरीच उघडझाप आणि पापण्यांची फडफड करून तिनं आंधळे-पणा व्यवस्थित दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. व्यवस्थित एवढ्याच दृष्टीनं की आंधळेपणा दाखविण्याबद्दलच्या आपल्या-कडच्या चमत्कारिक अभिनयपद्धतीशी तिचं काम सुसंगतच आहे. आपल्या चित्रपटात आंधळी पात्रं ढीगभर सापडतील, पण बाह्य 'फडफड'. वगळता ही पात्रं पुरेशा सावधगिरीनं आणि डोळसपणेच वावरताना दिसतात. 'वेट अन्टिल डार्क' या बऱ्याच गाजलेल्या चित्रपटात ऑड्रे हेपबर्ननं आंधळ्या स्त्रीचं काम केलेलं होतं. स्पर्शात येऊन बसलेली शून्य नजर हा तिच्या भूमिकेचा प्राण होता. असं आंतरिक आंधळेपणा दाखवायचा प्रयत्नच आपल्याकडे होत नाही, हे हेपबर्नचं काम पाहाणाऱ्याला जाणवल्यावाचून राहात नाही. तर जितेंद्र हे (अर्थातच) अनाथ–गरीब वगैरे नायकमहाशय, पण एका बड्या डॉक्टरनं पाळलेले. या डॉक्टरांचे (ओम

शिवपुरी) स्वतःचे एक दिवटे चिरंजीव बापाचा पैसा, अब्रू वगैरेचा विचका यथास्थित करीत असल्यानं डॉक्टरसाहेब कर्जात असे बुडतात की त्यांना एकदम पक्षाघाताचा झटकाच येतो. शिवाय 'छिद्रेश्वनर्थाः' इ. प्रमाणे कर्जापायी बंगला जाऊन त्यांचा संसार झोपडीत येतो, तेव्हा जितेंद्रजी त्यांना वाचवायला उच्चउदात्त (आणि एल्. व्ही. प्रसादी चित्रात शोभणाराच) त्याग करतात आणि रेखावर प्रेम असतानाही अंध शांताशी शादी करून मोकळे होतात. इंटरव्हलनंतर मात्र यातला प्रत्येकजण पब्लिकला भीषण बोअर करण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. यात जितेंद्रांची बहीण प्रेमा नारायण, आशा पारेख आणि डॉक्टरांची कजाग बायको सिहिणीचे वाटे उचलतात. जितेंद्रही मधनं-मधनं डोळ्यात पाणी आणतात, आसरानी साहेब एका गंभीर रोलमध्ये जोरदार काम करून बायाबापड्यांच्या डोळ्यातून पाणी-पट्टी घेतात. रीना रॉय दुःखाच्या आणि दारूच्या नशेत उदास वगैरे. शेवटी आशा पारेख सर्व भानगड कळल्यानंतर झटपट जहर खाऊन जीव देते आणि (मरण्यापूर्वीच) स्वतःचं उधार कुंकू पुसून ते स्वहस्ते रीनाचा कपाळावर लावून टाकते. बस. (सगळाच) खेळ खतम्.

या सगळ्या 'माझी बायको माझी मेव्हणी' छाप कौटुंबिक भानगडीत बनावट नोटा छापण्याची एक गुन्हेगारी उपभानगड घुसडली आहे. कदाचित हल्ली त्याशिवाय यू सर्टिफिकेट मिळत नसावं. साहजिकच जितेंद्रला पो. इन्स्पेक्टर बनून असली गुनहगारांना पकडायचा पार्टटाईम उद्योगही करता आला आहे. अभिनेत्यांच्या बाबतीत रीना रॉय हा एकमेव प्लसपॉइंट. रेखाच्या 'मॉड' भूमिकेत ती छान दिसली आहे, तिनं कामही चांगलं केलं आहे. जितेंद्रही त्याच्या 'परिचय' इमेजला बऱ्यापैकी चिकटून राहिला आहे. त्याची ॲथलेटिक्सची प्रॅक्टिस पाहायला गेलेल्या खास चाहत्यावर्गाची निराशा होईल इतपत बरं काम त्यानं केलं आहे. आशा पारेख आता हळूहळू (वयानं) मोठ्या लोकांच्या लहान भूमिकांकडे वळली तर बरं होणार आहे. दुय्यम भूमिकांमध्ये असरानी आणि ओम शिवपुरी यांचा उल्लेख अपरिहार्य आहे.

असरानी क्वचित अतिरेक केल्यासारखा वाटला तरी थोडी वेगळी भूमिका वेगळ्या पद्धतीनं उभी करण्याचा त्याचा प्रयत्न जाणवतो. ओम शिवपुरीला मात्र कोणताच दोष देता येणार नाही. त्याचं भावदर्शन तर संस्मरणीय ठरलं आहे. पेंटल, धुमाळ, व्ही. गोपाल ही मंडळी कॉमेडियन्स म्हणून घेतली होती, असं चौकशीअंती कळलं.

दिग्दर्शक म्हणून चंदर व्होरा यांनी काय विशेष कामगिरी केली आहे, हा प्रश्नच पडतो. चित्राच्या कौटुंबिक साच्यात त्यांनी वेड्यावाकड्या घटना आणि साचेबंद पात्रं ठीक बसवली आहेत, एवढंच. तीच गोष्ट संगीतकार राजेश रोशनची. रीनाची एकदोन गाणी थिएटरमध्ये ऐकायला बरी वाटतात एवढंच, 'कभी मैं भी पिया घर जाऊँगी' हे गाणं जरूरीपेक्षा जास्त राबवलंय्.

तात्पर्य काय की, रीताचे चाहते वगळता इतरांनी पैसे मोजावेत एवढं काही या उधार का सिंदूरचे माहात्म्य नाही.

—शिरीष सहस्रबुद्धे


# प्रसिद्ध झाले !



लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २५।१२।७६ ते ३१।१२।७६

**मेष : यशाकडे वाटचाल**

अकरावा चंद्र असताना या आठवड्याची सुरुवात होत आहे, ही अनुकूल घटनेची एक नांदी आहे, यात शंका नाही. रवी-मंगळ-शुक्र दहावे व त्याचबरोबर गुरूबरोबर त्यांचा योग होत आहे. कधी नाही इतकी यावेळी ग्रहांची तुमच्यावर कृपा झाली आहे. राशिस्वामी मंगळ दहावा ही तर एक असामान्य अशीच गोष्ट आहे. या वेळी नोकरीत तुमच्या आशाआकांक्षा विलक्षण पद्धतीने पुऱ्या होणार आहेत. तुम्ही नोकरीत सध्या कोणत्याही जागेवर काम करीत असा, तुमची बढती होणार आहे. रेव्हेन्यू खाते, पोलीस खाते व इंजिनीयरिंग खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना बढती मिळणार आहे. उद्योगधंद्याची परिस्थिती सुधारेल. उत्कर्षाची बाजू निर्माण होईल. बेकारांना या वेळी सन्मानाने नोकरीवर घेतले जाईल. शुभ दिनांक २६-२८.

**महिलांना :** नोकरीत उत्कर्षाला संधी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** आनंददायक स्वप्ने उत्साह निर्माण करतील.

**वृषभ : पैसा मिळेल**

केतू व गुरू बारावे झाले आहेत. गुरू हा वक्री आहे. राशिस्वामी शुक्राची मात्र कृपा आहे. रवी-मंगळाचे आठव्या स्थानी प्रस्थान आहे. त्यामुळे घाबरून जाण्याचे मुळीच कारण नाही. मात्र प्रवासात थोडीफार सावधगिरी बाळगणे आवश्यक असून वाहन चालवताना मर्यादा ओलांडू देऊ नका. विशेषतः वेगमर्यादा ठेवा. केतू व गुरू अकस्मात अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न करणार असला तरी रवी व मंगळ काही उणे पडू देणार नाहीत. लेखन व प्रसिद्धी याबाबतीत सरकारी बंधने अवश्य पाळा. नोकरीत सारे ठीक चालेल. सहकार्य मिळेल. हातून उत्तम काम होईल व लोकांचा दुवा मिळेल. ठरवलेली कामे पार पडतील. आरोग्यात सुधारणा होईल. शुभ दिनांक २६-२७.

**महिलांना :** प्रसिद्धी व पैसा सहज उपलब्ध होईल. वाहनांचा योग आहे.

**विद्यार्थ्यांना :** प्रवासाचा बेत सफल होईल.

**मिथुन : पत्नीचे सहकार्य**

खरे म्हणजे तुमचे सारे सध्या गुरूच्या हाती आहे. साडेसाती आहे. शनी दुसरा आहे. तो अडचणी वाढवणार नाही, पण आर्थिक परिस्थिती सुधारण्यात अडथळे आणील याची जाणीव ठेवून वागा. व्यापारी लोकांनी कर्ज व इतर सवलतींवर अवलंबून राहू नये. नोकरीच्या बाबतीत मात्र काही चांगले घडू शकेल. वरिष्ठांवर प्रभाव पडेल. व्यक्तिमत्त्व साकारून जाईल. कर्तबगारीचा गौरव होईल. नव्या योजना सफल होतील. उच्चपदस्थांबरोबर जिव्हाळ्याचे संबंध जडतील. यावेळी पत्नीच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने कोणतेही उद्योगविषयक धोरण आखले तर ते हितकारक होईल. जुने फायदे मिळतील. पगारवाढ मिळेल. बचतीचे ध्येय साकार होईल. आरोग्याचे वरदान लाभेल. शुभ दिनांक २७-२८.

**महिलांना :** संसारी जीवनात सुखाचे क्षण अनुभवता येतील.

**विद्यार्थ्यांना :** महत्त्वाकांक्षेला प्रोत्साहक वातावरण राहिल.

**कर्क : हितकारक घडेल**

आठव्या चंद्राची सावली असताना व रवी-मंगळाचा शनीबरोबर षडाष्टक असताना आठवडा सुरू होत आहे. त्याचा सर्वत्र काही प्रतिकूल परिणाम होणार नसला तरी सर्वत्र अनुकूलही नाही, हे ध्यानी ठेवणे आवश्यक आहे. प्रामुख्याने सार्वजनिक कार्य व महत्त्व वाढवणाऱ्या घटना यांमधून फार सावधगिरीने वागणे आवश्यक आहे. नोकरीत थोडा फार बदल होईल. वरिष्ठांच्या गोड बोलण्यावर मात्र विसंबून राहू नका. स्वतः नोकरी बदलू नका. गुरू उपकारक आहे. त्याने आर्थिक बाजू थोडीफार बळकट राहील. व्यापार व शेती सुधारेल. भांडवल गुंतवणूक करता येईल. आरोग्याला जपावे. प्रवासात मूल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी. शुभ दिनांक २६-२९.

**महिलांना :** काळजी व विवंचना करू नका. नोकरीत बढती मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** केवळ स्मृतीवर भर देऊन राहू नका.

**सिंह : डळमळ संपेल**

शनीबरोबर रवी-मंगळाचा जो बदल होत आहे त्याचा प्रतिकूल परिणाम तुमच्याबाबतीत घडणार नाही. फक्त नोकरीत इतरांचा पैसा अत्यंत काळजीपूर्वक वापरा. ज्याला फ्रॉड असे म्हणता येईल असे काहीही हातून होऊ देऊ नका. ही काळजी घेतली तर तुमचे स्थान यावेळी सर्वच बाबतीत बळकट आहे, याची खात्री बाळगा. राजकारणात विरोधकांच्या कारवाया तूर्त थंडावल्या आहेत. तुमचे व्यक्तिमत्त्व प्रभावी होणार आहे. प्रतिष्ठा वाढणार आहे. नोकरीत तुमच्यावर मोठी जबाबदारी टाळण्याइतपत वरिष्ठांची मर्जी संपादन होणार आहे. उपेक्षा, निराशा आता संपलेली आहे. लोकप्रियता वाढेल. शुभ दिनांक २५, २७.

**महिलांना :** नोकरी मिळेल. बेकारांना आता त्रास नाही.

**विद्यार्थ्यांना :** मन:स्थिती उत्साहवर्धक राहील.

**कन्या : चिंता नको**

आठवड्याची सुरुवात फारच उत्तम होणार आहे. अनपेक्षितरीत्या चार पैसे हाती येऊन आर्थिक बाजू सुधारेल. नोकरीत चिंता करीत बसू नका. कार्यक्षमता वाढेल. वरिष्ठांच्या कृपेचा प्रत्यय येईल. नोकरीत विरोधकांचे डावपेच त्यांच्यावरच उलटवण्यात यश मिळेल. सार्वजनिक कामात मोठे यश मिळेल. चार लोकांत तुमच्या नावाची स्तुती होईल. तुम्ही जर लेखक वा इतर कोणी असाल तर लोकप्रियता वाढेल. प्रतिभा जागी होईल. बुद्धिमत्ता तीव्र बनेल. संशोधनात लक्ष घालता येईल. सुखस्थानी रवी-मंगळासारखे ग्रह आहेत. ते मानसिक स्वास्थ्य मात्र पुरेसे मिळू देणार नाहीत. निष्कारण काहीतरी शंका मनात उद्भवत राहतील. आरोग्य चांगले

राहील. शुभ दिनांक २५, ...

**महिलांना :** घरगुती स्वास्थ्य मिळेल. मुलांचे कौतुक मनाला आनंद देईल.

**विद्यार्थ्यांना :** जागेचा वा निवासस्थानाचा प्रश्न समाधानकारक सुटेल.

## तूळ : कर्तृत्वाला आवाहन

तूळ राशीच्या व्यक्तींची कोंडीत सापडलेली परिस्थिती रवी-मंगळानी तिसऱ्या स्थानी वादात मांडल्यापासून फुटली आहे. तुम्ही रसिक आहात, कलावंत आहात, मन प्रसन्न असले तर अनेक क्षेत्रांत तुमच्या अंगभूत गुणांना वसंतवहार येतो. मित्रहो, सध्या अशा परिस्थितीची तुमच्यावर फार कृपा आहे. नोकरीत वजन वाढणार आहे. आजवरच्या कामाचे चीज होऊन उत्पन्न तर वाढेलच, पण अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या तुमच्यावर सोपविण्यात येतील. वरिष्ठांची मर्जी राहील. लॉटरीत लाभ होईल. उत्तम प्रकारचे लेखन हातून होईल. कलाकारांना मागणी येईल. लोकप्रियता वाढेल. राजकारणात महत्त्वाकांक्षा पालवतील. आर्थिक बाजू उत्तम राहील. कर्ज असल्यास ते मिटेल. अनेकांची मदत मिळेल. धंदा सुधारेल. शुभ दिनांक २६, २९.

**महिलांना :** धंदा व नोकरी समाधानकारक राहील.

**विद्यार्थ्यांना :** कलाक्षेत्रांतील अपेक्षा वाढतील.

## वृश्चिक : स्वतंत्र धंदा

राशीतून रवी व राशिस्वामी मंगळ बदललेले आहेत, याची जाणीव ठेवा. राहू व हर्शल बारावे आहेत. हे ग्रह तेवढेसे अनुकूल नाहीत. तरी पण स्वतंत्र धंदा उभारायला हे अनुकूल आहे. विशेषत: पदवीधर बेकारांनी मदत घेऊन स्वतंत्र धंदा सुरू करायला हरकत नाही. चालू धंद्यातदेखील बरकत येईल. नोकरीत तसे वातावरण थोडेफार नरमगरम राहिले तरी तुम्हाला त्रास नाही. वरिष्ठांबरोबर मतभेद वाढवू नका व शक्यतो त्यांच्याच कलाने जा. पोलीस खात्यातील लोकांना धन्यवाद मिळणार आहेत. आर्थिक परिस्थिती समाधानकारक राहील. खर्चावर बंधन घाला. जामीन कुणालाही राहू नका. कौटुंबिक संबंध थोडेफार तणातणीचे राहातील. शुभ दिनांक २७, २९.

**महिलांना :** नोकरी व घरची जबाबदारी असा ताण पडेल.

**विद्यार्थ्यांना :** व्यसनाचा मोह कटाक्षानें टाळा.

## धनू : सामर्थ्य वाढणार

धनू राशीच्या व्यक्तींनी आता उगाचच ओरडण्यात अर्थ नाही. यावेळी अंतरिक्षातील सामर्थ्यवान ग्रह तुमच्यावर कृपेच्या पवऱ्या ढाळीत आहे. गुरू, रवी, मंगळ असे सारेच मोठे ग्रह अनुकूल आहेत. त्यामुळे नोकरी असो की धंदा असो, दोन्ही क्षेत्रांत तुमच्या कर्तृत्वाचा ठसा उमटणार आहे. तुमच्या विरुद्धच्या साऱ्या कारवाया थांबणार आहेत. विरोधकांना तुमचे प्रभावी नेतृत्व दिपवून टाकील. यावेळी तुमच्या हातून विशेष असे काही तरी घडावे असा परमेश्वराचा संकेत दिसतो. उपासकांना साक्षात्कारी अशी स्वप्ने पडतील. धंद्यातील अडचणी निवारण होऊन तेथे तुम्ही नवे काही तरी उभारू शकाल. कार्यक्षमतेचा प्रत्यय येईल. बेकारांनी आपल्या इच्छेनुरूप व्यवसाय निवडावा. शुभ दिनांक २५–२९.

**महिलांना :** नोकरीत प्रमोशन– पगारवाढ असे काही तरी घडू शकेल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासातील अडचणी दूर होऊन यश मिळेल.

## मकर : परिस्थितीत बदल

गुरू चौथा झाला आहे. रवी-मंगळ हे दोन्ही ग्रह बारावे झाले आहेत. मंगळ हा मकर राशीला तेवढी वाईट फळे देत नसला तरी त्याचे यावेळी तुम्हाला हवे तेवढे सहकार्य मिळणे अवघड आहे. परिस्थितीत बदल होत आहे. त्यामुळे यावेळी संयमाने व इतरांच्या भावनेची कदर करून काम करा. नोकरीत हाताखालच्या लोकांना व सहकाऱ्यांना आपुलकीची वागणूक देऊन काम करण्याची वृत्ती ठेवा. धंद्यात नुकसान होणार नाही. परंतु अपेक्षित फायदा होणे अवघड जाईल. प्रतिष्ठा पणाला लागण्याचे प्रसंग काही वेळा निर्माण होतील. राजकारणात माघार घेण्याची पाळी येईल. प्रवासात वाहनाचे अडथळे येऊ शकतील. तब्येतीला आजार नाही. परंतु थकवा येणे, निराशा येणे असे काही तरी अधूनमधून घडू शकेल. शुभ दिनांक २७–२८.

**महिलांना :** नोकरीत फाजील आत्मविश्वास ठेवून वागू नका.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत लक्ष देऊन पेपर लिहा.

## कुंभ : अनपेक्षित प्रमोशन

कुंभ रास ही शक्तीची रास आहे. पण यावेळी शनीपेक्षा इतर ग्रह तुमच्यावर फार खूष आहेत. रवी राजकारणात तुमचे स्थान एकदम उंचावणार आहे. ज्या एका घटनेची तुम्ही अनेक दिवस मार्गप्रतिक्षा करीत आहात, ती ' राजकीय उच्चपदाची ' तुमची इच्छा ध्यानीमनी नसताना पुरी होणार आहे. नोकरीत प्रमोशन मिळेल. चालू स्थिती बदलेल. पगारवाढदेखील होईल. दुसऱ्याच्या पैशाने परदेश-यात्रा घडू शकेल. धंद्याचे तंत्र व्यवस्थित आत्मसात होणार आहे. तोटा संपून नफ्याचे पर्व सुरू होईल. व्यापार-उदीम अडचणींवर मात करून प्रगतीचा मार्ग चोखाळाल. सार्वजनिक क्षेत्रात प्रतिष्ठा उंचावेल, राहणीत फरक पडेल. कौटुंबिक संबंधात अनुकूल बदल होईल. रेस व लॉटरीत पैसा मिळेल. कर्जाची चिंता दूर होईल. शुभ दिनांक २९–३०.

**महिलांना :** घरगुती उद्योगात बरकत येईल. गृहस्वास्थ्य उत्तमपैकी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** कौटुंबिक अडचणी संपतील.

## मीन : धंद्यात उत्कर्ष

राशिस्वामी गुरू दुसरा आहे. तो केतूच्या सहवासात असला तरी प्रतिकूल नाही. हा आठवडा धंद्यात क्रांतिकारक बदल घडवून आणणार आहे. रवी-मंगळ दोन्ही अतिशय अनुकूल आहेत. त्यामुळे व्यापार व शेअर्स-वायदेबाजाराचे अंदाज अचूक उतरतील. यावेळी नुकसान होते की काय ही भ्रांती मनातून काढून टाका. नोकरीत लोकप्रियता व वरिष्ठांच्या कृपेची पखरण तुम्हाला लाभेल. तुमच्या ज्या मागण्या असतील त्या यावेळी पुऱ्या करून घेण्यास तुम्हाला मोठे यश लाभेल. वरिष्ठांच्या बरोबर एखादा दौराही घडू शकेल. वाहन-खरेदीचा योग आहे. पैशाची स्थिती समाधानकारक राहील. प्रतिष्ठा उंचावेल. घरात नव्या नव्या वस्तू खरेदी करू शकाल. स्वतंत्र धंद्यात जे लोक आहेत त्यांना पाय तेथे पक्का रोवता येईल. यश व प्रगती दृष्टिपथात येईल. शुभ दिनांक २७–३०.

**महिलांना :** नोकरीतील इच्छा-आकांक्षा सफल होतील.

**विद्यार्थ्यांना :** अपुरे शिक्षण मार्गी लागेल. □

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजरातेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १५ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १६ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १७ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १८ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| १९ | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २० | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |
| २१ | लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | १० – ०० |

**आगामी**

| | |
|---|---|
| प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे / श्री. ग. माजगावकर |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे |
| सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आ.) |
| संध्याकाळ | गजानन जागीरदार (दु. आ.) |
| शतपावली | रवींद्र पिंगे (दु. आ.) |
| टॉलस्टॉय - एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आ.) |
| मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**